नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com


निवेदन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी : विज्ञान साहित्य विशेषांक

वर्ष चाळीसावे | अंक ११/१२ | नोव्हेंबर/डिसेंबर'८४

अनुक्रम...

लेख

कथा

कविता

पुस्तके

केंद्रीय कार्यवृत्त

मुखपृष्ठ

• विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या युगवाणीस महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त झाले आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२

स्वगत...

या अंकात विज्ञान आणि साहित्याचा संबंध दर्शविणारा काही मजकूर आहे. गेल्या काही दिवसापासून विज्ञानकविता, विज्ञानकथा, विज्ञाननाटय असे शब्दप्रयोग मराठी साहित्याच्या क्षत्रात अवतरले आहेत. साहित्यशैलीची अशी कप्पेबांधणी कितपत उचित आहे, हा प्रश्न दलित साहित्याच्या संदर्भात उपस्थित झाला होता. जनसाहित्य किंवा समांतर साहित्यानेही असाच प्रश्न पुढे आणला होता. ग्रामीण साहित्य हाही शब्दप्रयोग चर्चेचा विषय झाला होता. विज्ञानसाहित्य हा नवा शब्द-प्रयोगही अशीच चर्चा उपस्थित करणारा आहे.

दरम्यान दलित साहित्याने मराठी साहित्यक्षेत्रात स्वतःचे प्रभावी स्थान निर्माण केले आहे. जनसाहित्य आणि ग्रामीण साहित्यही आपले वैशिष्टय साहित्यप्रांतात जपून आहे. असे शिक्के लावलेले साहित्य हे 'साहित्यप्रकार' समजण्याऐवजी 'शलीचे प्रकार' समजणे अधिक इष्ट होणार नाही का ? कदाचित् ही सूचना देखील नव्या वादाला तोंड फोडणारी ठरू शकेल. प्रश्न वादविषय निर्माण करण्याचा नाही. साहित्यक्षेत्राची कप्पेबांधणी 'शास्त्रीय' असावी एवढाच या सूचनेचा हेतू !

काही दिवसापूर्वी दलित साहित्य चळवळीचे अध्वर्यू प्रा. यशवंत मनोहर यांनी दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र या अर्थाने 'कौरुप्यशास्त्र' नावाचा थोडा चकित करणारा शब्द वापरला होता. या नव्या कौरुप्यशास्त्राची यथावकाश मांडणी होईल, अशी अपेक्षा आहे. अन्यथा व्यासपीठीय अभिनिवेशापलि-कडे या शब्दाला अर्थ उरणार नाही, अशी भीती वाटते. मनोहरांसारखे गंभीर चिंतक नवे सौंदर्यशास्त्र, नव्हे कौरुप्यशास्त्र खचितच निर्माण करू शकतील.

विज्ञानसाहित्यविषयक मजकूर संपादित करताना आपण उगीचच हा विषय अंकासाठी निवडला, असे वाटायला लागले होते. आजतरी विज्ञानसाहित्य ही संकल्पना अस्पष्ट, धूसर आहे. पण उद्या कदाचित् ही शैलीसुद्धा आपली पाळेमुळे खोलवर रुजवील. द्रष्टे होता आले नाही तरी नतद्रष्ट होऊ नये, एवढ्याचसाठी विज्ञानसाहित्य विषयक लेख या अंकात समाविष्ट केले. वाचकांनी या लेखांचे यथायोग्य मूल्यमापन करावे, ही अपेक्षा आहे.

आणखी एक मुद्दा या विज्ञानसाहित्यामागे होता. तो म्हणजे शास्त्रीयतेचा. कोणत्याही लेखनामागे केवळ शास्त्रीय दृष्टीच असून चालत नाही; तर लेखकाची मानसिकताही शास्त्रीय असावी लागते. अभ्यास, व्यासंगाने शास्त्रीय चष्मा प्राप्त झालेले विद्वान मानसिकतेच्या बाजूने अंधश्रद्ध आणि दुर्बळ असू शकतात. अर्थात् अशी शास्त्रीय मानसिकता क्षणार्धात निर्माण होणार नाही. त्यालाही काही काळ जावा लागेल. शास्त्रीय मानसिकता घडविण्याच्या प्रयत्नात या विज्ञानसाहित्यविषयक मजकुराने थोडा हातभार लावला तर तेही नसे थोडके !

प्रकाश देशपांडे
संपादक

अनुक्रमणिका

गडकरी आणि मासिक मनोरंजन

ज. वा. कुळकर्णी

गडकऱ्यांचे आणि मासिक मनोरंजनाचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. गडकऱ्यांच्या 'राजहंस', 'स' आदि बहुतेक स्फुट कविता 'मासिक मनोरंजना'तून प्रसिद्ध झाल्या आहेत. मासिक मनोरंजनामुळे आपल्याला लिखाणाची स्फूर्ती मिळाली असे गडकरी नेहमी सांगत. का. रा. मित्रांच्या या मासिकाबद्दल गडकरी नेहमी नितांत आदर व्यक्ति करीत असत. ते आपल्या मित्रवर्गाशी बोलताना नाटयक्षेत्रात 'किर्लोस्कर मंडळी,' शिक्षणक्षेत्रात उंच पताका धारण करणारे फर्ग्युसन कॉलेज आणि मराठी साहित्यक्षेत्रात सूर्यप्रकाशासारखे तळपणारे 'मासिक मनोरंजन' याबद्दल आपल्याला नेहमीच आदर वाटतो, असे उद्गार काढीत. एवढेच नव्हे तर ते 'मनोरंजन' खेरीज इतरत्र लिहू नये असे बोलल्याचे नमूद आहे.

मासिक मनोरंजनाचे मालक व संपादक हे एक कुशल संघटक होते, यात शंका नाही. विविध प्रवृत्तीच्या अनेक लेखकांना त्यांनी लिलयेने आपल्या सभोवती गोळा केले होते. यात कोपिष्ट गडकऱ्यांचाही समावेश होता. गडकऱ्यांना सांभाळणे हे किती कठीण होते, हे नंतरच्या घटनांवरून दिसून येईल. परंतु मित्रांनी गडकऱ्यांना सांभाळले एवढी गोष्ट खरी. तात्पर्य, मित्र आणि गडकरी यांचे संबंध जिव्हाळ्याचे होते आणि त्यामुळे गडकऱ्यांना 'मासिक मनोरंजना'बद्दल आदर होता. या संबंधात मित्रांनी गडकऱ्यांना लिहिलेले एक दुर्मिळ पत्र उपलब्ध आहे. पत्र सत्तर वर्षांपूर्वीचे आहे. त्यावरून त्याचे महत्त्व लक्षात येईल. या पत्राद्वारे मित्रांनी गडकऱ्यांच्या मैत्रीच्या संबंधात अनेक गोष्टी नकळत सांगून टाकल्या आहेत असे वाटते. हे पत्र गिरगाव, चर्नीरोड येथील 'मासिक मनोरंजना'च्या कार्यालयातून लिहिले आहे. पत्राचा दिनांक ५ मे १९१३ असा आहे. पत्र पुढीलप्रमाणे आहे—

प्रेमपूर्वक सा. न. वि. वि.

एप्रिलच्या अंकाच्या कॉपीपैकी एक आज रोजी आपल्याकडे पाठवीत आहे. अंक प्रसिद्ध व्हावयास अद्याप ४–५ दिवस लागतील. माझी फार धांदल उडत आहे. दररोज नव्या नव्या अडचणी उपस्थित होत असून त्या निस्ताराव्या लागत आहेत, मनाला स्वस्थता नाही व अवकाशही मिळत नाही.

आपल्या लेखाचे प्रुफ अद्याप परत आले नाहीत. उद्याच्या टपालातून येईल असा भरंवसा आहे. केसांचा भाग गाळल्याबद्दल रोष नसावा. तो भाग मी ठेविला आहे. दुसऱ्या कोणत्यातरी लेखात त्याचा उपयोग करता येईल. मनोरंजनाच्या 'हितचिंतकांच्या' हाती जळते कोलीत सापडू नये असे मला वाटते. मनोरंजनाबरोबरच काही कारणाने 'गोविंदाग्रज' अगर 'बाळकराम' यावरही दात चावणारे काही सभ्य आहेत. ही मंडळी डोळयात तेल घालून बसली आहे. असो. वरील गोष्टीकडे लक्ष देऊन गाळलेल्या मजकुराबद्दल केसाऐवजी डोक्यात राख घालून घेणार नाही असा भरंवसा आहे. मनोरंजनाविरुद्ध हल्ली कित्येक मंडळी जातीने खटपट करीत आहेत. त्यांच्या त्या खटपटीची यत्किंचितही फिकीर न करता मनोरंजन राजमार्गाने सरळ रीतीने आपली करून

घेणार. क्षुद्र टीकाकाराना यत्किंचितही भीक घालण्याची मनोरंजनाची इच्छा नाही. तथापि अशा काकदृष्टी मंडळीला ओरड करण्यास जागाच मिळू नये यावद्दल आपण अवश्य प्रयत्न केला पाहिजे. असो. मेचा अंक २० तारखेच्या आत खात्रीने प्रसिद्ध होईल. जूनचा अंक १ त्या तारखेस प्रसिद्ध करणारच. करिता जूनच्या अंकासाठी लेख ४/५ दिवसात अवश्य पाठवावा. १२ पासून १५ तारखेच्या आत कंपोज पुरा झालाच पाहिजे. १६ तारखेनंतर कंपोज शिल्लक ठेवायचा नाही, अशी व्यवस्था केली आहे. तरी विनोदी लेख अवश्य पाठवावा. गोष्ट पाठविता आल्यास तीही पाठवावी.

आपल्यास सवड असल्यास ४/५ दिवसाकरीता मुंबईला यावे. मला सध्या तिकडे यावयास जमत नाही. कळावे, लोभ असावा, ही विनंती.

आपला

K. R. Mitra

या पत्रावरून असे दिसते की मित्रांनी आणखी काही पत्रे गडकऱ्यांना लिहिली असावी. परंतु आज केवळ एकच पत्र उपलब्ध आहेत आणि त्यावरून गडकरी व मासिक मनोरंजनाच्या संदर्भात काही गोष्टींचा वाचकांना परिचय घडतो. १९१३ च्या एप्रिलच्या मासिक मनोरंजनाच्या अंकात गडकऱ्यांचा 'स्वयंपाकघरातील गोष्टी' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. हे लेख म्हणजे विनोदाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. लेख विस्तृत आहे. या लेखात स्वयंपाकघरातील सामान्य व्यवस्था, चापटपोळ्या, घम्मक लाडू, कणिक तिंबणे, विहिणीची रेवडी, पोळ्या लाटणे, वर्फाची चटणी, थंडा फराळ, अंगाचा तिळपापड, पाठीचे धिरडे, हाडांची पूड, मनातले मांडे, माणसांचे मेतकूट, घरादाराचे खोवरे, अकलेचा कांदा व गुळाचा गणपती या शीर्षकाचे मुद्दे घेऊन त्यावर दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घडामोडींचे हलकेफुलके वर्णन विनोदी कुंचल्याने केले आहे. या काळात हा लेख फार गाजला होता. ह्याच लेखातील डोक्यावरील केसाचा उल्लेख असलेले हे वर्णन संपादक या नात्याने मित्रांनी ते गाळले. दुसऱ्या एखाद्या लेखासाठी वापरू असे मित्र वरील पत्रात लिहितात. शीघ्रकोपी गडकऱ्यांनी या पत्राला काय उत्तर दिले याचा पुरावा उपलब्ध नाही. परंतु त्यांनी 'मासिक मनोरंजना'चे संपादक श्री. मित्र यांचे ऐकले असावे असे दिसते. कारण मे महिन्याच्या अंकात गडकऱ्यांच्या 'रिकामेपणाची कामगिरी' या मालिकेतील चवथा लेख 'लग्न मोडण्याची कारणे' शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला आहे.

या चवथ्या लेखातील कोणत्या परिच्छेदात केसांचा उल्लेख आला असावा हा एक संशोधनाचा विषय ठरतो. माझ्या मते दुसऱ्या परिच्छेदात हा डोक्यावरील केसाचा भाग आला असावा व त्याचा विपरीत अर्थ लावण्यात येईल या विचाराने मित्रांनी तो भाग लेखातून गाळला असावा. पुढील उर्वरित भाग असा आहे. 'कधीकधी तर निसर्गाच्या कृतीतसुद्धा स्त्रीपुरुष भेदावद्दल ढिलाई दिसून येते! दाढीमिशीच्या झुपक्यांनी कलंकित झालेल्या स्त्रीमुख–चंद्रांची चित्रेही बहुश्रुत वाचकांनी पाहिली असतीलच. याप्रमाणे स्त्रीपुरुषांनी परस्परांना आपापल्या कार्यक्षेत्राचे एकादेवेळी सीमोल्लंघन करीताना पाहिले, तर उगाच त्रागा करीत बसण्याचे कारण नाही!" गडकऱ्यांच्या अनिर्बंध दौडणाऱ्या वारुरूपी लेखणीतून केसांवर लिहिताना काही अतिरेकी लिहिले गेले असावे व ते योग्य नसण्याची शक्यता असावी. यामुळे चाणाक्ष संपादकांनी तो भाग गाळला असावा.

या पत्रात मित्रांनी गडकऱ्यांना जूनच्या अंकासाठी एकादा विनोदी लेख पाठविण्याची विनंती केली आहे. परंतु गडकऱ्यांनी असा लेख पाठविल्याचे दिसत नाही किंवहुना वर्षाच्या उर्वरित महिन्यात एकही लेख पाठविल्याचे दिसत नाही. याउलट मे महिन्यातील लेखाला दिलेली 'टीप' वाचता त्यांनी ही विनोदी लेखमाला संपविल्याचे दिसते. गडकरी लिहितात "रिकामपणाची कामगिरी या सदराखाली काही लेखांक लिहून रिकामडेकडयावेळी मला जे काही अनुभव आले ते वाचकांपुढे ठेवण्याचा संकल्प केला आहे. वाचकांनीसुद्धा अगदी रिकामपणी ही वाचनाची कामगिरी उरकून घेण्याची कृपा करावी. म्हणजे या बडबडीपासून काही फायदा झाला नाही, तरी वेळ फुकट गेल्यावद्दल बिचाऱ्या बाळकरामावर दातओठ खाण्याचे कारण

राहणार नाही. 'वरसंशोधन', 'ठकीच्या लग्नाची पूर्वतयारी' आणि 'स्वयंपाकघरातील गोष्टी' हे तीन लेखांक या लेखमालेतील अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसरे प्रसंग समजून आजचा लेखांक चौथा समजावा.' वरील पत्र दिनांक ५ मे चे असल्यामुळे गडकऱ्यांनी मे महिन्याच्या अंकासाठी लेख अगोदर पाठविला असणार हे उघड आहे.

सदरहू पत्रात विनंती केल्याप्रमाणे गडकरी मित्रांना तेवढ्या कालावधीत मुंबईत येऊन भेटले, की नाही हे समजण्यास काही आधार सापडत नाही. परंतु ते भेटले नसावे असे वाटते. मात्र जूनच्या अंकात त्यांची 'हुरहूर' ही कविता प्रसिद्ध झाल्याचे आढळते. गडकऱ्यांचे लेख आणि कविता ह्या मासिक मनोरंजनात प्रसिद्ध होत असल्यामुळे पत्रात लिहिल्याप्रमाणे गडकऱ्यांच्या लोकप्रिय लेखनामुळे त्यांच्यावर व पर्यायाने संपादक या नात्याने मित्रांच्यावर अनेकजण जळत होते. त्यामुळे मित्रांना काही अंशी व्यवसायाला तोटा झाला असण्याची शक्यता आहे. परंतु एवढे असूनही मित्रांचा लोभ गडकऱ्यांवर कायम होता.

अकाल सूर्यास्त

पुढे गडकऱ्यांचे दिनांक २३ जानेवारी १९१९ रोजी निधन झाले. तेव्हा "मासिक मनोरंजनाच्या जानेवारीच्याच अंकात पुढील बातमी प्रसिद्ध करण्यात आल्याचे दिसते. "मासिक मनोरंजनाचे सुप्रसिद्ध लेखक, महाराष्ट्राच्या आधुनिक कविमंडळातील श्रेष्ठ कवी, मार्मिक विनोदी लेखक व कुशल नाटककार श्रीयुत गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी) हे दि. २३ जानेवारी रोजी परलोकवासी झाले हे कळविण्यास आम्हाला अत्यंत दुःख वाटते. त्यांचे सचित्र चरित्र फेब्रुवारीच्या अंकात देण्यात येईल."

आणि फेब्रुवारीच्या अंकात गडकऱ्यांचे परममित्र श्री. वि. सी. गुर्जर यांचा 'अकाल सूर्यास्त' हा अविस्मरणीय लेख फोटोसहित प्रसिद्ध झाला. आजही हा लेख गडकऱ्यांसंबंधी माहिती मिळविण्यास उपयुक्त ठरतो. या लेखाच्या प्रारंभी छापण्यात आलेला फोटो गडकऱ्यांच्या इतर फोटोपेक्षा वेगळा ठरतो. या फोटोखाली 'गोविंदाग्रज' आणि 'बाळकराम' या नावांनी वाचकास परिचित असलेले मनोरंजनाचे प्रतिभासंपन्न कवि आणि लेखक प. वा. राम गणेश गडकरी अशी माहिती देण्यात आली आहे. या माहितीत गडकऱ्यांचा जन्म मे १८८५ दिला आहे. याचा अर्थ मासिक मनोरंजनकडे गडकऱ्यांचा जन्मदिनांक उपलब्ध नसावा.

ह्या गाजलेल्या 'अकाल सूर्यास्त' लेखाच्याखाली पुढील प्रमाणे माहिती छापण्यात आली आहे—

'मनोरंजनाची भेट— 'राजहंस', 'दसरा', आणि 'केशवसुत' या मनोरंजनात प्रसिद्ध झालेल्या गोविंदाग्रजांच्या तीन कविता त्यांच्या प्रथम मासिक दिनाच्या स्मरणार्थ मनोरंजनाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्या असून हे चिमुकले पुस्तक अर्धा आण्याचे तिकीट पाठविणाऱ्यास १० मार्च पर्यंत अगर पुस्तके शिल्लक असतील तोपर्यंत फुकट पाठविण्यात येईल. प्रती नियमितच काढल्या असल्यामुळे त्वरित मागणी करावी."

यावरून असे दिसून येईल, की गडकऱ्यांच्यासारख्या प्रतिभावान लेखकाला सतत प्रसिद्धी देऊन त्यांच्या मृत्युनंतरही त्यांच्या स्मृतीची ज्योत प्रज्वलित करण्याचे अवघड कार्य मासिक मनोरंजनाने केले. यातच या दोघांचे अतूट नाते दिसून येते.

△ △

ज. वा. कुळकर्णी
१५, हरिहर निवास, रामनगर
डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे

मुक्तिबोधांची मानुषतेची संकल्पना

स. त्र्यं. कुल्ली

'नवी मळवाट' आणि 'यात्रिक' या काव्यसंग्रहांनी मुक्तिबोधांनी मराठीतील एक श्रेष्ठ कवी म्हणून स्थान प्राप्त केले. तसेच 'काही निबंध', 'जीवन आणि साहित्य' व 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' या ग्रंथांनी मराठीतील जीवनवादी समीक्षेला भक्कम तात्त्विक आधार प्राप्त करून दिला. त्यांच्या मानुषतेच्या संकल्पनेने साहित्यशास्त्राला एक नवे, वैशिष्टचपूर्ण वाङ्मयीन मूल्य दिले आहे.

मानुषतेची संकल्पना त्यांनी आपल्या 'सृष्टी, 'सौंदर्य' आणि साहित्यमूल्य' या ग्रंथात मांडली आहे. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे मुक्तिबोधांच्या आयुष्यभराच्या चिंतनाचा परिपाक आहे. हा केवळ साहित्यसमीक्षा करणारा ग्रंथ नाही. तर साहित्य आणि सौंदर्याबरोबरच जीवनमूल्यांचेही शोधन करणारा ग्रंथ आहे.

साहित्याच्या श्रेष्ठ–कनिष्ठतेचा निकष कोणता ? साहित्यमूल्य कोणते ? ललितवाङ्मयकृतीचे संघटक तत्त्व कोणते ? हे समीक्षेतील मूलभूत प्रश्न आहेत. भारतीय साहित्यशास्त्राने 'रस' हे मूल्य मानले. तर मर्ढेकरांनी 'लयतत्त्व' हे वाङ्मयीन मूल्य मानले.

रसतत्त्व प्राचीन संस्कृत साहित्यकृतींना कदाचित् लागू पडेल. पण अर्वाचीन साहित्यासाठी ते अपुरे आहे. खरे म्हणजे प्राचीन महाकाव्यांनाही ते न्याय देऊ शकत नाही. उदा. महाभारतासारख्या विराट आणि व्यामिश्र शोकात्मिकेचे केवळ 'रसविच्छेदन' करून तिचे आकलन होऊ शकेल काय ? मग आधुनिक साहित्यातील बदललेले जीवनसंदर्भ व अनेक पातळ्यांहून घेतलेला जीवनशोध यांच्या आकलन, आस्वाद आणि मूल्यमापनासाठी रसतत्त्वासारखे कालबाह्य वाङ्मयीन मूल्य काय उपयोगी पडणार ?

रसतत्त्वालाही धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांचा म्हणजे जीवनमूल्यांचा आधार असल्याने रसतत्त्वाची उपयुक्तता आजही आहे, असे कोणी म्हणेल. पण एकतर ज्या चातुर्वर्ण्यात्मक समाजव्यवस्थेची ही जीवनमूल्ये होती ती सरंजामी व्यवस्था केव्हाच काळाच्या उदरात गडप झाली आहे. दुसरे म्हणजे ज्या बहुजनसमाजाला 'अर्था'पासून, स्त्रीशूद्रादिकांना 'धर्म आणि मोक्षा'पासून वंचित करून पशुपातळीवरील 'काम' फक्त शिल्लक ठेवले होते, ते या आध्यात्मिकतेचा बुरखा पांघरलेल्या स्वार्थी हितसंबंधांना मानतील काय ? विशाल मानवी जीवनाचे आणि साहित्याचे अधिष्ठान ही संकुचित तत्त्वे राहू शकतील काय ? मुक्तिबोधांच्या शब्दात सांगायचे म्हणजे, "ज्याला डॉ. ग. त्र्यं. देशपांडे पुमर्थनिष्ठा म्हणजे शास्त्रकारांची जीवननिष्ठा असे म्हणतात, ती दुसरी तिसरी काही नसून अभिजात वर्गीय आचारांचे व विचारांचे आदर्श नाटकात आणलेच पाहिजे अशी सक्ती करणारी शास्त्रकारांनी ठरवून दिलेली व परंपरेने मान्य केलेली अशी अवश्योपाधी आहे."

मर्ढेकरांनी 'भावनानुभूतीतील घटकांची लयबद्ध रचना' म्हणजे वाङ्मयकृतीचा घाट असे म्हटले. लयतत्त्व हे त्यांच्या दृष्टीने वाङ्मयकृतीचे संघटक तत्त्व आणि साहित्यमूल्य आहे.

मुक्तिबोधांनी या मतातील फोलपणा स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, स्वतःच्या गुणधर्मानुसार रंग किंवा नाद जवळ येताच त्यांच्यामध्ये संवाद विरोधाचे नाते उत्पन्न होऊ शकते. परंतु भावार्थाचे घटक स्वतंत्रपणे परस्परांशी संवादी किंवा विरोधी असू शकत नाहीत. समजा आपण काही उत्कृष्ट कलाकृतींमधील भिन्न भिन्न रसांचे घटक घेऊन ते लयतत्त्वानुसार एकत्र केले तर ? 'एकच प्याला'मधील करुण प्रसंग व 'संशय कल्लोळ'-मधील विनोदी प्रसंग यांच्या 'विरोध लयातून' सौंदर्य निर्माण न होता 'एकच हास्यकल्लोळ' तयार होईल. सारांश, ललितकृतीमधील घटकांमध्ये संवाद–विरोध संबंध निर्माण होतात ते त्या मागील मूल्यात्म संदर्भामधूनच होऊ शकतात.

मुक्तिबोधांच्या मते लयतत्त्व हे सृष्टीचेच तत्त्व आहे. सृष्टिरूपांमध्ये सर्वत्र समांगता (Symmetry) आढळते ती ऊर्जेच्या (energy) पहिल्या नियमामुळे (First law of thermodynamics). लयबद्धता ही साहित्यकृतीची अवश्योपाधी आहे. लयनिष्ठता हे निसर्गशास्त्रीय तत्त्व आहे, सौंदर्यशास्त्रीय नाही.

वाङ्मकृतीचे जीवनसापेक्ष स्वरूप स्पष्ट करताना भाषा, कलावंताची जाणीव, तिचा आधार असलेली मूल्यव्यवस्था ह्या गोष्टी सामाजिक देणग्या आहेत हे अत्यंत तर्कशुद्धपणे मुक्तिबोध दाखवतात.

साहित्य–सौंदर्य आणि जीवनमूल्य यांचे एकात्म दर्शन 'मानुषते'च्या तत्त्वात घेऊन तत्त्वचिंतनाची उत्तुंग झेप त्यांनी घेतली आहे. हा वैश्विक दृष्टिकोण त्यांना मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने प्राप्त झाला हे उघड आहे. मार्क्सवादी जीवनदर्शनाची आर्थिक, राजकीय, सामाजिक, तत्त्वज्ञान, कला अशी अनेक दालने आहेत. यातील एकेक दालन विस्तृत आणि वैभवशाली आहे. ही सारी दालने ओलांडून मार्क्सच्या 'दी जर्मन आयडिआलॉजी'पर्यंत, त्याच्या सर्वात गूढ–गहन तत्त्वज्ञानाच्या गुहेपर्यंत फारच थोडे पोहोचतात. मुक्तिबोध त्या अपवादात्मक मराठी विचारवंतांपैकी एक आहेत.

मार्क्सच्या 'परात्मता' (Alienation) या विचाराच्या अनुषंगाने मुक्तिबोधांनी आपली मानुषतेची संकल्पना मांडली आहे.

मानव आणि निसर्ग यात मूलतः एकात्मता आहे; आंतरिक नाते आहे. मानवाच्या सृष्टीविषयीच्या आस्थेतून हे ऐक्यच प्रकट होत असते. हेच माणसाचे आंतरिक असणे (essence); मानुषता आहे.

माणसाला 'स्व'ची जाणीव होते, अस्तित्वाचे भान येते आणि हे ऐक्य भंगते. मनुष्य निसर्गापासून दुरावतो. हीच परात्मता होय.

'स्व'ची जाणीव होणे हे माणसाचे सर्वोच्च सुख आणि महत्तम दुःख आहे. आपल्या मूळ रूपापासून, निसर्गापासून आपण ढळलो ही मानवाची वेदना आहे; आणि ती मानवी सामाजिक अस्तित्वामधून अटळपणे उद्भवली आहे. कारण अस्तित्वाचे भान नसलेला मानव पशूच्या पातळीवर असतो. तो निसर्गाशी एकरूप असूनही या अनुभूतीचा आस्वाद घेण्यास अपात्र असतो. मानवाला माणूसपण समाजातच प्राप्त होते. समाजविकासाच्या एका टप्प्यावर त्याला बुद्धी, संस्कृती, जीवनमूल्ये या श्रेष्ठ गोष्टी प्राप्त होतात. आपल्या अस्मितेची त्याला जाणीव होते आणि सृष्टीपासून तो दुरावतो.

पण मार्क्स इतिहासाला एक दिशा आहे असे मानतो. मानवाचा हजारो वर्षांचा इतिहास हा वर्गकलहाचा इतिहास आहे. या वर्गीय समाजातील माणसाला आपण जे मुळात आहोत त्यापेक्षा विपरित जगतो आहोत असे वाटते. स्वतःच्या स्वभावांतर्गत आंतरिक सत्त्वाला मुरड घालीत जगावे लागते. मानुषता हीच परात्मभावाची वेदना निर्माण करते, संबंध विच्छेदाची यातना प्रत्ययाला आणून देते आणि आदर्शाचे स्वप्नही उभे करते.

समाजाची प्रगती अशा दिशेने घडवून आणता येते, की जिथे आंतरिक सर्व मूल्यांचे जतन करीत संपूर्ण जागरूक पातळीवर माणूस सामाजिक मानव बनेल व नैसर्गिक मानुषता असलेला मानव व

अनुक्रमणिका

सामाजिक मानव यामध्ये कोणताच भेद उरणार नाही. या आदर्श समाजातच–साम्यवादी समाजात–परात्मता नष्ट होऊ शकेल.

मुक्तिबोधांच्या मते मानुषता हे सामाजिक मानवाचे आंतरिक असणे असून ते बदलत्या सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान आहे. सामाजिक मूल्यात्म जीवन हा मानवी व्यावहारिक अस्तित्वाचा एक पैलू आहे; तर मानुषता हा त्याच मानवी अस्तित्वाचा दुसरा पैलू होय. एक परिवर्तनशील तर दुसरा शाश्वत–अस्तित्व (existence) समाजाच्या संस्थात्मक स्थैर्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांमधून प्रत्यक्ष जीवनव्यवहार-रूपाने साकार होते; तर सत्त्व (essence) जीवनव्यवहारातून सदोदित प्रतीत होते.

ही मानुषता सदा सर्वकाळी आढळून येते. ती असते म्हणूनच माणूस आपल्या स्वार्थी–वर्गीय हितसंबंधांच्या पलीकडे जाऊन वर्गातीत होऊ शकतो. अखिल मानवतेचे प्रतिनिधित्व करू शकतो. ज्याला आपण शाश्वत मानवी मूल्य म्हणतो ती या मानुषतेच्या अधिष्ठानावरील मूल्ये होत.

मानुषता म्हणजे केवळ मानवतावाद नव्हे. तो मानुषतेचा विशिष्ट काळातील मूल्यरूप आविष्कार आहे. कारण त्यात फक्त मानवामानवातील प्रेम गृहीत धरले आहे. उलट मानुषता ही एक अनुभूती आहे व ती मानवासह सृष्टीजाताशी एकात्मतेने, आंतरिकतेने निगडित असण्याचे मानसिक सत्य आहे. तसेच मानव हा निसर्गांश, मॅटर असल्याने ते एक वैज्ञानिकही सत्य आहे.

मुक्तिबोधांच्या मते मानुषतेची जाणीव हीच कलाकृतीच्या विविध घटकांमध्ये संगती निर्माण करणारे संघटक तत्त्व आहे. सौंदर्यतत्त्व आहे. मानुषता हेच साहित्याच्या श्रेष्ठ–कनिष्ठतेचे मूल्य आहे; साहित्यमूल्य आहे; आणि मानुषता हेच मानव व निसर्ग यांच्या अस्तित्वाचे अधिष्ठान आहे, जीवनमूल्य आहे. म्हणून आपल्या ग्रंथास मुक्तिबोधांनी 'सृष्टी, 'सौंदर्य' व साहित्यमूल्य असे नाव दिले आहे.

मुक्तिबोधांचे विवेचन सूत्ररूपाने असे सांगता येईल–

मानुषता × मानवी सामाजिक अस्तित्व =
नैसर्गिक मानुषता असलेला मानव × सामाजिक मानव =
} परात्मता

(× विरोधाचे चिन्ह)

मानुषतेची अनुभूती

↗ ↖

सामाजिक अस्तित्व Externalization

↓ बाह्य; व्यावहारिक अस्तित्व
↓ Social existence
↓ निसर्गाशी द्वंद्व; त्याला बदलवीत स्वत: बदलणे
↓ समाजधारणेसाठी, स्थैर्यासाठी आवश्यक जीवनमूल्याधिष्ठित
↓ प्रत्यक्ष व्यवहारात साकार होणारे
↓ इतिहास–कालसापेक्ष
↓ अपरिहार्यता; सामाजिक नियती
↓ Becoming; व्यवहार

सत्त्व Self

↓ आंतरिक अस्तित्व; असतेपण
↓ essence
↓ निसर्गाशी आंतरिक एकात्मता साधणे व असतेपणाची
↓ being ची अनुभूती भोगणे. समाज-निरपेक्ष; सर्व जीवनमूल्यांचे अधिष्ठान
↓ जीवन व्यवहारातून प्रतीत होणारे
↓ इतिहासगर्भात अनुस्यूत; कालनिरपेक्ष
↓ स्वातंत्र्य; स्वयंनिर्णय
↓ Being; स्वभाव

↘ ↙

मानुषता
(सामाजिक मानवाचे आंतरिक असणे)

मुक्तिबोधांच्या मानुषतेच्या संकल्पनेला सामाजिक अस्तित्वाद म्हणता येईल काय ? Existentialism of man in society असे म्हणता येईल काय ?

मार्क्सवाद + अस्तित्ववाद = मानुषता = मुक्तिबोधांचा सामाजिक अस्तित्ववाद, Existentialism of social human being असे म्हणता येईल का ?

मनुष्य हाच निसर्गांश, मॅटर आहे आणि मॅटरचे विरोधी रूप कॉंशसनेस, जाणीव ही मेंदूच्या कार्यरूपाने त्याच्याजवळच आहे. म्हणजे हे द्वंद्व माणसाचे शरीर, आदिम प्रेरणा विरुद्ध माणसाची जाणीव, संस्कृती असे आहे का ? मर्ढेकर म्हणतात तो 'शिवलिंग' आणि 'माझे लिंग' यांचा झगडा हाच का ? असण्याला ओळखणे हेच परमतत्त्व असते, असे मुक्तिबोध याच अर्थाने म्हणतात का ? विश्वातून वाहणारे तत्त्व मूर्त केव्हा होते ? की ती फक्त अनुभूतीच असते ? मानुषतेचा आपण लावलेला अर्थ तरी बरोबर आहे का ?

खरे म्हणजे या प्रश्नांची उत्तरे मुक्तिबोधांशी चर्चा करूनच मिळवायची होती. जी. एं. चे मूल्यमापन तुम्ही कसे कराल हा मनाला सतावणारा प्रश्नही त्यांना विचारायचा होता. पण आता...

स. त्र्यं. कुल्ली
जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा

विदर्भ साहित्य संघ नागपूर

निमंत्रण

माननीय सभासद
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

सप्रेम नमस्कार विनंती विशेष

वि. सा. संघाच्या वतीने वर्षभर सतत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या सर्व कार्यक्रमांची वैयक्तिक निमंत्रणे सर्व सभासदांना पाठविणे आर्थिकदृष्ट्या व व्यवहाराशःही अशक्यच असते.

वृत्तपत्रात प्रत्येक कार्यक्रमाचे निवेदन स्थानिक/आजचे कार्यक्रम सदरात प्रसिद्ध होत असते. वि. सा. संघाच्या सर्व सभासदांना आग्रहाची विनंती आहे की हे निवेदन म्हणजेच कायमचे आग्रहाचे निमंत्रण समजून सर्व कार्यक्रमांना आपण अगत्यपूर्वक उपस्थित राहावे.

कळावे, लोभ आहेच. कार्यक्रमास उपस्थित राहून त्यात वृद्धी करावी.

आपले

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस

राम शेवाळकर
अध्यक्ष

अनुक्रमणिका

कविता आणि विज्ञानकविता

शिरीष गोपाळ देशपांडे

मी विज्ञान कविता लिहायला सुरुवात केली तेव्हा मला एका कणानेही कल्पना नव्हती की आपण काही आगळे वेगळे करीत आहोत.

तेव्हा, म्हणजे ६८–६९ साली, मी नागपूरला इन्स्टिटयूट ऑफ सायन्समध्ये शिकत होतो. प्रेमकविता लिहीत होतो. ती कविता बऱ्यापैकी होती. ['लिटमस' (१९७३) च्या सुरुवातीच्या पानात ती आहेच.] शब्द, वृत्त आतींवर हुकुमत होतीच. काव्यप्रकाराचा जाणीवपूर्वक अभ्यासही चालला होताच.

एकदा असाच प्रयोगशाळेत चंबू तापायला ठेवला होता. थोडा वेळ होता. कविता लिहावेसे वाटत होते. मी कविता लिहिली. ती कविता अडगळीतही पडली असती. गंमतीशिवाय तिला कोणी मोल दिले नसते. अशा कवितेकडे कोणी लक्षही दिले नसते. पण विज्ञानाच्या काही विद्यार्थ्यांनी भरवलेल्या एका कविसंमेलनात मी ती कविता वाचली. गंमत म्हणून वाचली. म्हटले, विज्ञानाच्या विद्यार्थ्यांची थोडी करमणूक होईल. विद्यार्थ्यांनी ती कविता डोक्यावर घेतली. कवी अनिल ऊर्फ आ. रा. देशपांडे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी अपरिमित आनंदाने ती कविता डोक्यावर घेतली. आणि विद्यार्थीदशेतच एका नव्या पद्धतीची कविता मी लिहिल्याबद्दल माझे जाहीर कौतुक केले. त्यांनी त्या कवितेला व तशा पद्धतीच्या मी लिहिलेल्या काही कवितांना 'विज्ञानकविता' हे नाव दिले व आपल्या अध्यक्षीय समारोपात हेच नाव वारंवार उच्चारले.–ज्या कवितेमुळे हे घडले तीच ती 'लिटमस' कविता.

नागपूर विद्यापीठातले मराठीचे ख्यातनाम प्राध्यापक मधुकर शंकर वाबगावकर ह्यांनी नंतर एका समारंभात म्हटले की विज्ञानकवितांमुळे मराठी कविता मर्ढेकरी कवितेच्या दोन पावले पुढे गेली आहे. अकोल्याच्या साहित्य संमेलनात मुंबई विद्यापीठातल्या प्राध्यापिका उषाताई देशमुख ह्यांनी म्हटले की एकाच साचात मर्ढेकरोत्तर कविता फिरत असताना जे दोन महत्त्वाचे प्रवाह तिला वाट करून देऊ इच्छितात त्यांत विज्ञानकवितेचा प्रवाह फार महत्त्वाचा ! डॉ. व. दि. कुळकर्णी, डॉ. गो. म. कुळकर्णी आदी नामांकित टीकाकारांनी फार जिव्हाळयाने ह्या प्रकाराकडे, सुरुवातीपासूनच पाहिले आहे.

त्याउलट नारायण कुळकर्णी कवठेकर आदी आमच्या काही मित्रांनी ह्या प्रकाराकडे कुचेष्टेने पाहिले. तर अनेकांनी तटस्थ भूमिका घेऊन 'काय होते ते पाहू' हे धोरण अंगीकारले.

मी सुरुवातीलाच सांगितले आहे की ह्या प्रकार मी डोळसपणे निर्माण केला नाही. मी १९७४ साली पहिला स्ट्रीट प्ले केला तेव्हाही मला वेगळे काही वाटले नव्हते. पण ह्यांतील वेगळेपण आणि त्यांचे सामर्थ्य लोकांनी लक्षात घेऊन मला त्याची जाणीव करून दिली. मी नाटकात वेगवेगळे नवनवे प्रयोग करत राहिलो पण स्ट्रीटप्ले परत केला नाही. मात्र कवितेत विज्ञानकवितेला सोबत घेऊन चालत राहिलो.

तरुण भारताच्या मामा घुमऱ्यांनी मला तेव्हा जो सुरुवातीला प्रश्न केला होता तोच प्रश्न अजूनही अनेक लोक मला करीत असतात, 'विज्ञानकविता म्हणजे काय ?'

खरे सांगायचे तर विज्ञान कविता म्हणजे काय हे अद्याप पुरते मलाही कळलेले नाही. 'लिटमस' प्रकाशित झाल्यानंतर उठलेल्या एका प्रकाशित वादविवादात मी विज्ञानकवितेचा एक पैलू स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. तो प्रतिमेच्या संदर्भातला होता. विज्ञानकवितेबद्दल मी अकोल्याच्या साहित्यसंमेलनात संशोधन पत्रिका वाचली होती. आणि मुंबई विद्यापीठात नंतर एक पत्रिका वाचली. [ती युगवाणीत (जुलै–ऑगस्ट १९८४) प्रकाशित झाली आहे. ती एकंदरच विज्ञान-साहित्याबद्दल आहे.]

विज्ञानकथेबद्दल जशी वर्तुळे आखता येतात– की, विज्ञान काल्पनिका, तीत समस्याच वैज्ञानिक असेल तर मग ती विज्ञानकथा आणि केवळ समस्याच नव्हे तर दृष्टीही विज्ञानाची असेल तर 'खरीखुरी विज्ञान कथा'–तशी वर्तुळे कवितेत आखणे धोक्याचे ठरेल, असे मला वाटते.

विज्ञानकवितेकडे जाण्याचे काही मार्ग असू शकतात. उदाहरणार्थ (i) विज्ञानाच्या प्रतिमांचा वापर. (ii) विज्ञानावर भाष्य. (iii) विज्ञान-युगाची स्तोत्रे. (iv) विज्ञानाच्या समस्यांचा काव्यात्म अनुभव. (v) विज्ञानाच्या दृष्टीतून सर्व जगाचा अनुभव. वगैरे.

–हे काही मार्ग दृष्टीपुढे आणून मला हे कबूल केले पाहिजे की ह्या पाच आणि इतरही काही पद्धतीने मजकडून विज्ञान कविता लिहिली गेली आहे. कविता म्हणून कोणत्याही प्रकारातली एखादी कविता सरस ठरली असेल. परंतु ती अगदी खरीखुरी विज्ञानकविता ठरेलच, असे नाही.

मी अजूनही खऱ्याखुऱ्या विज्ञानकवितेच्या शोधात आहे. आणखी वेगळी आणि उज्ज्वल विज्ञानकविता मजकडून निर्माण होऊ शकेल. पण सध्या मी लिहिलेल्या आणि मी निर्मिलेल्या विज्ञानकवितेचा मार्ग चोखाळणाऱ्या ज्येष्ठ कवी श्री. बा. रानड्यांपासून कु. माकोडे यांजपर्यंतच्या उत्तरकालीन कवितांचा विचार करता विज्ञान-कवितेचे निखळपण कोणत्या प्रकारच्या कवितांना लाभावे, ह्याचा शोध घेणे आवश्यक आहे.

विज्ञानकविता म्हणजे काय ?

कविता ही प्रथम कविता असली पाहिजे. मग तिला कोणी स्वतःचे वा बहुमान्य निकष लावोत. कविता ही कविता असणे आवश्यक आहे. निबंध किंवा प्रहसन नको.

प्रेमकविता, दलित कविता आदी प्रकारांत जशी त्या त्या भावनांची स्पंदने असतात किंवा असावी लागतात तशी विज्ञानाची स्पंदने असतात काय ? नाही. अशी विज्ञानाची स्पंदने नाहीत. विज्ञान भावना आतून निर्माण होऊ शकत नाही. वैचारिक कविता जशी विचार काव्यात्म करणारी किंवा विचारप्रवर्तन करणारी वगैरे असावी लागते तशी विज्ञान कविता विज्ञान काव्यात्म किंवा प्रवर्तित करणारी नसते. स्पंदनांचा वा प्रवर्तनाचा विचार केल्यास ती अनुक्रमे भाष्य कविता वा स्तोत्र-कविता ठरेल. प्रेम किंवा जातिभेद जसा आपल्या आतपर्यंत धडकला आहे तशी विज्ञानाची धडक आपण कितीही जिव्हाळ्याने मांडली तरी ती भाष्य कविता ठरेल.

म्हणजे इतर कवितांचे जे प्रतिष्ठित मार्ग आहेत ते विज्ञानकवितेला पतित करणारे ठरू शकतात. मग भावना आणि विचाराचे विज्ञान कवितेला वावडे आहे काय ? तसे असेल तर विज्ञान-कवितेला अस्तित्वात येण्यापूर्वीच 'मृत' घोषित करावे लागेल.

विज्ञान ही एक संगती आहे.

विज्ञानकविता ही प्रेमकविता, दलितकविता, वैचारिक कविता, आध्यात्मिक कविता, अगदी वाट्टेल त्या प्रकारची असू शकते. विज्ञानकविता हा कवितेचा खण, कंपार्टमेंट नाही. विज्ञानकविता हा कवितेचा उत्कर्ष आहे.

विज्ञान ही एक दृष्टी आहे.

जगातली प्रत्येक बाब कुणाला वैज्ञानिक दृष्टीतून पाहता येईलच असे नाही. पण ह्या दृष्टीतून ह्या संगतीने आपल्या प्रतिक्रियांचे काव्यात्म विश्लेषण आपल्याला करता आले तर विज्ञान कविता जन्म घेऊ शकेल असे मला वाटते.

विज्ञानकविता ही एक व्यापक संकल्पना आहे. परमाणूच्या पोटापासून जगाच्या पाठीपर्यंत सर्वत्र तिचा विशेष वावर आहे. जीवचैतन्याच्या आण्विक संरचनेपासून विश्वोत्पत्तीच्या परमाण्विक रचने-पर्यंत तिचा शिस्तबद्ध पण मुक्त व्यापार आहे.

अनुक्रमणिका

ह्या दोन ध्रुवांना जोडणाऱ्या प्रत्यंचेवर जगातली प्रत्येकच बाब येणार नाही का ?

विज्ञानाच्या दृष्टीतून, विज्ञानसंगतीतून आपला अनुभव काव्यात्म रूप घेऊ शकतो. संगतिसंकर केवळ शक्यच आहे असे नाही तर तो सौंदर्यशाली आणि बलाढ्य बाळाला जन्म देणारा आहे, असा माझा दावा आहे.

एका कवितेचे स्थूल स्पष्टीकरण

विश्व जन्माला आले आणि सृजनातच इति-कर्तव्यता आहे हे माझ्या चकितमनस्कतेला जाणवले ते 'अवतरण' कवितेत प्रकट झाले आहे. निर्मिति-प्रयत्नातला सततचा फोलपणा आणि क्वचित्‌ची फलद्रूपता ही लक्षात घेण्याजोगी आहे. पण ह्यावर माझ्या हातून निबंधरचना घडली नाही. एक अंतर्मनातील, एक सामाजिक, एक भौतिक... अशी कितीतरी अस्वस्थ सत्ये मला घुसमटून ह्या कवितेत तोल धरून उभी व्हायला ठाकली.

आकाशात कित्येक तारकाविश्वे आहेत. आपल्या तारकाविश्वात अब्जावधी सूर्य आहेत, आपल्या सूर्यमालेत फक्त पृथ्वीवरच जीवसृष्टी आहे. आपल्या तारकाविश्वांत काही भाग्यवान सूर्यांनाच असे ग्रह प्राप्त असतील. ते ग्रहही भाग्यवान. काही तारकाविश्वे 'निर्जीव'ही असतील.

वर्षावाला सरसावलेले सर्वच ढग सृजन करतील असे नाही. सर्वच संभोग फळतात असे नाही.

माणूसही निर्मिती करतो– ती केवळ लेकरांचीच नव्हे, तर नव्या वस्तूंचीही...म्हणून गिरणवाड्यांचा संदर्भ.

सृजनाची आसक्ती आहे की संभोगाचीच ? सृजनाची, विश्वाला पुरून उरणाऱ्या, सामर्थ्याची (ब्रह्माची ?) माझ्यातली इच्छा घटत आहे का– आणि मी ही अभागी, वांझ, निर्जीवपण जोपासणार आहे का ? कोणते का असेना– माझी सृजनाची इच्छा सतत उत्कट राहणार आहे की नाही ?

आता, 'गडद जांभळा उजेड' कशासाठी ? नीलसूतीचा भन्नाटा निकट येणे दर्शवतो.

कवितेचा अर्थ अगदी बारीक सारीक तपशीला-सह उकलून दाखवणे हा माझा व्यवसाय आहे. परंतु मी येथील सर्व अर्थ, सर्व मनीषा स्थूलपणेच व्यक्त केल्या आहेत.

(परंतु, ह्या एका उदाहरणामुळें इतर कविता-कडे आपण आणखी काळजीपूर्वक पाहू, असे वाटते. संदर्भव्यूहाच्या टीपा सोबत प्रकाशित सर्वच कवितांना आहेत.)

कवितेचे कार्य

कविता आपले मनोरंजन करण्यासाठी असते, असे समजणाऱ्यांत मी नाही. कवितेने मनोरंजन करावे. पण, मनोरंजनच करावे, असे समजणे हे कवितेला अन्यायकारक आहे. आपल्या अनामिक, अविश्लेषित अस्वस्थतेला प्रगाढ शांततेत रूपांतरित करणे हे कवितेचे खरे कार्य आहे मग ती भाव-कविता, विचार कविता, वैश्विक कविता कशीही असो. कविता आपल्याला उन्नत करते.

कोणती कविता आपल्याला भावते ?

(१) आपल्याला माहीत असलेलं ती काव्या-त्मतेने सांगते तेव्हा (२) आपल्याला जाणवलेलं पण शब्दांनी व्यक्त करता येत नाही ते शब्दांनी व्यक्त करते तेव्हा (३) आणि आपल्याला माहीतही नाही आणि जाणवलेलंही नाही, असं काही तरी आपल्यापुढे मांडते तेव्हा कविता आपल्याला 'अपील' होते.

सार्वत्रिक अर्थाने सध्याची विज्ञानकविता 'कवितेचे कार्य' करते की नाही, माहीत नाही.

कालिक अर्थाने सध्या तिचे भावणे मात्र क्रमांक तीनच्या कप्प्यात असावे, काहींसाठी ते एक आणि दोन मध्येही असेल. एक आणि दोन ह्या विभागातील संख्या जेव्हा तीनपेक्षा वाढेल तेव्हा विज्ञान कवितेला बरे दिवस येतील. 'काळ' हाच त्यावरला उपाय आहे.

बरे दिवस

विज्ञानसाहित्याला अजूनही वाईट दिवस आहेत त्याचे कारण वैज्ञानिक व विज्ञान साहित्याचे निर्माते हेच होय ! 'विज्ञान आणि साहित्य' (संदर्भ उपरि-निर्दिष्ट) ह्या संशोधनपत्रिकेत त्याची मीमांसा करणे अनिष्ट होते. फ्राईड आणि मार्क्स ह्यांनी साहित्य व्यापले आणि आईन्स्टाईन अस्पर्श राहिला ह्याचे कारण वैज्ञानिक आणि विज्ञान साहित्यिकच आहेत. कसे ?

(अ) मार्क्स हा सामाजिक विचार मांडणारा

होता. त्यामुळे त्याचा विचार समाजापर्यंत पोचवणे, तो फोफावणे, हीच पहिली गरज होती. तसे झाले. त्यातून त्याच्या पंथाचे (वा त्याला विचारात न घेणारेही) साहित्य निर्माण झाले.

विज्ञान हे समाजात जीवनानुभव म्हणून न येता 'अभ्यास' म्हणून आले. आणि "आईन्स्टाईन हा फारच कठीण. तो आम्हाला कळला. (आम्ही थोर!) तुम्हाला तो कळणार नाही" अशा बढाया मारून वैज्ञानिकांनी त्याला तिजोरीत बंद करून समाजाच्या दूर लोटला. ब्रह्मगप्पा ही जशी काही लोकांची मिरासदारी झाली व ब्रह्म जास्तीत जास्त कठीण करून सांगण्याची अहमहमिका त्यांत लागली तसेच आईन्स्टाईनचेही झाले. मार्क्सप्रमाणे आईन्स्टाईन 'खुला' झाला असता तर विज्ञानाची दृष्टी समाजात आणि साहित्यात निर्माण होऊ शकली असती व विज्ञान–साहित्याला बहर आला असता.

(आ) आपल्या स्वत:च्या प्रेरणांना आणि मनाच्या खोल शिरण्याच्या मानवी इच्छांना फ्रॉईड-मुळे वेग आला. आणि नवसाहित्याची (कलात्मक मनोविश्लेषणाची?) लाट आली. हे मनोविश्लेषण मानसशास्त्रीय सिद्धांतांना धरून कधी नव्हतेच! अपरंपार कल्पनाविलासामुळेच हे मनोविश्लेषण साहित्यात आस्वाद्य झाले.

ज्या कल्पनाविलासामुळे नवसाहित्यातील मनो-विश्लेषणाला रंग चढला त्याच कल्पनाविलासाने विज्ञानसाहित्याचा घात केला. लागलेले शोध; असिद्ध सिद्धांत आणि पुराण परीकथा यांचमुळे विज्ञान कथा–कादंबरी ही मनोमैथुनाची सुखवस्तू झाली आणि समस्या व दृष्टी यांच्या गुरुत्वाकर्षणा-तून निसटून मनोवेगाने अंतराळात उडती झाली. अतिवास्तववादी चित्रे व साहित्य; मनाचा तळ शोधणारी कल्पना कुसर; आणि इतर विविध ढगांनी नवसाहित्य अजूनही समृद्ध होत जाईल. पण अवास्तव कथा आणि अंतराळाचा तळ गाठणारी बाष्कळ कथा विज्ञानसाहित्याचे अतोनात नुकसान करील.

आईन्स्टाईनचे सोपेपण शास्त्रज्ञांनी लोकांत पसरवणे आणि विज्ञानदृष्टीने लेखकांनी विज्ञान-समस्या सरसपणे सादर करणे यामुळे विज्ञान साहित्य हे बरे दिवस पाहू शकेल.

कथा–कादंबऱ्यांची अशी कथा आहे तर कवि-तेची बात दूरच!

शास्त्रीय वास्तवांची अचूक जाण आणि कवित्व-शक्ती ह्या काटेकोर बाबींची विज्ञान कवितेला प्राथमिक आवश्यकता आहे. कवित्वशक्ती नसलेले कित्येक मराठी कवी अतिवास्तवाच्या बुरख्याखाली शब्दबंबाळ होत आहेत. किंवा सामाजिक निबंध रचत आहेत. दोन्ही मार्ग सोपे आहेत. प्रथम कवित्वशक्ती हवी– ती असली तरी कल्पनाविलास आपल्या मनाचे खरे–खोटे उन्मेष आणि सामाजिक तणावे ह्यांना सोडून कोण शास्त्रीय वास्तवाचा विचार करील? आणि केलाच तरी दृष्टी विज्ञानाची होईल, असे कुठे आहे. विज्ञानाची दृष्टी आली तरी संगतिसंगर करण्याचे सामर्थ्य येईलच, हे कोणी सांगावे? म्हणूनच विज्ञानकवितेला बरे दिवस यायला आणि विज्ञानकवी निर्माण व्हायला बराच काळ जावा लागेल, असे दिसते!

शेवटी मी विज्ञान कवी असलो, आणि माझ्या हातून मराठीतच नव्हे तर जगात हा प्रकार प्रथम निर्माण झाला असला, तरी मी, वर नमूद केलेल्या निकषावर पुरेपूर कुठे उतरतो! अजून मलाही खूप चालावे लागणार आहे.

△ △

शिरीष गोपाळ देशपांडे
शंकरनगर, नागपूर

अनुक्रमणिका

नऊ विज्ञानकविता
शिरीष गोपाळ देशपांडे

अवतरण

गडद जांभळा उजेड आणि लक्ष लक्ष सूर्य
एखाद्याच थेंबातले फुलते फळते वीर्य
एक कुणी विश्वकर्मा पृथ्वीवरती येतो
निळे आकाश पाहायला तिला डोळे देतो

माझ्यापुढे फिके मुके दिसत आहेत ढग
हिरवी झाडे : गिरणवाडे; धुरात कळते धग
काल पाऊस पडला त्याचा अजून चिखल आहे
चिघळलेल्या जखमेसारखा अजून रस्ता वाहे

पेशी न् पेशी....तंतू न तंतू; संगीत वाजत गेले
परमाणूंच्या कणाकणात सरसावलेले भाले
पाऱ्यापेक्षा मन माझे जाते सारखे निसटत
अवकाशाला पुरून उरेल; तेच आहे घटत

□ □

अनावर ओढ

फिरफिरलो मी मला वाटले मंद
तू बसल्या जागी वृद्ध; जरी तुज तुझा नसे धरबंध

अंतराळ हे अनंत हिंडत गेलो
मी तरंगणारा तरंग तरळत तुलाच धुंडत गेलो

कृष्णखळग्याला कुठेतरी जखडून
जर असशिल तर मग कशी इथे
पण येशिल तू परतून ?

तू प्रकाशकण होशील
पण परत परत जाशील
तू शीघ्र लहर बनशील
पण करते कहर वळशील

जड जगताची ऋकच बंधने तोड
मन बनत मनोवेगात ये; तुझी अजित अनावर ओढ

□ □

'ओम्'फस्

नव्हती बाटली, नव्हते बूच, नव्हता राक्षस
एक कण वाढत वाढत झाला आक्रस

कोवळे मूल म्हातारपणी वाकत मेले
बूच लावल्या बाटलीबाहेर 'ब्रह्म'राक्षस

" आक्रस ! आक्रस ! आत जा ! बाहेर नको !
आला कसा ? जातो कुठे ?....यू टू ब्रूटस "

होत्याचे नव्हते करायचे होते झाले उलट
घोर तपात झाले पतन; सारे 'ओम'फस !!

□ □

जुळयाजुळयाने दुखणे

दिवा एक पेटला आडरानात
आकाश वाकले गहन निळया पानात

उजेड होता सुनासुना चरणात
परतीत कोंडला जाळ मुक्या मरणात

कर्कश पहिले एक रडू विजनात
आक्रोश आजचा मावेना गगनात

सर्वांगाने फुटत फुटे अवकाश
ह्या दिशा टाकती गळयामधे करपाश

प्रबळ वाहते नदी पूरपाण्यात
हा काळ घालतो गळा कुंद गाण्यात

बंड पुकारत ठणकतात कण येथ,
पण मुक्त व्हायचे-कसे सचेतन प्रेत

जुळयाजुळयाने दुखणे वाढत गेले
चल परत घरी; ने दिवटे फुंकरलेले.

□ □

अनुक्रमणिका

आवृत्ती

वस्तूपण होते तरी
वस्तू काहीच नव्हती
बीजकणांच्या फेऱ्यांची
जन्मगतीही नव्हती

तप करता करता
तुला कल्पिले मनात
आणि अद्वत सुखाने
मनोमय द्वंद्वगीत

काळ घेत तू जन्मली
आणि मीही साकारलो
विश्व जन्माला घालून
मनोमन विकारलो

– आज समोर येऊन
विसरली का ओळख
माझ्यासारखा नको का
तुला पोटचा बालक !

□ □

अमरता

काळ वाकला इतका
कणा मोडला आत्म्याचा
मोह मोडता येईना
इप्सितळाच्या खाटेचा

दिशा वाकल्या इतक्या
सत्य राहीना सरळ
दिव्यनाग वारुळात
गिळे मुकाट गरळ

एक जिन्नस फुटले
श्रम सर्वत्र लुटले
चोर चोरून नेतात
बुढ्या बुढीचे खाटले

उगा वटारतो कसा
तुझा डोळा, नारायणा !
कण क्षुल्लक तू !....करी
विश्व माझ्या पारायणा !!

□ □

आरसा

माझी सावली कशाची ?
– तुझा बांधला आवेश
तुला मुक्त केले तर –
माझा शून्यात प्रवेश

तुला मोकळे जगत
हवी तिथे हिंड–फिर
माझ्या आसऱ्याशिवाय
मात्र तुला नाही घर

कधी हसशी रुसशी
कधी केस मोकलते
माझे उदास अस्तित्व
कधी रंजते गांजते

माझी सावली कशाची ?
दिले तुला जग दान
चल आवर सावर
तुझे मोहमयी रान

माझ्यामध्ये तुझा आणि
तुझ्यामध्ये माझा असा
(लोक फसती भोवती)
खरा फिरतो आरसा

□ □

मेट्रायसीस (दोन)

१.

मी तू | मी तू
तू मी | तू मी

= मी 'मी' अन् तू 'तू'
तू – मी अन् मी – तू
मी. तू. अन् तू. मी.
'तू....तू....' अन् 'मी....मी....'

२.

मी तू | प्रेम कलह
मूल बाळ | घरी दारी

= मी प्रेम तर तू घरी
मूलप्रेम तर बाळ घरी
मी कलह तर तू दारी
मूल कलह तर बाळ दारी

□ □

अनुक्रमणिका

द्वैत

गाडी धावता धावता
तिचा एक कण झाला
मागे तम पुढे दिव्य
असा प्रवास चालला

कण पळता पळता
त्याने घेतली गिरकी
अतिअवकाशातल्या
चार मितींत पोरकी

पाच मितींत येताच
भेटे, गाडीच्या बाहेर,
अवकाशाच्या रहित
माझे मोक्षाचे माहेर

माझ्या एका निमिषात
तुझे लक्ष लक्ष फेर :
माथी घेऊन जगते
आता दुःखाचे डोंगर

तुझ्या इतक्या जवळ
राहे येऊन मी उभा
दिसू कसा ? बोलू कसा ?
सरे भेटण्याची मुभा

–मला एकट्याला नको
गाडीबाहेर ढकलू
गाडा कसाही चालू दे
दोघे मिळून हाकलू.

□ □

टीपा :

१. **अवतरण :** विश्वात परार्धावधी तारकाविश्वे (Galaxies) आहेत. आपल्या तारका-विश्वातही अब्जावधी सूर्य आहेत. परंतु काही सूर्यमालांतच जीवसृष्टी आहे. आपल्या-सूर्यमालेतही फक्त पृथ्वीवरच जीवसृष्टी आहे.

२. **अनावर ओढ :** जिचा शोध घेतला जात आहे ती कृष्णखळग्याला (black hole) जखडून आहे. त्यावर मात कशी करावी ?

३. **'ओम्' फस् :** विश्वोत्पत्ती – विस्तारण – आकुं-चन – प्रलय अशी विश्वाची आंदोलने आहेत. (तीच सर्वत्र प्रतिबिंबितही होतात.)

४. **जुळ्याजुळ्याने दुखणे :** ऊर्जा आणि पदार्थ; दिक् आणि काल आदी अतूट दुहेरी तण्णा-व्यांनी आपण बद्ध आहोत. विश्वोत्पत्तीच्या पार्श्वभूमीवर ह्या दुःखाचे स्वरूप आणखी जाणवते.

५. **आवृत्ती :** अवकाशातील आदिम परमाणुगर्भा-तून (primeval atomic nuclear-fluid) द्वैताभासाचे जग निर्माण झाले. दोघांच्या संयोगाने दोघांना 'एक' होता आले नाही. मात्र त्यांनी कुणाला जन्म दिला. हेच तथ्य जगत सर्वत्र आहे.

६. **अमरता :** मानवी जीवित हे दिक् (space) आणि काळ (time) ह्यांनी बद्ध आहे. ह्या बंधनावर मात करणे म्हणजे अमरता. अमरतेचा सोस आणि अमरतेचे दुःख हेही मानवी मनात असतेच.
[दिव्यनाग = Galaxy]

७. **आरसा :** पदार्थ म्हणजे बद्ध केलेली ऊर्जा (energy) होय. आणि मोकळी शक्ती ही पदार्थाच्या आश्रयाशिवाय अस्तित्वात असू शकत नाही.

८. **मेट्रायसीस :** अलजीव्राच्या खणात खाजगी आयुष्य टाकताच त्याचे जे मनोरंजक निष्कर्ष निघतात त्यांतील दोन उदाहरणे येथे आहेत.

९. **द्वैत :** संपूर्ण विश्व चार मितींत (four di-mentions) बद्ध आहे. पाचव्या मितींत जो प्रवेश करील तो दिक्कालातून मुक्त होईल. (मोक्ष मिळेल.) अवकाशातीत होईल. [अतिअवकाश = हायपरस्पेस]

■ ■

वास्तव

सुबोध जावडेकर

अर्धेअधिक आकाश व्यापून राहिलेल्या गुरुच्या बिंबाकडे कॅप्टन रीड काहीशा कुतुहलाने व काहीशा भीतीने पाहत होता. सूर्यमालेचा हा ज्येष्ठ सभासद इतका जवळ दिसत होता की अवकाशयानाच्या खिडकीबाहेर हात काढल्यास त्याला स्पर्श होईल असे वाटत होते हा गमतीदार विचार मनात येताच हसू येण्याऐवजी रीडच्या अंगावर शहारेच आले. या महाकाय राक्षसी गोळ्याने कोणती रहस्ये आपल्या पोटात दडवून ठेवली असावीत या विचाराने तो कालपासून अस्वस्थच होता.

तितक्यात त्याच्या शेजारी उभ्या असलेल्या शेरवुडने त्याचे लक्ष गुरुबिंबाच्या दक्षिणगोलार्धात दिसणाऱ्या एका लहानशा ठिपक्याकडे वेधले. कॅप्टन रीडने आपल्या हातातली दुर्बिण त्या ठिपक्यावर रोखली मात्र, त्याच्या अंगावर सरसरून काटाच आला. थरथरत्या हाताने त्याने आपली दुर्बिण शेरवुडकडे दिली व समोरच्या उपकरणांचा रोख त्या दिशेला वळवला. उपकरणांवर नजर टाकताच शेरवुडचा चेहरासुद्धा पांढराफटक पडला. कॅप्टन रीडने काल व्यक्त केलेली दुष्ट शंका खरी ठरली होती.

एखाद्या चक्रीवादळाप्रमाणे घोंगावणाऱ्या त्या लालसर ठिपक्याचा आकार क्षणोक्षणी मोठा होत होता. त्यातून अत्यंत तेजस्वी किरणांचे झोतच्या झोत बाहेर पडत होते. हे झोत अतिशय संहारक अशा किरणोत्सर्गी अल्फा कणांचे होते.

आणि त्या किरणांचा रोख उघडउघड पृथ्वीच्या दिशेने होता.

सुन्न झालेल्या कॅप्टन रीडने यांत्रिकपणे पृथ्वीशी संपर्क साधायला सुरवात केली. पण तो जाणून होता, आता फार उशीर झाला आहे.

" फार फार उशीर..."

आपली विज्ञानकथा संपवून अजितने हातातले कागद खाली ठेवले व प्राध्यापक ठोंबऱ्यांकडे प्रश्नार्थक नजर टाकली. ठोंबऱ्यांचे डोळे मिटलेले होते. कपाळावर आठ्यांचे जाळे पसरले होते. खालचा ओठ पुढे काटल्यामुळे त्यांचा लालगोरा चेहरा वेडावाकडा दिसत होता. काही क्षण तसेच स्तब्धतेत गेले. ठोंबरे काहीतरी बोलतील म्हणून अजितने वाट पाहिली व शेवटी न राहवून विचारले.

" कशी वाटली ?"

ठोंबऱ्यांनी डोळे उघडून त्याच्याकडे एक तुच्छतेचा कटाक्ष टाकला व आपला चश्मा डोक्यावर बसवत आपल्या अनुनासिक आवाजात विचारले,

" काय कशी वाटली, म्हणालात ?"

" माझी कथा–विज्ञानकथा कशी वाटली ?"

" विज्ञानकथा !" कथा या शब्दावर जोर देत ठोंबरे उद्गारले. " हे नाटक किंवा कविता नक्कीच नाही. कादंबरीपेक्षा सुदैवाने लहान आहे तेव्हा तिला कथाच म्हणायला पाहिजे, नाही कां ? पण तिला गोष्ट म्हटले तर जास्त बरे होईल. आधी मला एक सांगा, तुम्ही करता काय ?"

" काय म्हणजे ?" अजितने न समजून विचारले.

" म्हणजे तुमचा व्यवसाय कोणता ?"

" मी चार्टर्ड अकौंटंट आहे. पण मला विज्ञानाची आणि विज्ञानसाहित्याची खूप आवड..."

त्याचे बोलणे अर्धवट तोडून ठोंबरे म्हणाले, "तर मग तुम्ही तुमची लेजरबुके आणि बॅलन्स-शीटस् सोडून या साहित्याच्या प्रांतात कशासाठी घुसायचा प्रयत्न करताय, अं ?"

नेमके काय बोलावे हे न सुचल्याने अजितने नुसतीच ओठावरून जीभ फिरवली.

"असं बघा मिस्टर..."

"लेले. अजित लेले माझं नाव"

"हां. तर लेले, तुम्ही हे जे काही लिहिले आहे ते मनोरंजक, नाही असं मी म्हणतं नाही. पण त्याला कथा म्हणणे कठीणच आहे. त्यातून ही तुमची विज्ञानकथा म्हणायची. कां, तर ती पृथ्वीवर न घडता अंतराळात घडते म्हणून नाही कां ?"

"तुम्हाला काय म्हणायचयं ते मला नीटसे कळले नाही" अजितने माफक धैर्य गोळा केले.

"माझी तशी अपेक्षाही नव्हती." ठोंबरे उपहासाने उद्गारले. मग काहीशा समजावणीच्या स्वरात पुढे म्हणाले, "कथा हा वाङ्मयप्रकार वरवर दिसतो तितका सोपा नाही. त्यात केवळ घटनांची तपशीलवार जंत्री असता कामा नये तर भिन्न व्यक्तिमत्वांतील मानसिक व्यापारांचे चित्रण असले पाहिजे. नुसते दोन व्यक्तींमधील संभाषण नको तर त्यांच्या भावनांचे पदर अलगद उघडून दाखवता आले पाहिजेत. वाचकाला तिने एक जिवंत अनुभव द्यायला हवा."

"खरं आहे तुमचं म्हणणं. पण माझ्यापरीने मी हे सर्व साधायचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. अंतराळयानातील माणसांच्या मनोवृत्तीत हळुहळू होत जाणारे बदल, एकाकीपणाच्या जाणिवेतून येणारे औदासिन्य, त्यांची एकमेकांकडे बघण्याची बदलत जाणारी दृष्टी,..."

"पण" अजितला थांबवीत ठोंबरे म्हणाले, "हे बदल एकाकी पडलेल्या माणसांच्यामधे कुठेही घडून येऊ शकतील. त्यासाठी अंतराळात कशाला जायला हवे ?"

"पृथ्वीपासून कोटयावधी मैलावर पोचल्यावर वाटणाऱ्या एकाकीपणाची तुलना या जगातल्या अनुभवांशी कशी करता येईल. त्यांची जातकुळीच वेगळी असणार, नाही कां ?"

ठोंबरे काहीही न बोलता, अजितकडे कीव केल्याच्या नजरेने पहात राहिले.

"बरे ते असू द्या. कथेची बांधणी कशी वाटते ?" अजितने धीर सोडला नाही.

"तुम्ही ना. सी. फडक्यांचे प्रतिभासाधन वाचलेलं दिसतयं." ठोंबरे उद्गारले.

"नाही बुवा. का बरं ?"

"नाही, कथेची बांधणी वगैरे शब्द वापरताय म्हणून म्हटलं. आकर्षक सुरवात, चमकदार शेवट आणि मधली जागा भरायला निसर्गवर्णने असला सगळा फडकेपंथ आहे. बाकी ही तुमची गोष्ट फडक्यांपेक्षा खांडेकरांनाच जास्त जास्त जवळची वाटते आहे."

"खांडेकरांना ?" अजितने चक्रावून विचारले.

"तुमचे ते नवीन खांडेकर हो. बोधवादी भूमिकेतून विज्ञानकथा लिहिणारे नारळीकर !"

"जयंत नारळीकरांच्या विज्ञानकथा मला आवडतात. माझ्या शैलीवर कळतनकळत त्यांची छाप पडली असणं शक्य आहे. पण वावगं काय आहे ?" ठोंबऱ्यांच्या तिरकस बोलण्याचा अजितला आलेला राग आता त्याच्या स्वरात दिसू लागला.

"हे बघा, तुमच्या त्या नारळीकरांनी नोबेल पारितोषिक मिळवले म्हणून..."

"नाही, त्याना नोबेल नाही मिळालं अजून" अजित पुटपुटला.

पण त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून ठोंबऱ्यांनी पुढे चालू ठेवले, "त्यांना म्हणावं तुम्हाला विज्ञान-प्रसार करायचा असला तर हवे तेवढे प्रबंध लिहा नाहीतर व्याख्याने देत फिरा. पण आम्हा साहित्तिकांच्या प्रांतामधे नका लुडबुड करू."

अजित यावर काही बोलणार तोच ठोंबरे अचानकपणे म्हणाले, "पण काय हो तुमचे ते अंतराळयान का काय ते गुरुच्या इतक्या जवळ जाऊनही त्यावर उतरण्याचा प्रयत्न का करीत नाही ?"

अच्छा, म्हणजे ठोंबऱ्यांचे इतपत लक्ष होते तर, अजितने मनात म्हटले. तो उत्साहाने सांगू लगला, "एक म्हणजे गुरुला घन असा पृष्ठभागच नाही. तो एक वायूचा गोळा आहे. आणि दुसरे म्हणजे त्याचे गुरुत्वाकर्षण इतके जबर आहे की त्याच्या

फार जवळ गेले तर त्याच्या मगरमिठीतून बाहेर येणेच शक्य नाही. पण हे सारे स्पष्टीकरण मी माझ्या एका पात्राच्या तोंडी घातले आहे ना."

"हं" या एका अक्षरात जगातली सारी तुच्छता एकवटत ठोंबरे म्हणाले, "स्पष्टीकरण! तुम्हाला कथा म्हणजे काय वैज्ञानिक निबंध वाटला काय? या असल्या स्पष्टीकरणे द्यायच्या पद्धतीला मी Now–tell–me–Professor म्हणतो. कथेच्या मधेमधे असली स्पष्टीकरणे आली की मी नेहमी डोळे मिटून घेतो. आता तुम्ही वाचत असल्यामुळे ती सोय नव्हती तेव्हा मी कानावर पडदे ओढून घेतले!" ठोंबऱ्यांनी आपल्या परीने विनोद केला.

"पण मग कथेत आवश्यक असलेली अशी स्पष्टीकरणे द्यायची कशी?" अजितच्या चेहऱ्यावर पुन्हा विद्यार्थ्याचा भाव आला.

"तो तुमचा प्रश्न आहे, माझा नाही. विज्ञान-कथा लिहायला तुम्ही घेतली आहे का मी?" ठोंबरे ताडकन् म्हणाले. "मला तर विज्ञानकथा हा प्रकारच मुळी वास्तवापासून खूप दूरचा वाटतो."

"बरं तर. बराच वेळ झाला" घड्याळाकडे दृष्टी टाकत ठोंबरे म्हणाले. "म्हपसेकरांनी चिठ्ठी दिली होती म्हणून इतका वेळ मी तुमच्यासाठी मोडला. आता मला एका परिसंवादाला जायचंय. मराठीतले नवीन साहित्यप्रकार या विषयावर पाच वाजता साहित्यसंघात चर्चासत्र आहे तिकडेही जायचंय. तेव्हा तुम्ही या आता. नमस्कार."

उदास मनाने अजित घराच्या दिशेने पाय ओढत होता. तोच पाठीमागून येऊन कोणीतरी त्याचे खांदे पकडून त्याला गदागदा हलवीत म्हटले.

"अजित, लेका तुझे लक्ष कुठे आहे? किती हाका मारायच्या तुला? आणि असा चेहरा का टाकलायस? पोरगा नापास झाला काय तुझा?"

"सद्या तूं?"

"हो, यस्. मीच. My highness सदानंद गोखले. पण लेका तुला झालंय काय? तब्यत तर ठीक आहे नां?"

"तब्येत ठीक आहे रे–तिला काय धाड भरलीय?"

"मग कां असा–प्रेमभंग्यासारखा?"

सदूचा हा नेहमीचा लाडका शब्द ऐकून अजित किंचितसा हसला, आणि म्हणाला,

"प्रेमभंग व्हायला आपण काय आता कॉलेजातली पोरं राहिलोय?"

"नाही. पण आपल्या वर्गातल्या सुनिता रेगेने फायनलच्या वर्षाला आपणा सर्वांच्या हातात तिच्या लग्नाची पत्रिका ठेवली त्यावेळी झाला होता तसा चेहरा आत्ता तुझा दिसतोय, म्हणून म्हटलं. कुठं गेला होतास?"

"ठोंबरे म्हणून मराठीचे एक प्राध्यापक आहेत, त्यांच्याकडे गेलो होतो."

"बोंबला. त्यांच्याकडे कशाला? काय मराठीत Ph. D. वगैरे करायचा विचार आहे की काय? कॉलेजमध्ये असताना यायचा असला काहीतरी झटका तुला."

"नाही रे. मला कोण टर्मस् भरू देईल Ph.D. च्या आता? मी एक विज्ञानकथा लिहिली होती ती दाखवायला गेलो होतो त्यांच्याकडे."

"ओहो होहो. म्हणजे आता तू चक्क 'त्यातला' झालास. ब्रेव्हो. Keep it up. कदाचित् आणखी वीस पंचवीस वर्षांनी साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष-सुद्धा होशील. पण मग असा एरंडेल प्यायल्या-सारखा चेहरा का केलायस? अच्छा, अच्छा. आलं लक्षात. ठोंबऱ्यांकडे गेला होतास ना? मला माहित आहेत हे तुझे प्राध्यापक महाशय. स्वतःची एकदोन पुस्तके प्रसिद्ध झाल्यावर मराठीतले सर्व-श्रेष्ठ टीकाकार असल्याच्या आविर्भावात प्रवचने झोडत फिरत असतात जिकडे तिकडे. तुझी कथा ऐकून घेतली असली तरी पुष्कळ झालं."

"म्हापसेकरांनी चिठ्ठी दिली होती म्हणून ऐकली."

"बरं मग काय म्हणताहेत हे थोर समीक्षक? मी सांगू? तुझी कथा ही कथाच नव्हे! करेक्ट?"

"तुला कसं कळलं?"

"अरे बाबा, मी ओळखून आहे या सर्व महान टीकाकारांना. तू गेलासच कशाला त्यांच्याकडे झक मारायला?"

"तसं नाही रे. त्यांनी टीका केल्याबद्दल नाही मला वाईट वाटले. पण त्यानी काहीतरी मार्गदर्शन करावं अशी इच्छा होती माझी."

"डोंबलाचे मार्गदर्शन. तू म्हणजे अगदी सखाराम गटणे आहेस झालं. आणि मार्गदर्शनच हवे असले तर त्या ठोंब्र्यांकडे कशाला जायला हवे ? त्याना काय बोडखं कळतं विज्ञानातलं ? तुला एक सांगू ? तू देशमुखांकडे का जात नाहीस ? आत्तापर्यंत १५-२० पुस्तके तरी लिहिली असतील मराठीतून विज्ञानावर. अरे दादा माणूस आहे या क्षेत्रातला. परवा 'प्रतिभा आणि प्रतिमा'मधे पाहिलं नाहीस ? ते तुला मार्गदर्शन तर करतीलच पण त्यांनी शब्द टाकला तर छापूनसुद्धा येईल तुझी विज्ञानकथा एखाद्या मासिकात. चल येतोस ? मी घेऊन जातो तुला त्यांच्याकडे."

"तुझी ओळख आहे ?"

"अरे ओळखच काय, नातं आहे. आमच्या संध्याचे सासरे. छान माणूस आहे बोलायला. येतोस ?"

"चल तू म्हणतोहेस तर." अजितच्या मनाने पुन्हा उचल खाल्ली.

देशमुखांनी अपेक्षेपेक्षा चांगले स्वागत केले. त्यांचा येण्याचा उद्देश कळल्यावर ते म्हणाले,

"छान. छान. तुमच्यासारख्या ताज्या दमाच्या लोकांनी जरूर लिहिले पाहिजे मराठीतून विज्ञानावर. मराठीत विज्ञानविषयक साहित्य इतके कमी आहे की नवीन लेखकांनी मुद्दाम हा प्रकार हाताळला पाहिजे.

"पण तुमची कथा ऐकायला मला आज तरी अजिबात वेळ नाही. मराठी विज्ञान परिषदेच्या संमेलनासाठी मला कोल्हापूरला जायचंय. आज रात्रीच महालक्ष्मीने निघणार आहे. चार-पाच दिवसांनी परत येईन. तेव्हा तुम्ही असं करा, माझ्याकडे तुमची कथा देऊन ठेवा. मी ती प्रवासात वाचेन व परत आल्यावर माझे मत देईन. चालेल ना ? तुम्ही आठेक दिवसांनी चक्कर टाका. मी नक्की वाचून ठेवतो."

पुढच्या आठवड्यात अजित जेव्हा देशमुखांकडे गेला तेव्हा त्यांना कथा वाचायला अजून सवड मिळाली नसणार याची त्याला मनोमन खात्री होती. पण देशमुखांनी त्याला आश्चर्याचा सुखद धक्काच दिला.

"या, कथाकार." त्याचे स्वागत करीत ते म्हणाले, "वाटच पहात होतो मी तुमची. वाचली मी तुमची कथा. तुमचा हा पहिलाच प्रयत्न असला तर खूपच चांगली आहे. आता तशा काही चुका आहेत त्याच्यात. पण त्या सुधारता येतील."

अजितचा चेहरा उजळला. "सांगा ना मला चुका मी करेन त्यात बदल" त्याने प्रामाणिकपणे सांगितले.

"सांगतो. मी सगळ्या एका कागदावर लिहूनच ठेवल्या आहेत." समोरची पुस्तके खालीवर करीत त्यातून एक चिटोरे काढीत देशमुख म्हणाले.

"एक म्हणजे गुरुपर्यंत पोचायला ३४८ दिवस लागले असे तुम्ही दाखवलंय पण माझ्या गणिताप्रमाणे सध्याच्या अंतराळयानांचा वेग लक्षात घेता कमीतकमी ३७८ दिवस लागतील."

"हात्तिच्या, एवढंच ना ? करतो मी तशी दुरुस्ती." अजितला हायसे वाटले.

शिवाय तुम्ही गुरू स्वतःभोवती १० तासांत फिरतो असं लिहिलंय. प्रत्यक्षात त्याला ९ तास ४५ मिनीटे लागतात. साऱ्यांनी दुसरी चूक काढली,

"ही चूक कथेच्या संदर्भात फारशी महत्त्वाची वाटत नाही." अजित पुटपुटला.

"नाही कशी ? तपशील नेहमी बिनचुक हवा. एक गंमत सांगतो तुम्हाला. परवा एक सिनेमा पाहिला. काय बरं नाव त्याचं ? तोहो लग्न संसार सगळं व्यवस्थित असलेल्या एका माणसाकडे. त्याचाच, दुसऱ्या बाईला झालेला मुलगा येतो तो-हा मासूम. मुलं फार मागे लागली होती म्हणून त्यांना घेऊन गेलो होतो. नाहीतर मी कधी हिंदी सिनेमांच्या वाटेला जात नाही-तर काय सांगत होतो. त्या सिनेमात एक रेल्वे स्टेशनवरचा प्रसंग आहे. त्यात दिल्लीहून सिमल्याला जाणाऱ्या गाडीवर चक्क C. R. अस लिहिलं आहे. त्यातली गत व्हायची, काय ?"

चित्रपटातल्या त्या भावनोत्कट प्रसंगात डब्यावरली C. R. ही अक्षरे वाचणाऱ्या महाभागांना पाहून अजितने मनातल्या मनात हात जोडले.

"हां तर काय सांगत होतो-तपशील बिनचुक हवा गुरुच्या १६ चंद्रांचा तुम्ही उल्लेख केलाय. पण गेल्याच महिन्यात आणखी एका चंद्राचा शोध

लागलाय हे तुम्हाला माहीत नाही वाटतं?"

अशा बऱ्याच मौलिक मार्गदर्शनानंतर देशमुखांनी अजितला विचारले, "पण काय हो, गुरुकडे जाताना तुमचे अंतराळयान मंगळाच्या जवळून गेल्याचे तुम्ही दाखवले नाही. कथेमधे ही फार मोठी त्रुटी आहे असे नाही तुम्हाला वाटत ?

"मंगळाची कक्षा पार करताना ते मंगळाच्या जवळूनच गेले पाहिजे काय ? मंगळ तेव्हा सूर्याच्या विरुद्ध बाजूला सुद्धा असू शकेल. नाही कां ?"

"अर्थातच असू शकेल. पण अंतराळयान मंगळाच्या जवळून गेल्याचे तुम्ही दाखवले असते तर कितीतरी मनोरंजक माहिती तुम्हाला घालता आली असती. उदाहरणार्थ व्हायकिंगने पाठवलेली माहिती. तुम्ही माझे 'गूढ मंगळ' हे पुस्तक वाचा. त्यातल्या कितीतरी गंमतीदार गोष्टींचा तुम्हाला उपयोग करून घेता येईल. मला तर वाटतं, या कथेची कादंबरीसुद्धा करता येईल. बघा प्रयत्न करून."

"नको. अनावश्यक तपशील देऊन लांबण लावायची माझी इच्छा नाही. कथेच्या परिणामाला त्याने बाधा येते असे मला वाटते." अजितच्या स्वरात ठामपणा होता.

"ठीक आहे. तुमची इच्छा. पण कथेचा शेवट मात्र माझ्या मते अगदीच अवास्तव आहे. गुरूमधली सजीवसृष्टी पृथ्वीवर किरणोत्सर्गी कणांचा मारा करते असे तुम्ही दाखवलयं. अहो पण गुरुवर कोणत्याच प्रकारची जीवसृष्टी–इंटलिजंट लाइफ असणे अगदी अशक्य आहे." देशमुखांनी दुसरा सूर लावला.

"असंभव आहे पण अशक्य नाही. काल अशक्य वाटणाऱ्या कितीतरी गोष्टी आज शास्त्राला मान्य झाल्या नाही आहेत कां? न्यूट्रॉन तारे, कृष्णविवरे..."

"छे. छे. बाकी काही असले तरी गुरुवर जीवसृष्टी असणे अशक्यच आहे. अहो तो सूर्यापासून इतका दूर. सूर्याचा प्रकाशसुद्धा त्याच्यावर मिणमिणता पोचतो. शिवाय त्यावर प्राणवायूचा अंशसुद्धा नाही. सजीवसृष्टी निर्माणच कशी होईल ?"

"जीवसृष्टीच्या निर्मितीसाठी उर्जा लागते हे मान्य. पण ती सूर्यापासूनच मिळायला हवी कां ? गुरुच्या पोटातल्या प्रचंड दाबामुळे तिथे ऊर्जेचा साठा असणारच आणि प्राणवायूबद्दल म्हणाल तर तो फक्त पृथ्वीवरच्या प्राण्यांसाठी 'प्राण' वायू आहे. प्राणवायूचा उपयोग न करता ऊर्जा उत्पन्न करणाऱ्या कितीतरी प्रक्रिया रसायनशास्त्राला माहीत आहेत. तशा एखाद्या प्रक्रियेशी संबंधित अशी जीवसृष्टी गुरुवर निर्माण होणे अशक्य नाही."

"ठीक आहे. असल्या कल्पनांवर आधारलेली कथा तुम्हाला लिहायची असली तर मर्जी तुमची. पण एखाद्या संपादकाने माझ्याकडे विचारणा केली तर मात्र ही विज्ञानकथा नसून निव्वळ परिकथा असल्याचे मला सांगावे लागेल."

विरोध ऐकून घेण्याची घेण्याची देशमुखांची तयारी नाही हे पाहून अजितनेही जास्त वाद घातला नाही. पण त्यांच्या शेवटच्या वाक्याने शंकेची पाल त्याच्या मनात चुकचुकतच राहिली.

आणि झालेही तसेच. ज्या मासिकात आपली कथा यावी असे अजितला वाटत होते त्याच्या संपादकाने ती ५–६ महिन्यांनी परत पाठवली सोबत पत्र.

'आपली कथा परत पाठवावी लागते याचे दुःख होते.'

'आपला प्रयत्न चांगला आहे पण यापेक्षा अधिक कसदार कथेची अपेक्षा वाचक आमच्या मासिकाकडून करतात.'

शिवाय गुरुवर जीवसृष्टी नाही हे सिद्ध झाले असल्याचे तज्ञांचे मत आहे. त्यामुळे कथानकाने वास्तवाशी फारकत घेतली आहे असे वाटते.'

"आपण आमच्या मासिकावर दाखवलेल्या लोभाबद्दल धन्यवाद."

आणखी दोनतीन संपादकांची अशाच स्वरूपाची पत्रे आल्यावर अजितने हार मान्य केली. ही कथा पाठकोऱ्या कागदावर लिहिली असल्यामुळे तिच्या हस्तलिखिताचा चिरंजिवांना गणिते सोडवायला तरी उपयोग होईल असे वाटून ते हस्तलिखित त्याने आपल्या शाळेत शिकणाऱ्या मुलाच्या स्वाधीन केले.

पण दुसऱ्या दिवशी चिरंजिवांनी त्याच्यावर बॉंबगोळाच टाकला, "मी वाचली बाबा तुमची गोष्ट. टॉप आहे. आपण ती एखाद्या मासिकात छापायला द्यायची कां?"

अजित नुसताच हसला.

"बाबा खरंच काहो गुरुवर उतरता येणार नाही? आणि बाबा एस्केप व्हेलॉसिटी म्हणजे काय हो?"

अजितचे डोळे लकाकले. विज्ञानाबद्दल कुतुहल निर्माण करण्याचे काम निदान एका तरी वाचकाच्या मनात त्याच्या कथेने केले होते. समाधानाने हसत तो म्हणाला,

"असं बघ छोटया..."

पण त्याचवेळी NASA चा टेलीप्रिंटर गुरुच्या दिशेने पाठवलेल्या एका अंतराळयानाकडून आलेले संदेश टिपून घेत होता.

"गुरुच्या दक्षिण गोलार्धात एक लालसर रंगाचा ठिपका चक्रीवादळाप्रमाणे स्वतःभोवती गरगरा फिरत आहे. त्या ठिपक्याचा आकार क्षणोक्षणी मोठा होत आहे. त्यातून तेजस्वी किरणांचे स्रोत बाहेर पडत आहेत. किरणोत्सर्ग मापकाने केलेल्या मोजमापावरून ते अल्फा कणांचे आहेत. हे संहारक कण अतिशय प्रचंड वेगाने पृथ्वीच्या दिशेने फेकले जात असून काही मिनिटातच ते पृथ्वीवर येऊन आदळतील."

संदेश येणे अचानक बंद पडले.

△ △

सुबोध जावडेकर
५, भागीरथी प्रसाद, ९९, शिवाजी पार्क
दादर, मुंबई ४०००२८

विज्ञान नाटके

ज. रा. फणसळकर

विसावे शतक हे विज्ञान युग आहे. विज्ञानाच्या वाटा चौखूर उधळल्या आहेत. बुद्धीला झिणझिण्या आणणारे नवे नवे शोध व नवनवीन तंत्र ह्यांनी हे शतक गाजत आहे. चंद्रमंगळापलीकडील उड्डाण, अंतराळांतून सहजगत्या मिळणारे संदेश, उपग्रहांची मालिका व त्यांचा दैनंदिन जीवनातील सुखसोयीसाठी उपयोग, माणसाच्या शरीरात हृदय, किडनी, डोळे बसविण्याची प्रगती, संभोगाविना संतती, संततीविना संभोग...कितीतरी जादूसारख्या वाटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात आकार घेत आहेत. साहित्यांत मानवी जीवनाचे प्रतिबिंब पडते, नव्हे पडावयास पाहिजे असे म्हणतात. विज्ञान, तंत्रविज्ञान, स्थापत्यविज्ञान, मनोविज्ञान, इत्यादी विज्ञानाच्या अनेक अंगांत अनेक बाजूने प्रगती होत असताना, बदलत्या जीवनाचे प्रतिबिंब सर्वार्थाने साहित्यात दिसते का, व तेही नाटकाच्या संदर्भात, ह्यावर चार शब्द. तसा विचार केला तर सध्याचा भारतीय माणूस पुरेसा विज्ञाननिष्ठ नाहीच. विज्ञानाने प्राप्त झालेल्या सर्व सुखसोयींचा भरपूर प्रमाणात उपभोग घेऊनही विज्ञानासंबंधी तो फार मोठ्या प्रमाणात अंधारांत आहे. Compartamentalisd शिक्षण पद्धतीमुळे बहुसंख्य मराठी लेखकांची विज्ञानाशी तोंडओळखही नसते. विज्ञानाचे अभ्यासकही साहित्याच्या वाटेला जाताना दिसत नाही. अजूनही आपले साहित्यविषय वेगळेच आहेत. आपण पुराणात रमतो, इतिहासांत रमतो. महाभारतातील कर्णाची प्रतिमा उजाळण्यांत, अथवा इतिहासांत बदनाम झालेल्या व्यक्तींच्या चारित्र्य उन्नयनात आपल्याला रस आहे. तथापी ज्या विज्ञानाने आपले सर्व जीवन व्यापून टाकले आहे त्याचा वापर मान्यवर लेखकांच्या कलाकृतीतही अभावाने दिसतो. भरीस भर आपल्या विज्ञानाविषयीच्या चुकीच्या कल्पना. त्यातून होणारी थोडीफार कलानिर्मिती. ह्यातूनच आपण विज्ञानसाहित्याचा वा विज्ञानकलाकृतींचा विचार करणार. नाटकाच्या संदर्भातच बोलावयाचे तर आपण विज्ञाननाटक म्हणजे वेगळ्या स्तरावरच्या नाटकाची कल्पना करणार. म्हणजेच विज्ञानाचा वापर असलेले भरपूर स्वप्नरंजन करणार, बुद्धीप्रामाण्याच्या नावाखाली तर्कटे लढवीत बसणार व त्यातून जन्माला येणाऱ्या फॅन्टॅसीजना विज्ञान कादंबरी, कथा, वा नाटक म्हणणार. नाटकापुरते बघायचे झाल्यास मला हे मान्य नाही. नाटकातील पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, हेच भेद मला मुळांत वरवरचे वाटतात, त्यांत पुन्हा विज्ञान नाटकाची भर कशाला ? तेव्हा सोयीकरता विज्ञान नाटक म्हणजे वैज्ञानिक संकल्पनांचा सुयोग्य वापर करून लिहिण्यात आलेले नाटक असेच मी समजतो व इतर नाटकापेक्षा वेगळी जातकुळी त्याने सांगू नये ही माफक अपेक्षा व्यक्त करतो.

नाट्यलेखनाचा, वाचनाचा, सादरीकरणाचा माझा जो व्यक्तिगत दृष्टीकोन आहे तेवढ्यापुरतेच लिहितो.

माझे मनोगत स्पष्ट करण्यासाठी मी ऐतिहासिक व पौराणिक नाटकाचे दाखले देऊ इच्छितो. सौभद्र, द्रौपदी, विद्याहरण इत्यादी नाटकांचे उदाहरण घ्या. ह्यातील प्रमुख पात्रे पौराणिक आहेत. त्या

काळातील नीती अनीतीच्या, प्रणयाच्या, सूडाच्या, मैत्रीच्या, त्यागाच्या काही कल्पना असतात. आधुनिक काळातील लेखक त्याप्रमाणे पौराणिक पात्राची योजना करतो. त्याच्या कल्पनेप्रमाणे तशी भाषा व तसे संवाद पात्रांच्या तोंडी घालतो, पण त्या काळातील पात्रे तशीच बोलत असतील हा लेखकाच्या व्यक्तिगत कल्पनेचा भाग. मग तसल्या संवादाचा एक पॅटर्न होऊन जातो, व तदनुसार लिहिली जाणारी नाटके पौराणिक ठरू लागतात. वास्तविक ह्या नाटकातील पात्रे व घटना सोडल्यास, एकूण स्वभावचित्रण किंवा नाटकाची उभारणी लेखकाच्या अनुभूतीचा एक भाग असतो व तो तर वर्तमानात जगत असतो. आग्र्याहून सुटका सारखे अथवा रायगडाला जेव्हा जाग येते ह्या सारखे ऐतिहासिक नाटक घ्या. त्यातील पात्रे ऐतिहासिक आहेत, त्यांची भाषा एका विशिष्ठ पद्धतीची. जिरेटोप काढून ठेवलेला अथवा म्हातारा शिवाजी प्रेक्षक बघूच शकत नाहीत, पण त्याचा वेष, भाषा कशीही असली तरी मला, आजच्या प्रेक्षकाला, समजते. तात्पर्य काय मला रंगभूमीवर माणूस बघायचा असतो, त्याच्या मनातील द्वंद्व त्याच्या मनातील प्रणयभावना, द्वेष, काम, लोभ, मत्सर ज्या सर्वांशी मी स्वत: परिचित आहे. मी रंगभूमीवर मानवी आकृती बघत असतो, मानवी मनोव्यापारांचे दर्शन घेत असतो व खरे तर त्या करिता नाटकाचे वर्गीकरण ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक करणे गैरलागू आहे. बरेचदा तर राजा शिवाजी अथवा औरंगजेब ह्या सारखीच परंतु संपूर्ण काल्पनिक पात्रे कल्पून देखील त्याच तऱ्हेने नाटक लिहिले जाऊ शकते. त्यांत इतिहासाचा अभाव असूनही ते ऐतिहासिक ठरते. त्याचप्रमाणे कोणत्याही Mythology वर न आधारलेली व तशीच लिहिलेली नाटके असू शकतात व ती पौराणिक ठरतील तात्पर्य, नाटकाचे असे वर्गीकरण गैरलागू आहे.

आणि म्हणून विज्ञाननाटक देखील इतर नाटकाहून अशाच प्रकारे भिन्न असले पाहिजे असे मानणे तर्कास धरून नाही. एखाद्या वैज्ञानिक संकल्पनेवर आधारीत, परंतु मानवी जीवनाचीच कथा सांगणारे, त्याचेच मनोव्यापार जपणारे नाटक असू शकते. केवळ वर्गीकरण करण्याची हौसच असेल तर तसल्या नाटकाला वैज्ञानिक नाटक म्हणा, परंतु ते विज्ञाननाटक आहे किंवा नाही हा भाग गौण असून ते नाटक आहे; ह्याला मी प्राधान्य देतो.

आणि म्हणून ज्या नाटकांत वैज्ञानिक संकल्पनांचा वापर आहे व तो तसा नसता तर ते नाटक कोलमडूनच पडले असते. अशा नाटकांना तात्पुरते विज्ञान नाटक म्हणून, त्या तसल्या काही कलाकृतींचा परामर्ष घेतो. सुरवात मनोविज्ञानापासूनच करू या. अमूक एका परिस्थितीत माणूस कसा वागतो, कसा वागेल हे सांगणे तसे कठीण आहे, पण त्याची मानसिक जडण घडण जर माहीत असली तर त्याच्या वागण्याची संगती लावल्या जाऊ शकते. उदाहरणार्थ भर तारुण्यात एक भयानक अपराध घडला आहे व तो सतत मन पोखरीत आहे असे एक पात्र निर्मिले व नाटकात त्याचे उतार वय कल्पिले तर त्याच्या वागण्याची संगती तर्कशुद्ध लावता येते. लहान वयातील अपराधाची जाणीव काय करू शकते त्याचे विश्लेषण मनोवैज्ञानिक शास्त्रशुद्ध पद्धतीने करू शकतात, व त्यांच्या मतांचे प्रतिबिंब नाटकांत दिसू शकते. ज्या भावाचा नीट सन्मान करण्याची जबाबदारी आपण स्वीकारली होती व ज्याला आपण निर्दयतेने बदडून काढल्याने तो घरातून पळून गेला आहे, त्या भावासंबंधी निर्माण झालेल्या अपराधगंडावरील श्री. कानेटकरांचे वेडयाचे घर उन्हात हे नाटक बघा. त्या नाटकात कुठेही मनोवैज्ञानिक चर्चा आढळणार नाही. पण लहानसहान प्रसंगातून दादासाहेबांच्या मनाला लागलेली टोचणी कलात्मक रीतीने चित्रित झालेली दिसेल. परिणामी दादासाहेबांच्या मनावर पडलेला असह्य ताण, व त्यातून शेवटी लागलेले वेड हे तर्कशुद्धच नव्हे; तर शास्त्रीयदृष्टया समर्थनीय वाटते. कलात्मकतेची बूज राखून व शास्त्रीय संकल्पनांचा तर्कशुद्ध वापर करून हे नाटक उभे केले आहे. लहानपणी सोसाव्या लागणाऱ्या उपेक्षा, अपमान, त्यातून पेटलेली सुडाची एका टोकाची भावना ह्याचे चित्रण श्री. मधुकर तोरडमलांच्या भोवरा नाटकात दिसेल. त्यांनी निव्वळ कल्पनाशक्ती स्वैर सोडलेली नसून, प्रमुख पात्रांच्या

वागण्याचे मनोवैज्ञानिक विश्लेषण केले आहे, पण त्याच बरोबर कलात्मकतेचा तोलही साधला आहे. एका टोकाचे स्वप्नरंजन करणारी सरिता, काल्पनिक व वास्तव ह्यातील सीमारेषांचे भान हरवून बसते, व त्यातून एका काल्पनिक प्रियकराला जन्म देते हे श्री. फणसळकरांनी 'आकाश माझे निळे' ह्या नाटकात मांडले आहे. पण शास्त्रीय संकल्पनांचा वापर करताना नाटक ही एक कलात्मक सुंदर गोष्ट आहे हे न विसरता.

मनोवैज्ञानिक संकल्पनांचा आधार घेऊन घडविलेल्या नाटकांची संख्या त्यातल्या त्यात अधिक आहे, कारण नाटकाच्या उभारणीसाठी लागणारे नाट्य भरपूर प्रमाणात उपलब्ध होते. Dual personality, multiple personality ह्यांचा वापर करून नाटके लिहिली गेली आहेत व प्रायोजिक दृष्ट्या यशस्वी पण झाली आहेत नाटकात वापरलेली प्रमुख संकल्पना ही शास्त्रीय असल्याने वरील नाटके निव्वळ स्वप्नरंजन नाही.

हिप्नॉटीझम ही एक कवीकल्पना नाही. मनोवैज्ञानिकांच्या लेखी ते एक शास्त्रीय सत्य आहे, काही प्रतिभावंत नाटककार ह्या संकल्पनेचा कल्पक उपयोग करून नव्याच धर्तीची नाटके लिहून गेले आहेत. श्री. बबन प्रभू ह्यांनी तर 'झोपी गेलेला जागा झाला' हा अडीच तास हसत ठेवणारा फार्स ह्याच संकल्पनेचा वापर करून लिहिला आहे.

मानवी शरीराचे ज्यांना उत्तम ज्ञान आहे ते काही ग्रंथींच्या कमीजास्त स्रावामुळे मनुष्याच्या वागण्यात कसा फरक पडत जातो, ह्याची साक्ष देतील. बरेचदा तर मूळचा स्वभाव देखील बदललेला आढळेल. श्री. प्रभाकर चांदेकर ह्यांनी लिहिलेले 'प्रयोग' हे नाटक ह्या जातीचे आहे. एका संतापी चिडखोर माणसाच्या शरीरातील ग्रंथीच्या स्रावात बदल घडवून त्याचा स्वभाव मुळातूनच बदलवून टाकण्याचा प्रयोग ह्या शास्त्रीय संकल्पनेचा वापर करून 'प्रयोग' हे नाटक उभे राहते. ह्या अनैसर्गिक बदलामुळे घडून आलेली शोकांतिका 'प्रयोग' नाटकात दिसते.

समजा मानवी शरीराची पेशीन् पेशी पारदर्शक झाली तर? (हे शक्य आहे का हा विचार तात्पुरता बाजूला ठेवू या.) श्री. H. G. Wells ह्यांची Unvisible Man ही कादंबरी माणूस 'अदृश्य' झाला तर काय घोटाळे होतील हे दाखविते. ह्याच गोष्टीचा उपयोग करून श्री. रत्नाकर मतकरी ह्यांनी लहान मुलांसाठी 'अदृश्य माणूस' हे गंमतीदार नाटक लिहिले आहे, व प्रायोगिक दृष्ट्या ते यशस्वी ठरले आहे. मानवाचा मृत्यू अनैसर्गिकरीत्या घडला तरी त्याची शवचिकित्सा करून मृत्यूचे खरे कारण तसेच मृत्यूला कारणीभूत ठरणाऱ्या गुन्हेगारावर आरोप शाबीत करण्याएवढा पुरावा मिळू शकतो. पण त्याकरिता वापरण्यात येणाऱ्या reagents मध्ये जर भेसळ असेल तर चुकीच्या निष्कर्षामुळे निरपराधी माणूस फासावर जाऊ शकतो. श्री. गॉर्डन ह्यांनी वरील विषय हाताळून Medical Evidence ही कादंबरी लिहिली आहे. त्यावर नाटक झाल्याचे ऐकिवात नाही. कॅन्सर हा जवळजवळ असाध्य रोग आहे व त्यावर मानवी उपचार हार मानतात. श्री. कानेटकरांचे 'अखेरचा सवाल' हे ह्या सत्यावरील एक कलात्मक हृदयंगम नाटक. किडनी जर कामातून गेली असेल तर दुसऱ्या निरोगी माणसाची किडनी लावून, त्या रोग्याला जीवदान मिळू शकते. श्री. विजय तेंडुलकरांनी 'भाई मुरारराव' हे नाटक ह्या घटनेचा वापर करून लिहिले आहे एखाद्या गुन्हेगार पण निरोगी माणसाची किडनी दुसऱ्याला बसवून एखादा उपयोगी जीव वाचविता येतो. श्री. दारूवाला ह्या गुन्हेगाराची किडनी श्री. हमीद दलवाई ह्यांना बसविली होती म्हणतात. नंतर तो गुन्हेगार फासावर गेला, परंतु त्याही वेळी आपण मला फासावर देऊ शकत नाही, कारण आपण ज्याला फाशीची शिक्षा दिली होती तो, व मी आता भिन्न आहोत, कारण तेव्हा मला दोन्ही किडनी होत्या, असा युक्तिवाद झाला होता. नाटकाच्या उभारणीसाठी हा चांगला विषय ठरेल. तात्पर्य वैद्यकशास्त्रातील संकल्पनांचा आधार घेऊन नाटके लिहिली गेली आहेत व पुढेही लिहिली जातील.

कामप्रवृत्ती ही मानवाच्या जीवनावर फार प्रभाव गाजविते. शरीरातील काही हार्मोन्सच्या खेळावर माणसात कमीअधिक कामप्रवृत्ती उपजते.

अनुक्रमणिका

ह्या प्रवृत्तीमुळे काही माणसांच्या जीवनात अगतिकता येऊ शकते. ह्या प्रवृत्तीच्या अतिरेकामुळे निर्माण होणारी विकृती ही नाटकांचा विषय ठरत आली आहे. सखाराम बाइंडर, अवध्य ही नाटके या दृष्टीकोनातून पहावीत. विकृतीचे चित्रण करणारी ही नाटके, पण त्यांच्या मुळाशी शास्त्रीय सत्याचा आधार आहे. अखिल प्राणीमात्रात एकच नाते सत्य व स्पष्ट आहे; आईचे. आई मुलाला प्रत्यक्ष जन्म देते. बाकीची नाती गोती हा संस्कृतीचा प्रभाव आहे. समाजात वावरताना स्वीकारलेल्या बंधनामुळे ही नाती जपली जातात, पण ही बंधने शिथिल झाली तर? स्वप्नसृष्टीत ही नाती जोपासली जातात का? पवित्र मानलेल्या नात्यामधे लैंगिक संबंध वर्ज्यच असतात. त्याच्या उल्लंघनाला incest म्हणतात. ह्या incest वर ही नाटके लिहिण्यात आली आहेत. कधीकधी हा प्रकार अज्ञानातून (राजा इडीपस) तर कधी अगतिकतेतून घडताना दिसतो. Brute is an inperfect animal while man is a perfect brute. शेवटी माणूस हा एक प्राणीच आहे. संस्कारीत असेल तरीही प्राणीच. खरे तर ही माणसे एक प्रकारचे रुग्ण होत आणि म्हणून विकृती अपरिहार्य.

वरील एकूण विवेचनावरून बऱ्याच नाटकातून विज्ञान संकल्पनांचा वापर झालेला दिसेल. तरी विज्ञान नाटक काही वेगळे असावे असे काही लोकांना वाटते. का? काही चित्रपटातून किंवा आजकाल दूरदर्शनवर येणाऱ्या स्टारट्रेक सारख्या चित्रपटातून घडलेली नाटके ह्यांना विज्ञान नाटके म्हणण्याचा प्रघात पडतो आहे. पण त्यात कलात्मकता कितपत जोपासली जाते, मानवी व्यवहाराचे चित्रण कितपत घडते, याची मला शंका आहे. नाटक हा कलाप्रकार आहे व त्यांच्या मुळावर येणाऱ्या कोणत्याही गोष्टी मला मान्य नाहीत. ऐतिहासिक मानल्या गेलेल्या नाटकातून कोणी इतिहास सांगत नाही, किंवा इतिहास घडवीत नाही. इतिहासजमा झालेल्या व्यक्तींच्या सुखदुःख संघर्ष ह्यांचे ते चित्र असावे लागते. पौराणिक नाटक म्हणजे पुराणकथेवरील आख्यान नव्हे. सामाजिक नाटक म्हणजे आगरकर अथवा महात्मा फुले आदी थोर मंडळींने केलेल्या प्रचाराचे चर्चासत्र नव्हे. मग विज्ञान, नाटक त्याहून वेगळे का असावे?

फॅन्टॅसी प्रधान नाटकाला विज्ञान नाटक म्हणू नये असे मला नेहमी वाटते. कारण तसल्या नाटकात बौद्धिकतेचा तसेच कलात्मकतेचा स्तर फारसा जोपासला जात नाही.

आज उपलब्ध असणाऱ्या वैज्ञानिक ज्ञानामुळे माणूस उद्याचे चित्र कल्पू शकतो. मुंबई पुण्यासारख्या नगरात कारखाने, थडाडणाऱ्या आगगाड्या, वाहने, एकच कल्लोळ आहे. वातावरणात ध्वनीप्रदूषण होत आहे. ह्या ध्वनीप्रदूषणामुळे एका तरुण इंजिनिअरचे आयुष्य कसे उजाड झाले ह्याचे चित्रण करणारे सुंदर नाटक श्री. सुरेश कुळकर्णी ह्यांनी लिहिले आहे. आजही कृत्रिमरीत्या अपत्यनिर्मिती शक्य आहे. हीच कल्पना ताणून Aldous Huxley ह्यांनी 'The brave new world' ही कादंबरी लिहिली आहे. गरज पडेल तेव्हा हव्या त्या गुणांची माणसे कारखान्यात निर्माण केल्या जातात. त्या जगात योगायोगाने आजचा शेले, कीटस, शेक्सपिअरवर प्रेम करणारा माणूस जातो व जंगली ठरतो. ह्या कादंबरीत सर्व माणसे समान असतात हा भ्रम आहे, हे स्पष्ट दाखविले आहे. तसेच विज्ञानाच्या अतिरेकी वापराने मनुष्यजीवन रूक्ष व नीरस होईल ह्याचे दिग्दर्शन केले आहे. एका परीने ते खरे आहे, ह्याचा अनुभव आजही येतो. कारण विज्ञानात पारंगत असणाऱ्या बऱ्याच तथाकथित बुद्धिमंतांची साहित्य–वाङ्मय ह्यात रस घेण्याची क्षमता संपल्याचे दिसते. ह्या विषयावर सुंदर नाटक घडावयास हवे. अगाथा ख्रिस्ती सारख्या लेखिकेने वैज्ञानिक ज्ञानाचा सुंदर वापर करून कलात्मक रहस्यकादंबऱ्या लिहिल्या आहेत. तशी नाटके मात्र नाहीत. Hadly Chase अथवा Erle Stanley Gardener ह्यांच्या रहस्यकथांत वैज्ञानिक ज्ञानाचा भरपूर उपयोग झाला आहे, पण हे सारे लेखक विज्ञान साधन म्हणूनच वापरतात व माणूस विसरत नाहीत. ही ताकद ठेवणारी नाटके पुढे झाली पाहिजेत. अजून तसे घडले नाही. Hadley ची Final diagnosis सारखी कादंबरी

म्हणजे वैद्यकशास्त्र पचवून माणसामाणसांच्या परस्पर संबंधावर, व्यक्तिगत भावनांवर केलेले सुंदर भाष्यच वाटते. असेच नाट्यक्षेत्रातही घडावे.

थोडक्यात चांगल्या विज्ञान नाटकांची संख्या अल्पच आहे, कारण विज्ञान संकल्पनांचा सर्व मानवी जीवनावर होणारा परिणाम जाणून घेऊन तदनुसार कलानिर्मिती करणाऱ्यांची संख्याच मुळात थोडी आहे.

△ △

अ. रा. फणसळकर
१३२, शिवाजी नगर, नागपूर-१०

‘युगवाणी’ मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे/पत्ता बदलल्यामुळेही बरेच अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा द्वैमासिक अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. तुमच्याकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या दोन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, प्रथम तुमच्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा—लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- **अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.**
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया खबरदारी घ्यावी. शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा. संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- तुमची वर्गणी संपलेली नाही ना ? तुमचे नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या नोंदीत आहे याची खात्री करून घ्यावी.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ.

दिवाळी अंकातल्या निवडक विज्ञानकथा

विश्वेश्वर सावदेकर

विज्ञानकथा आणि विज्ञानसाहित्य निरनिराळ्या मासिकांमधून आणि अन्य माध्यमांमधून सातत्याने प्रकाशित होत आहे. 'उपेक्षित वाङ्‌मयप्रकारा'ला वाहून घेतलेल्या 'नवल' तसेच 'वाङ्‌मयशोभा' यासारख्या मासिकांनी पाठपुरावा केलेल्या या साहित्य प्रकाराला सध्या बरे दिवस आलेले आहेत, असे वाटते. दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या अनेक दिवाळी अंकामध्ये विज्ञानकथांचा समावेश आवर्जून होऊ लागला आहे. याशिवाय रूपान्तर, भाषान्तर, कथास्पर्धा यांच्या माध्यमातूनही वेगवेगळ्या लेखकांच्या निरनिराळ्या, विविध प्रकारच्या विज्ञानकथा पुढे येत आहेत.

'दिवाळी अंक' हा सर्वसामान्य मराठी वाचकांचा एक जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे या लेखाची मर्यादा ठरविण्यासाठी केवळ दिवाळी अंकच विचारात घेतले आहेत. आजवर प्रसिद्ध झालेल्या सर्वच दिवाळी अंकांमधल्या सर्व विज्ञानकथा प्रस्तुत लेखात समाविष्ट आहेत, असा लेखकाचा दावा नाही. लेखन मर्यादेसाठी १९८१ ते १९८४ या कालावधीतील केवळ 'प्रातिनिधिक' अशा दिवाळी विशेषांकांमधून या कथांची निवड केलेली आहे.

दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध होणाऱ्या विज्ञानकथांपैकी बहुतांश कथा या अंतराळ प्रवासाच्या, अंतराळातल्या किंवा परग्रहावरील जीवसृष्टीशी संबंधित अशा प्रकारच्या आढळतात. या कथांमधे कल्पकतेला आणि स्वैर वर्णनशैलीला जास्त वाव असतो. तसेच परक्या ग्रहांवरील संभाव्य सृष्टीबद्दल सामान्यतः उत्सुकता आढळते. त्यामुळे विज्ञानकथा लेखकांचा अशा प्रकारच्या कथांकडे कल असावा, असं वाटतं. अशा कथांबरोबरच भविष्यातली वैज्ञानिक प्रगती, तंत्रविज्ञानाची झेप यांची कल्पना करून लिहिलेल्या, तसेच अन्य शास्त्रीय तत्त्वे, समाजातल्या अंधश्रद्धा यावर आधारलेल्या विज्ञानकथाही दिवाळी अंकांमधे दिसतात.

'अंतराळातील भस्मासूर[१]' ही जयंत नारळीकरांची विज्ञानकथा आजची विज्ञानाची तंत्रज्ञानातली झेप लक्षांत घेऊन उद्याचं जग कसं असेल ? याचं वर्णन करणारी आणि या यांत्रिक प्रगतीच्या भविष्यकाळात घडणारी आहे. कथेच्या काळाची कल्पना देताना नारळीकरांनी किर्लोस्कर मासिकाच्या अंकांची संख्या लक्षात घेऊन मांडलेलं गणित मनोरंजक वाटतं. 'दिलीप गोसावीचा लेख ज्या अंकात येणार होता, तो किर्लोस्करचा २००० वा अंक होता' असं सांगून लेखक कथेचा काळ २०८६ मधला आहे याची जाणीव करून देतात. भविष्यातल्या विज्ञानाची नेत्रदीपक प्रगती, मोठमोठी संगणक यंत्र, पृथ्वीबाहेरच्या अंतराळातल्या वसाहती यांचं भव्य वर्णन करणाऱ्या या कथेत वैज्ञानिक स्पष्टीकरणाचा भाग लेखकानं संवादात्मक शैलीनं उठावदार केलेला आहे. यंत्रांनी कितीही प्रगती केली. तरी शेवटी त्यावर माणसाचं नियंत्रण असणं किती आवश्यक आहे, याची कल्पना 'अंतराळातील भस्मासूर' वाचताना येते.

डॉ. द. व्यं. जहागिरदार यांची 'हरवलेली आगगाडी[२]' ही विज्ञानकथा 'मराठी ललित साहित्यात विज्ञानकथा हा प्रकार रुळत आहे याची नोंद घेऊन जाणीवपूर्वक समाविष्ट करण्यात आली आहे' असं संपादक लिहितात. ही कथा पदार्थविज्ञान शास्त्रातल्या आईन्स्टाईनच्या 'ट्वीन पॅरा-

डॉक्स 'च्या सिद्धान्तावर आधारलेली आहे.

आपल्याला माहित असलेल्या घन पदार्थांच्या तीन मिती किंवा डायमेन्शन्स म्हणजे लांबी, रुंदी आणि जाडी. पदार्थाच्या (घन) अस्तित्वासाठी या तीन मिती आवश्यक मानल्या जातात. अतिशय वेगात फिरणारी एखादी वस्तू या 'त्रिमिती' मधून अचानक चवथ्या मितीत गेली, तर मी अदृश्य होते, असा आईन्स्टाईनच्या सिद्धान्ताचा एक भाग आहे. याला शास्त्रीय परिभाषेत 'मेन्कोस्किन्व्ह स्पेस' अशी संज्ञा वापरण्यात येते. 'हरवलेली आगगाडी'ची ही मध्यवर्ती कल्पना आहे. 'चतुर्थ मीती' हा अजूनही संशोधनाचा विषय असला, तरी विज्ञानकथा लेखकांचा तो एक आवडता विषय आहे.

विसाव्या शतकानंतर नागपूरची लोकसंख्या भरमसाठ वाढते. वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी भुयारी रेल्वेची योजना कार्यान्वित होते. यासाठी गणित आणि टोपोलॉजीतले सर्व नियम कसोटीला लावून भुयारी आणि जमिनीवरील मार्ग आखले जातात. तज्ज्ञांच्या अनुपस्थितीत या मार्गांवर काही नवे शंटस् टाकले जातात. एक दिवस २०० प्रवाशांना घेऊन भरवेगात धावणारी लोकल अचानक अदृश्य होते. काही वेळा फक्त तिचा आवाज ऐकू येतो. नव्या शंटसचा अभ्यास केल्यावर ही आगगाडी चवथ्या मितीत गेली असण्याची शक्यता प्रो. वद्य नावाचे तज्ज्ञ बोलून दाखवतात. या कथेची मध्यवर्ती कल्पना आकर्षक आहे. परंतु वैज्ञानिक स्पष्टीकरणाच्या अभावामुळे 'हरवलेली आगगाडी' गूढकथेप्रमाणे संपते.

समाजातल्या अंधश्रद्धा, आणि या अंधश्रद्धांवर विश्वास ठेवणाऱ्या भोळ्या भावड्यांना लुबाडणारा भोंदू स्वामी यांची कथा नारळीकरांच्या 'पेरूवाडीतील पुष्पक[३] प्रकरणा'त येते. या कथेचं शिर्षक ग्रामीण विनोदी कथांच्या शीर्षकासारखं वाटतं. नारळीकरांची ही विज्ञानकथा बहुतांशी सामाजिक विज्ञानकथा आहे. या कथेत कुठल्याही प्रकारचा झगझगाट नाही.

'पेरूवाडी' गावाचा प्रमुख गुणवन्तराव पाटील नित्यानंद स्वामींना गावात आणतो. स्वामी गाव-कऱ्यांवर आपली चांगलीच छाप पाडतात. एक दिवस हे स्वामी पेरूवाडीत एका रात्री प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांचं पुष्पक विमान येणार असल्याची बातमी पसरवून खळबळ उडवतात. हे विमान फक्त पुण्यवान लोकांनाच दिसेल अशी महत्त्वाची पुस्ती जोडून स्वामी अज्ञातवासात जातात. या सर्व प्रकाराला पाटलांचा मुलगा नारोबा याचा विरोध असतो. स्वामी अज्ञातवासातून परत आल्यावर 'आपण खरंच रामाचं विमान पाहिलं' असं शपथेवर सांगणारा गावकरी त्यांच्या समोर येतो. इतकंच नाही, तर स्वामींचा विरोधक असलेला नारोबा आपल्या कॅमेऱ्यानं घेतलेले फोटोही हजर करतो आणि स्वामींची क्षमा मागतो. या पुष्पक प्रकरणामुळे स्वामींचं महत्त्व अचानक वाढतं. शेवटी एक चाणाक्ष पत्रकार या सर्व प्रकरणाच्या मागे लागतो. छायाचित्रणाची तत्त्वे आणि फसवी छायाचित्रे घेण्याच्या युक्त्या यांच्या आधारावर या प्रकरणामागची बनवाबनवी उघडकीस आणतो. परंतु यावेळपर्यंत स्वामींची कीर्ती देशात पसरलेली असते. त्यांचं राष्ट्रीय महत्त्व आणि सर्व राजकीय पुढाऱ्यांशी असलेले संबंध लक्षांत घेऊन हा पत्रकार ती बातमी प्रसिद्ध करू शकत नाही.

अंधश्रद्धा आणि बुवाबाजीवर प्रकाश टाकणारी नारळीकरांची ही विज्ञानकथा ग्रामीण पार्श्व-भूमीवरची, निराळ्या वळणाची आहे. यात लेखकाने सरकारी समिती, नोकरशाही आदींवर खरमरीत टीका केली आहे. 'जोपर्यंत माणूस किती टोप्या घालतो यावरून त्याचे महत्त्व ठरवले जाते, तोपर्यंत हे असेच चालणार' यासारख्या वाक्यांनी लेखक नोकरशाही राज्यातील कार्य-पद्धतीला चिमटे घेतात.

निरंजन घाटे यांची 'शिक्षा–प्रशिक्षा[४]'ही पृथ्वीपासून दूर एका एकाकी ग्रहावर प्रशिक्षणाचा भाग म्हणून एकांतात प्रशिक्षण घेणाऱ्या तरुण कॅप्टनची कथा आहे. तर 'वाया गेलेले हौतात्म्य[५]' या नारायण जोशी यांच्या कथेत 'उडत्या तब-कड्या' हा विषय आहे. एका सामान्य माणसाच्या अनुभवातून आणि धडपडीतून ही कथा आकार घेते–लाखो प्रकाशवर्षे दूर असलेल्या वसाहतीतून येणाऱ्या या उडत्या तबकड्या चांगलंच रहस्यमय वातावरण निर्माण करतात. 'आघांतरी[६]' ही

प्रभाकर सोवनी यांची कथा आयझॅक अॅसिमोव्ह-च्या कथेवर आधारित आहे.

'महाप्रस्थान[७]' ही यशवंत रांजणकर यांची विज्ञानकथा मंगळभूमीवर घडते. मायकेल आणि फरहाद हे मंगळावरचे दोन धनलोभी वाटाडे उदयन् या पुराणवस्तू संशोधकाला मंगळावरचा पुरातन वाडा दाखवण्यासाठी तयार होतात. त्यासाठी भरपूर मोबदला ठरवला जातो. या वाड्याच्या मार्गावरच त्या तिघांना मंगळावरचे मानवसदृष्य सहा श्रेष्ठी भेटतात.

मंगळावरच्या या श्रेष्ठींमध्ये सात भेद असतात; आणि संतान धारणेसाठी अशा सात श्रेष्ठींनी एकत्र येणे आवश्यक असते. (ही कल्पना अतिशय अवैज्ञानिक आणि अशास्त्रीय आहे). आपला वंश टिकावा यासाठी हे सहा श्रेष्ठी सातव्याच्या–सप्तमाच्या शोधात असतात. या तीन मानवांनी त्यांना सप्तम शोधण्यात मदत करायची, आणि त्या बदल्यात ते श्रेष्ठी त्यांना वाडा दाखवतील, असा त्यांच्यात करार होतो–श्रेष्ठी निघून गेल्यावर वाटाड्यांना संपत्तीचा मोह होतो. ते उदयनला एकटं सोडून पळून जातात. भरकटत असलेला उदयन् एका गुहेत येतो. इथे मंगळावरचे अनेक प्राणी असतात. याच प्राण्यांमधे सप्तमही असतो. उदयन सर्वांशी मैत्री करतो. हे प्राणी शेवटपर्यंत त्याची काळजी घेतात.

परग्रहावर घडणाऱ्या या कथेत मानवी स्वभावाचे चांगले आणि वाईट पैलू दाखवण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. परंतु आज विज्ञानाला ज्ञात असलेल्या माहितीच्या आधारावर 'महाप्रस्थान' ही केवळ एक अद्‌भूतिका ठरते. संतान धारणेसाठी सात प्राण्यांनी एकत्र येणं सुद्धा हास्यास्पद आणि अवैज्ञानिक आहे. उदयनला शेवटी दिसणारं दृष्य हे स्वर्गाचं की त्याला अभिप्रेत असलेल्या ऐतिहासिक नगरीचं, की भास हे लक्षात येत नाही.

निरंजन घाटे यांच्या 'तारकांचे अश्रू[८]' मधली नावं जिलशात, जेम्नॉल, जालून अशी अपरिचित वाटणारी आहेत. पृथ्वीपासून दूर एका ग्रहावर आपली स्वतंत्र संस्कृती असलेले जॉरलॉनी जातीचे लोक मानवांपेक्षा अशक्त आहेत. मानवानं त्यांना गुलाम केलं आहे. केवळ मनोरंजनासाठी माणसं त्यांचे हाल करतात. मानवाच्या या पहाऱ्यातून, त्यांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी या अशक्त जॉइलॉनींनी युक्तीनं दिलेल्या लढ्याची कहाणी म्हणजे 'तारकांचे अश्रू' ही मनोरंजक विज्ञानकथा आहे.

मानवी क्रौर्याचं वर्णन करतानाच लेखकानं परग्रहावरील जिवांची स्वातंत्र्य मिळवण्यासाठी चाललेली धडपड शब्दबद्ध केली आहे. यानातून पळून जाण्यासाठी, योजना यशस्वी होण्यासाठी अनेक जॉइलॉनींनी केलेलं बलिदान, त्यांचे होणारे हाल यांचं वर्णन वाचताना आपण एखाद्या स्वातंत्र्य युद्धाची कथा वाचतोय असं वाटतं.

'वॉन्डरिंग ज्यू'[९] ही पुष्पा त्रिलोकेकर यांची विज्ञानकथा परग्रहावरील जीवसृष्टीशी संबंधित असली, तरी थोडी निराळ्या वळणाची आहे. या कथेत परग्रहांवरील प्राण्यांच्या ऐवजी वनस्पतींचं साम्राज्य लेखिकेनं कल्पिलेलं आहे. या कथेतल्या वनस्पतीशास्त्रज्ञाला आदिवासी भागात 'वॉन्डरिंग ज्यू' (एका वनस्पतीचं व्यावहारिक नांव)शी साम्य असलेली एक वनस्पती सापडते. या वनस्पतीच्या पानांमधे रेडियम शोषण्याची क्षमता असल्यामुळे रात्रीच्या वेळी ही पानं आकर्षक आणि चमकदार दिसतात. या भागातल्या आदिवासींची देवता असलेली ही वनस्पती तो शास्त्रज्ञ केवळ कुतूहल म्हणून आपल्याजवळ ठेवतो. मनातल्या मनात शब्दांचे प्रतिध्वनी उमटावे तशी ती वनस्पती या शास्त्रज्ञाशी बोलते. अवकाश संशोधनाच्या मोहिमेत उत्तरांग ग्रहावर जाण्यासाठी या वनस्पती शास्त्रज्ञाची निवड होते. प्रवासात तो त्या वनस्पतीला आपल्या बरोबर नेतो. उत्तरांग ग्रहावर उतरल्यावर त्या ठिकाणी अनेक लहान मोठ्या विवरांमधून अशा वनस्पती बाहेर येतात. पृथ्वीवर सापडलेली वनस्पती यांच्यापैकीच असते. अतिशय प्रगत आणि उत्क्रान्त अवस्थेतल्या या वनस्पतींनी उत्तरांगावर आपलं साम्राज्य उभारलेलं असतं, या वनस्पती त्या शास्त्रज्ञाभोवती वेढा घालतात, आणि अवकाशयानासह त्याला नष्ट करतात.

आकर्षक वनस्पती, उत्तरांग ग्रहावरचं वातावरण यांच्या जोडीला आदिवासींची पार्श्वभूमी

यांच्या वर्णनामुळे 'वॉन्डरिंग ज्यू' ही विज्ञान-कथा अतिशय मनोरंजक वाटते. वनस्पतींचं साम्राज्य हा काहीसा निराळा विषय हाताळल्यामुळे विज्ञान-कथांमधे नेहमी आढळणारे विविध प्राणी, त्यांचे चित्र-विचित्र आकार यापेक्षा वेगळं या कथेत वाचायला मिळतं. कथानक आणि वैज्ञानिक विश्लेषण यांचीही संगती या कथेत आढळते.

दिवाळी अंकांमध प्रसिद्ध झालेली परग्रहावरील जीवांचं वर्णन करणारी आणखी एक अद्‌भुतिका म्हणून प्रदीप वर्मा यांच्या 'डाव'[१०] या कथेचा उल्लेख करता येईल. या कथेत पृथ्वीवर उतरलेल्या विचित्र आकाराच्या यानातून तितकेच विचित्र प्राणी जमिनीवर–तेही–दिल्लीत उतरतात. 'फ्रेसम' नावाच्या ग्रहावरून आलेली प्राण्यांची ही जोडी पृथ्वीवरच्या माणसांना विश्वासात घेते. त्यांना वार्धक्य येऊ नये यासाठी वापरण्याच्या 'मृत्यूंजय' यंत्राचं अमिष दाखवते. या यंत्राच्या सहाय्याने आपल्या पेशी ताज्या–तवान्या करण्याच्या मोहात सारी मानवजात आपली जननक्षमता घालवून बसते. पृथ्वी निर्मनुष्य करण्याचा फ्रेसम वासियांचा 'डाव' अशा तऱ्हेने यशस्वी होतो. प्रदीप वर्मा यांच्या या काल्पनिकेत एक–दोन गोष्टी वाचताना खटकतात. ही एक कल्पनारम्य फॅन्टसी आहे.

'मी बोलतोय'[११] ही डॉ. प्रकाश सुखटणकर यांची विज्ञानकथा भविष्यातल्या यांत्रिक प्रगतीच्या अत्याधुनिक काळात घडणारी आहे. अद्ययावत उपकरणांनी सज्ज असलेल्या 'यलो गेट' पोलिस स्टेशनवर चिफ इन्सपेक्टर साळवी यांना अचानक फोन येतो आणि धोक्याची सूचना दिली जाते. फोन करणारा मनुष्य श्रीपाद करणे 'आपल्याला अज्ञात शक्तींकडून असे संदेश येत असल्याचा' दावा करतो–असाच प्रकार दोन–तीनदा घडतो. फोन करणाऱ्या श्रीपाद कुरणेला अज्ञात शक्तींकडून आगाळू संदेश कसे येतात याचं रहस्य या कथेत शेवटपर्यंत उलगडत नाही. मानसोपचार तज्ज्ञ डॉक्टर आणि कुरणे यांची प्रत्यक्ष भेट होतच नाही. लेखकाला अभिप्रेत असलेला टेलिपथी, टेलिकायनेसिस हा मानसशास्त्रीय प्रकार स्पष्टीकरणाच्या अभावामुळे अर्धवट राहतो. त्यामुळे 'मी बोलतोय' ही एक अपूर्ण कथा वाटते.

निरंजन घाटे यांची 'रघुनाथरावांची माया,'[१२] ही यंत्रमानवावर आधारलेली अतिशय सामान्य विज्ञानकथा आहे. रघुनाथराव आगाशे हे यंत्रमानवाच्या क्षेत्रातले तज्ज्ञ केवळ लहानपणी आपली हेटाळणी करणाऱ्या मित्राला त्रास देण्यासाठी, त्याला बदनाम करण्यासाठी त्याच्याकडे 'माया' नांवाच्या तरुणीला पाठवतात. ही तरुणी म्हणजे यंत्रमानव असते. रघुनाथरावांनी तयार केलेली यांत्रिक 'माया' म्हणून या कथेचं शीर्षक 'रघुनाथरावांची माया' असं आहे. आयझॅक ऑसिमोव्हचे यंत्रमानवासंबंधीचे नियम या कथेत आहेत. वृत्तपत्र व्यवसायातले बारकावेही लेखकाने टिपलेले आहेत.

'आजीबाई : वय वर्षे तीन'[१३] ही विनोदी विज्ञान काल्पनिका यशवंत रांजणकर यांनी लिहिलेली आहे. २०५२ च्या सुरवातीला एका खाजगी कंपनीत अचानक एक खूप जुनी ऑर्डर सापडते. केवळ गंमत म्हणून या कंपनीचा प्रमुख कालयंत्राच्या सहाय्याने भूतकाळात जाऊन ती ऑर्डर पूर्ण करायचं ठरवतो. त्याप्रमाणे त्याची सहाय्यक नीना त्या ऑर्डरमधल्या डोअर–बेल, खेळण्याचा सेट, लहान मुलीसाठी फ्रॉक यासारख्या वस्तू भूतकाळात घेऊन जाते. त्यामुळे उडालेल्या गोंधळाचं वर्णन या कथेत आहे. वैज्ञानिक संकल्पना वापरून विनोदी काल्पनिका लिहिण्याचा प्रयत्न याठिकाणी आढळतो. अन्य विज्ञानकथांच्या तुलनेत ही विज्ञानकथा हलक्या–फुलक्या वातावरणातली आणि वेगळी वाटते.

'हिमप्रलय'[१४] ही जयंत नारळीकरांची विज्ञानकथा भविष्यकाळात घडणारी आहे. फ्रेड हॉयल यांच्या मूळ कथेवर आधारलेली ही विज्ञान-कथा मनोरंजक आहे. पृथ्वीवर हिमयुगाला सुरुवात होण्याची शक्यता आहे आणि या येऊ घातलेल्या संकटापासून पृथ्वीचं रक्षण करण्यासाठी उपाय-योजना आवश्यक आहे याची जाणीव सर्वप्रथम एका भारतीय शास्त्रज्ञाला होते. त्याची अवहेलना होते, प्रत्यक्ष हिमयुगाची सुरुवात झाल्यावर जगातली सारी शस्त्रास्त्रे वापरून क्षेपणास्त्रांचा मारा करून पृथ्वीच्या वातावरणात पसरलेली 'हिऱ्याची धूळ' म्हणजेच बर्फाचे कण नष्ट करण्याची

भव्य योजना आखली जाते. भारतीय शास्त्रज्ञांच्या सहकार्यानं ही 'ऑपरेशन इंद्र' योजना यशस्वी होऊन पृथ्वीला पूर्ववत् उष्णता मिळू लागते.

अशा प्रकारचं कथानक असलेली ही विज्ञानकथा चमत्कृतींपासून अलिप्त आहे. या कथानकात बर्फ पसरल्यावर दिसणारी मुंबई, ऑपरेशन इन्द्र योजनेची भव्यता या गोष्टी नारळीकरांनी अतिशय कल्पकतेने रंगविल्या आहेत.

द. त्र्यं. जहागिरदार यांच्या 'जुळा भाऊ' १५ आणि 'धूमकेतू' १६ या दोन्ही विज्ञानकथा भविष्याचा वेध घेणाऱ्या किंवा परग्रहावर घडणाऱ्या अशा प्रकारच्या नाहीत. वैद्यकीय शास्त्रावर आधारलेली 'जुळा भाऊ' आणि लवकरच पृथ्वीजवळ येऊ घातलेला हॅलेचा धूमकेतू व या धूमकेतूबद्दलचे गैरसमज यावर आधारित 'धूमकेतू' अशा या दोन विज्ञानकथा आहेत.

'जुळा भाऊ' या विज्ञानकथेत नागपूरला खूप मोठा व्यापार असणारे, फुटबॉल खेळाडू असलेले प्रतिष्ठीत श्रीमंत सेठ गिरीधारी आणि त्यांचा जुळा भाऊ यांची फार लहानपणी एका अपघातात ताटातूट होते. हा हरवलेला जुळा भाऊ भटकत–भरकटत केनियात जाऊन एक हॉकीपटू होतो. अंधूक आठवणींच्या आधारावर तो आपल्या भावाचा शोध घेत असताना त्याचा बरतगट, आनुवंशिकता यासारख्या शास्त्रीय गोष्टी त्याच्या मदतीला येतात. लुई फर्नांडिस असं नांव असलेल्या या खेळाडूच्या रक्तात आढळणारं 'ए' आणि 'ओ' या गटांचं रक्त आणि सेठ गिरधारी यांचं रक्त यावरून आनुवंशिकता शास्त्राचे तज्ज्ञ लुई आणि गिरिधारी जुळे भाऊ असल्याचं सिद्ध करतात.

जिनेटिक्स मधील 'ब्लड मोझेईक' हा प्रकार लेखकाला अभिप्रेत असावा असं या कथेचा वैज्ञानिक भाग वाचताना जाणवतं. यातला कथानकाचा भाग चांगला असला तरी वैज्ञानिक विश्लेषण देताना लेखक असमर्थ ठरले आहेत, असं म्हणावं लागतं. त्याचप्रमाणे आनुवंशिकतेची व्याख्या अतिशय चुकीची देण्यात आली आहे. या कथानकात लेखकानं जुळ्यांचे प्रकार सांगणं स्पष्टीकरणाच्या दृष्टीने आवश्यक होते.

'धूमकेतू' ही विज्ञानकथा एकीकडे या धूमकेतूबद्दल लोकांच्या मनात असलेली भीती, धूमकेतू आला म्हणजे संकटे येतात म्हणून चालणारे यज्ञ, पूजा यांचं वर्णन, तर दुसरीकडे याबद्दलचा शास्त्रीय दृष्टीकोन, धमकेतू पृथ्वीजवळ आल्यावर घडणाऱ्या घटनांचे शास्त्रीय विश्लेषण करणारी अशी कथा आहे.

धूमकेतू पृथ्वीजवळ येत असताना महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांची सहल घेऊन जंगलात गेलेल्या धाडसी प्राध्यापकाला विचित्र अनुभव येऊ लागतात. अचानक रानातली कुत्री सैरावरा धावायला लागून जोरात भुंकायला सुरुवात करतात. पक्षी ओरडायला लागतात. धूमकेतू पृथ्वीजवळून जात असताना पृथ्वीभोवतीचा ओझोन वायूचा थर विरळ होतो. त्यामुळे सूर्यप्रकाशामधे असलेले 'अल्ट्रा व्हायोलेट' किरण पृथ्वीवर जास्त प्रमाणात येतात. या किरणांमुळे प्राण्यांच्या वागणूकीत बदल होतो, ते अनियंत्रित होतात, असं स्पष्टीकरण लेखक करतात.

समाजातल्या अंधश्रद्धा, भाबडेपणा यांचे चित्रण करणारी, मनोरंजक आणि त्याचबरोबर परग्रहावरील जीवसृष्टीचा संबंध दाखवणारी विज्ञानकथा म्हणून शुभदा गोगटे यांच्या 'अस्मानी' १७ या कथेचा उल्लेख करता येईल. मनोरंजक कथानक आणि वैज्ञानिक पार्श्वभूमी यांचा मिलाप या दीर्घ विज्ञानकथेत आहे.

धर्मा पवार आपल्या मळ्यातल्या झोपडीत असताना त्याला भूकंपाचा धक्का जाणवतो. हा भूकंप रोज, दिवसातून दोनदा फक्त धर्माच्याच मळ्यात होतो. याचा परिणाम म्हणून त्याच्या मळ्यातली झाडं आकारानं खूप वाढतात. हा सगळा करणी किंवा भुताटकीचा प्रकार समजून गावकरी त्याच्या मळ्यावर बहिष्कार टाकतात. यावर उपाय करण्यासाठी धर्मा गावातल्या मांत्रिकाला बोलावतो. त्याची पूजा आणि मंत्रतंत्र निष्फळ ठरतात. शेवटी या प्रकरणात पोलिसांची मदत घेतली जाते. पोलिसांबरोबर जयदीप नावाचा वार्ताहर मळ्यात येतो. गावकऱ्यांशी गप्पा मारताना जयदीपची गाठ वेड्या शंकरशी पडते. या ठिकाणी ही विज्ञानकथा एकदम वेगळं वळण घेते. शंकरनं पाहिलेलं विचित्र विमान, त्या विमानातून

चार हाताच्या राक्षसानं उतरणं, विमानानं खडकां-मध्ये फसणं यासारख्या अनेक वारकाव्यांमधून ही विज्ञानकथा फुलत जाते. चार हात आणि दोन पाय असणाऱ्या प्राण्याची उत्क्रान्तीची कल्पनाही लेखिकेने अतिशय सोप्या शब्दात मांडली आहे.

'मृत्यूलस'[१८] ही यशवंत देशपांडे यांची कथा प्रयोगशाळेच्या वातावरणातली आहे. अपघात वगळता, नैसर्गिक रीतीनं माणसाला मृत्यू येतो म्हणजे नक्की काय ? यावर संशोधन करणारा एक शास्त्रज्ञ मृत्यूसाठी कारणीभूत असलेल्या पेशींना 'डेथसेल्स' असं नाव देतो. मृत्यू न येण्या-साठी उपाय म्हणून याच डेथसेल्स पासून तो 'मृत्यूलस' तयार करतो. पण अगदी शेवटच्या पायरीवर त्याचा हा प्रयोग फसतो. 'डायल्यूशन'-ची त्याची समस्या शेवटपर्यंत कायम राहते. याचं कारण देताना मात्र लेखक कथेला एकदम आध्या-त्मिक वळण देतात.

रा. वि. सोवनी यांची 'रंगीत कापूस'[१९] ही विज्ञानकथा तिच्या वेगळेपणामुळे लक्षात राहते. या कथेचा नायक सत्यव्रत जीन अभियांत्रिकी शास्त्रात प्रावीण्य मिळवतो. आपल्या संशोधन केन्द्रात तो निसर्गतःच रंगीत धाग्याचा कापूस असलेल्या कापसाच्या जाती निर्माण करतो. या क्रान्तिकारक शोधाची कुणकुण लागल्यावरोबर धनाढ्य शेठ घनश्यामदास त्याला निरनिराळी प्रलोभने दाखवतो. त्याचं संशोधन आपल्याला कळावं यासाठी अनेकप्रकारे दडपण आणतो. परंतु सत्यव्रत आपल्या संशोधनाशी अखेरपर्यंत प्रामाणिक राहतो; अशी ही वेगळ्या प्रकारची विज्ञानकथा आहे.

'वैऱ्याची रात्र संपली नाही'[२०] ही ग. रा. टिकेकर यांची विज्ञानकाल्पनिका रूपान्तरित आहे. कारिकां—१ या ग्रहावर उतरलेले दोन मानव, ग्रहावर येणारे वादळ, त्या वादळात सापडलेले या मानवांचे वाहन, त्यांना येणाऱ्या अडचणी या कथेत आहेत. ही एक अतिशय कंटाळवाणी, रूक्ष कथा आहे.

'साथ'[२१] या निरंजन घाटे यांच्या विज्ञान-कथेत अनेक लोकांना फसविणारा कार्वर मंगळावर पळून जाण्यासाठी एका अवकाशयानात शिरतो. कोणी आपल्याला ओळखू नये यासाठी तो टक्कल करतो. त्याचं हे डोक्यावर केस नसणंच त्याला विचित्र रोगाच्या साथीपासून वाचवतं. कारण या साथीचे जंतू माणसाच्या डोक्यातल्या उवांमधून पसरवले जात असतात.

'एक आगळा प्रयोग'[२२] या कथेत रा. वि सोवनी यांनी झाडांच्या पानांमधे असलेली साखर रोजच्या व्यवहारात वापरण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयोगाची कल्पना मांडली आहे. झाडांची पानं तोडून त्यांचा लगदा करायचा आणि चुनखडीवर हायड्रोक्लोरिक आम्ल टाकून मिळणारा कार्बन डाय ऑक्साईड त्यात सोडायचा असा हा प्रयोग असतो. यामुळे गावातल्या झाडांची दुर्दशा होते. ही साखर गावकऱ्यांना खूप महाग पडते शेवटी गावकरी हा आगळा प्रयोग थांबवतात.

'फसगत'[२३] ही प्रस्तुत लेखकाची विज्ञानकथा एच. जी. वेल्सच्या 'दि स्टोलन बॅसिलस' वर आधारलेली आहे. मूळ कथेत काळानुरूप बरेचसे बदल करण्यात आले आहेत.

यावर्षी (१९८४) प्रसिद्ध झालेल्या दिवाळी अंकामधल्या विज्ञानकथांपैकी निवडक कथांमधे निरंजन घाटे यांची 'अंतराळातील चाचेगिरी'[२४] ही विज्ञानकथा आहे. विमानांच्या अपहरणाची कल्पना घाटे यांनी अवकाशयानाच्या संदर्भात वापरली आहे. 'माय लव्ह' या अवकाशयानाचं अपहरण ही घटना भविष्यातल्या अंतराळ प्रवासा-तल्या धोक्याची कल्पना देते.

'विश्वामित्राची दुनिया'[२५] ही लक्ष्मण लोंढे यांची विज्ञानकथा अॅण्टी पार्टिकल्सच्या संकल्पनेवर रचलेली आहे. जवळजवळ एकाचवेळी भारताचे पंतप्रधान भारतात आणि पेकिंगला दूरदर्शनवर परस्पर विरोधी भाषणे करतात. त्यामुळे उडालेला गोंधळ लोंढे यांनी या कथेत टिपला आहे. या प्रकारामागचं रहस्य शोधण्यासाठी एक नोबेल पारितोषिक प्राप्त शास्त्रज्ञ पत्रकारपरिषद बोला-वतो. त्यामागचं शास्त्रीय कारण सांगतो. त्यासाठी वेगवेगळ्या आकृत्याही लेखकाने वापरल्या आहेत.

'इहलोक'[२६] ही याच लेखकाची विज्ञानकथा भौतिक शास्त्रातल्या श्रॉजिडरच्या समीकरणावर आधारलेली आहे. सामान्य वाचकाला हे समीकरण

अनुक्रमणिका

आणि त्याचा कथानकात केलेला उपयोग हा भाग समजायला बराच कठीण वाटतो. विश्व एकच नसून असंख्य आहेत अशी कल्पना करून नानूची कथा लेखक निवेदकाच्या भूमिकेतून सांगतात, या नानूचं शक्यतेच्या एका विश्वातून दुसऱ्या विश्वात जाणं, त्याचं वय न वाढणं या साऱ्या गोष्टी अनाकलनीय आहेत. याचे सुलभ असे स्पष्टीकरण लेखकाने दिलेले नाही.

'गद्दार'[२७] ही लक्ष्मण लोंढे यांची कथासंग्रहातली कथा दिवाळी अंकात पुन्हा प्रसिद्ध झाली आहे. अमेरिकेच्या गुप्त कारवायांची आणि योजनांची माहिती मिळवण्यासाठी एका डॉक्टरनं राष्ट्राध्यक्षाच्या मेंदूत बेमालूम बसवलेला ट्रान्समिटर कसा काम करतो, आणि एक निष्णात संशोधक डॉक्टर धनाच्या लोभाने कसा गद्दार होतो याची ही कथा आहे. या कथेत रहस्यमय वातावरण निर्माण करण्यात लेखक यशस्वी ठरले आहेत.

अरूण साधू यांची 'मंत्रजागर'[२८] ही आणखी एक उल्लेखनीय विज्ञानकथा आहे. संभाव्य अण्वस्त्रयुद्धाच्या भयानक परिणामाचं वर्णन करणाऱ्या आणि नैराश्याकडे झुकलेल्या बऱ्याच विज्ञानकथा आज लिहिल्या जात आहेत. 'मंत्र जागर' ही विज्ञानकथा या प्रकारात मोडते. अण्वस्त्र युद्धानंतर साऱ्या विध्वंसातून योजनाबद्ध रीतीने वचावलेल्या आणि दुसऱ्या माणसांचा शोध घेणाऱ्या, एकाकी माणसाच्या टोळीची ही कथा आहे. या जगातलं त्यांचं एकाकीपण, किरणोत्सर्गानं त्यांच्या शरीरावर झालेले आनुवंशिक दुष्परिणाम, पिढ्या न पिढ्या त्यांनी माणसाच्या शोधासाठी चालवलेली धडपड या सर्व गोष्टींमुळे कथानक मनाची पकड घेते. त्याचबरोबर ते अण्वस्त्र युद्धाचे परिणामही मनावर उमटवते.

पुष्पा त्रिलोकेकर यांच्या 'प्रतिभा आणि प्रतिमा'[२९] या विज्ञानकथेचाही मनोरंजक आणि वैशिष्टयपूर्ण विज्ञानकथा म्हणून आवर्जून उल्लेख करावा लागेल. प्रस्तुत लेखकाची 'नियम'[३०] ही विज्ञानकथा मूळ इंग्रजी कथेवर आधारलेली आहे. कॉम्प्यूटर युगात अवकाश प्रवासात आवश्यक म्हणून केलेला नियम कसा जाचक ठरतो, मानवानंच तयार केलेला नियम त्याला कसा असहाय बनवतो याचं वर्णन या कथेत आहे.

दिवाळी अंकांतल्या निवडक विज्ञानकथांच्या या त्रोटक आणि धावत्या आढाव्यावरून काही मुद्दे लक्षात येतात. एकूण विज्ञानकथांमध्ये अंतराळ आणि परग्रह या संबंधीच्या कथा जास्त प्रमाणात आढळतात. परग्रहावरील प्राण्यांचे वर्णन करण्याची शैली सुद्धा चाकोरीबद्ध वाटते. 'डाव' कथेतले फ्रेसम ग्रहावरचे दोन विचित्र प्राणी पृथ्वीवर येतात, ते मानवांना आपल्या जाळयात फसवून पृथ्वी निर्मनुष्य करण्यासाठी, तर 'वॉन्डरिंग ज्यू' मध्ये प्राण्यांच्या ऐवजी वनस्पती येतात, त्या सुद्धा शत्रुत्वाच्याच भावनेने. हे सर्वच शत्रू पृथ्वीवरील माणसांपेक्षा सशक्त आणि बुद्धिमान, अतिप्रगत असतात. 'अस्मानी'तले परग्रहवासी मानवाशी मैत्री करण्यासाठी उतरतात, खरे, पण त्यांच्या भावना लक्षात न घेताच त्यांच्या विमानावर दगडांचा मारा केला जातो.'तारकांचे अश्रू'मधले जॉइलॉनी संस्कृतीचे लोक मानवापेक्षा मागासलेले आहेत. आणि मानवी स्वभावाला अनुसरून माणसाने त्यांचा गैरफायदाही घेतला आहे. त्यांना गुलाम केलं आहे. हीच गोष्ट 'महाप्रस्थान'मधल्या श्रेष्ठींच्या बाबतीत माणसाने केलेली आहे. मंगळावरच्या या मानवसदृष्य परंतु मानवापेक्षा अशक्त प्राण्यांचा त्याने लोकर मिळवण्यासाठी भयंकर संहार केलेला आहे. 'वैऱ्याची रात्र संपली नाही' मधले कारिका–१ ग्रहावरचे प्राणीही अप्रगत आहेत.

विज्ञानकथांमधले शास्त्रज्ञ :

बहुतांश विज्ञानकथांमध्ये शास्त्रज्ञाचे किंवा संशोधकाचे पात्र हे अतिशय महत्त्वाचे असते. 'अंतराळातील भस्मासूर' नियंत्रणाबाहेर जाण्याचा धोका निर्माण झाल्यावर तो धोका टाळण्याची जबाबदारी शास्त्रज्ञावर येऊन पडते, तर 'हिमप्रलय'मध्ये सुद्धा भारतीय शास्त्रज्ञ पुढाकार घेऊन 'ऑपरेशन इंद्र' योजना यशस्वी करून पृथ्वीच्या वातावरणात पसरलेली हिऱ्याची धूळ नष्ट करतात. नारळीकरांच्या कथांमधले शास्त्रज्ञ

माणसाचं भलं करणारे, मानवाला संकटमुक्त करण्यासाठी विज्ञान–तंत्रज्ञान यांचा वापर करणारे 'हिरो' आहेत, तर 'रघुनाथरावांची माया' मधले रघुनाथराव आगाशे हे यंत्रमानवांमधले तज्ज्ञ आपली बुद्धी आणि कौशल्य आपल्याच मित्राला त्रास देण्यासाठी खर्ची घालणारे आहेत. 'महाप्रस्थान' मधला इतिहास संशोधक उदयन् वाडधाच्या शोधात आपले प्राण गमावतो. 'वॉन्डरिंग ज्यू' मधला वनस्पतीशास्त्रज्ञसुद्धा परक्या वनस्पतीला आपल्या जवळ ठेवून स्वत:चाच नाश ओढवून घेतो. 'हरवलेली आगगाडी'तले तज्ज्ञ वाचकांच्या समोर येतच नाहीत. कुठल्याही प्रकारचं स्पष्टीकरण न करता हे स्वत:च हरवलेल्या आगगाडीत बसून हरवतात; तर 'रंगीत कापूस' मधला सत्यव्रत अनेक प्रलोभने, दडपणे यांना बळी न पडता आपलं संशोधन सुरू ठेवतो.

'जुळा भाऊ', 'विश्वामित्राची दुनिया', 'इहलोक' या कथांमधले शास्त्रज्ञ केवळ वैज्ञानिक स्पष्टीकरणाची जबाबदारी पार पाडतात. 'मृत्यूलस'चे संशोधक अमर होण्यासाठी धडपडतात; तर 'फसगत' मधले प्रोफेसर वेंधळेपणाने नुसताच गोंधळ घालतात 'मंत्रजागर' मधला शास्त्रज्ञ, निर्जन बेटावरची एकाकी पडलेली मानवजात वाढावी, तिचा इतराशी संपर्क यावा यासाठी धडपडतो. शास्त्रज्ञांचे असे वेगवेगळे पैलू वेगवेगळ्या कथांमधे आढळतात.

विज्ञानकथा आणि पत्रकार :

शास्त्रज्ञाप्रमाणेच 'पत्रकार' हे पात्र सुद्धा महत्त्वाची भूमिका पार पाडताना विविध विज्ञानकथांमधे दिसून येतं. शास्त्रज्ञ आणि समाज यांना सांधणारा एक दुवा म्हणूनही याची योजना केली जाते. 'हिमप्रलय' मधे प्रत्यक्ष बर्फ पडायला सुरवात झाल्यावर अज्ञातवासात गेलेल्या भारतीय शास्त्रज्ञाचा शोध एक पत्रकार घेतो; तर 'पेरूवाडीतील पुष्पक प्रकरणाचा' पूर्ण छडा लावण्याची जबाबदारीही पत्रकारच पार पाडतो. दुर्दैवानं या पत्रकाराला संपादकांच्या दडपणामुळे या प्रकरणाची वाच्यता करता येत नाही, असाच पत्रकार 'रघुनाथरावांची माया' बघायलाही येतो. 'अस्मानी' कथेत धर्मा पवारच्या मळयात होणाऱ्या भूकंपाचं रहस्य उलगडण्याची आणि वेडया शंकरला गाठून माहिती काढण्याची जबाबदारी जयदीप हा हुशार पत्रकार पार पाडतो. विज्ञानकथांमधे शास्त्रज्ञाच्या खालोखाल 'पत्रकार' या व्यक्तीला महत्त्व प्राप्त झालयाचं आढळून येतं.

विज्ञान आणि सामान्य माणूस

या विज्ञानकथांमधे सामान्य माणसाचा सहभाग तुलनेने फारच कमी आढळतो. 'आजीबाई वय वर्षे तीन' या विनोदी कादंबरिकेत गोंधळ घालणारी सामान्य माणसं येतात. त्याच प्रमाणे 'पेरूवाडीतील पुष्पक प्रकरणात' नित्यानंद स्वामींच्या नादी लागणारी, 'वॉन्डरिंग ज्यू' मधे वनस्पतीला देवता मानून तिच्यावर गाणी रचणारे आदिवासी, तर 'अस्मानी'त धर्मा पवारच्या मळयातल्या भुताटकीला घाबरणारी सामान्य माणसं दिसतात. त्यामुळे या कथा वाचकाला जवळच्या वाटतात. अन्य कथांचं विश्व हे शास्त्रज्ञ, प्रयोगशाळा, अंतराळयान, परग्रह यांच्यापुरतं मर्यादित राहतं.

विज्ञानकथा वाचकप्रिय व्हावी, वाचकांना तिच्यात 'आपले' पणा वाटावा, यासाठी कथानकात वैज्ञानिक वातावरणाबरोबरच समाजाचं, त्यातल्या सामान्य व्यक्तींचं चित्रण येणं योग्य ठरेल, असं मत व्यक्त केल्यास ते अप्रस्तुत ठरणार नाही.

संदर्भ सूची :

१. नारळीकर, जयंत. : अंतराळातील भस्मासूर. किर्लोस्कर दि. अं. १९८१.
२. जहागिरदार, द. व्यं. : हरवलेली आगगाडी. तरुण भारत नागपूर दि. अं. १९८१.
३. नारळीकर, जयंत. : पेरूवाडीतील पुष्पक प्रकरण. महाराष्ट्र टाईम्स दि. अं. १९८१
४. घाटे, निरंजन : शिक्षा–प्रशिक्षा सृष्टीज्ञान दि. अं. १९८१
५. जोशी, नारायण : वाया गेलेले हौतात्म्य. सृष्टीज्ञान दि. अं. १९८१.

अनुक्रमणिका

६. सोवनी, प्रभाकर : आधांतरी. सृष्टीज्ञान दि. अं. १९८१.
७. रांजणकर, यशवंत : महाप्रस्थान नवल दि. अं. १९८२.
८. घाटे, निरंजन : तारकांचे अश्रू. नवल दि. अं. १९८२.
९. त्रिलोकेकर, पुष्पा : वॉन्डरिंग ज्यू. लोकप्रभा दि. अं. १९८२.
१०. वर्मा, प्रदीप : डाव. लोकप्रभा दि. अं. १९८२.
११. सुखठणकर, प्रकाश : मी बोलतोय लोकप्रभा दि अं. १९८२.
१२ घाटे, निरंजन : रघुनाथरावांची माया, नागपूर पत्रिका दि. अं. १९८२.
१३. रांजणकर, यशवंत : आजीबाई : वय वर्षे तीन. मोहिनी दि. अं. १९८२.
१४. नारळीकर, जयंत : हिमप्रलय. किर्लोस्कर दि. अं. १९८२.
१५. जहागिरदार, द. व्यं. : जुळा भाऊ. लोकमत दि. अं १९८२.
१६. जहागिरदार, द. व्यं. : धूमकेतू तरुण भारत दि. अं. १९८२.
१७. गोगटे, शुभदा : अस्मानी. नवल दि. अं. १९८२.
१८. देशपांडे, यशवन्त : मृत्यूलस. पारिजात दि. अं. १९८२.
१९. सोवनी, रा. वि. : रंगीत कापूस. सुगंध दि. अं. १९८२
२०. टिकेकर, ग. रा. : वैऱ्याची रात्र संपली नाही. नवल दि. अं. १९८३.
२१. घाटे, निरंजन : साथ. नवल दि. अं. १९८३.
२२. सोवनी, रा. वि. : एक आगळा प्रयोग, सुगंध दि. अं. १९८३
२३. सावदेकर, विश्वेश्वर : फसगत. नागपूर पत्रिका दि. अं. १९८३
२४. घाटे, निरंजन : अंतराळातील चाचेगिरी. लोकमत दि. अं. १९८०.
२५. लोंढे, लक्ष्मण : विश्वामित्राची दुनिया. तरुण भारत पुणे दि. अं. १९८४.
२६. लोंढे, लक्ष्मण : इहलोक, अक्षर दि. अं. १९८४.
२७. लोंढे, लक्ष्मण : गद्दार, : साहित्य सूची. दि. अं. १९८४.
२८. साधू, अरुण : मंत्रजागर. श्री दि. अं. १९८४.
२९. त्रिलोकेकर, पुष्पा : प्रतिमा आणि प्रतिभा. लोकप्रभा, दि. अं. १९८४.
३०. सावदेकर, विश्वेश्वर : नियम. युगवाणी दि. अं. १९८४.

△ △

विश्वेश्वर सावदेकर.
१०६, मथुरा, गांधीनगर, नागपूर–१०

कवी कथाकारांसाठी

० युगवाणी नव्या–जुन्या प्रतिभावंत साहित्यिकांचे व्यासपीठ आहे. युगवाणी प्रत्येक दर्जेदार कथा कवितेची आवर्जून दखल घेते. तुमच्या नव्या समर्थ कथा–कवितांना युगवाणीत स्थान आहेच !

नागीण २४

आनंद सदाशिव सहस्त्रबुद्धे

माझ्यासमोरच्या टी. व्ही. स्क्रीनवर अक्षरे उमटत होती.. ५–४–३–२–१–इग्निशन !

एक मोठा धडका झाला माझ्या रॉकेटने— RISS 4 (रिझंव्हंड इंडियन स्पेस शिप-४) ने अवकाशाकडे झेप घेतली—भारतातल्या लक्षद्वीप-वरील स्पेस सेंटरशी माझा संवाद सुरू झाला. वेळेच्या अभावी फक्त पहिल्या पृथ्वी प्रदक्षिणे-नंतर माझे यान भूस्थिर करण्यात आले. माझे यान भारतातले मध्यवर्ती शहर नागपूरवर उभे होते. लक्षद्वीप बेटावरील स्पेस सेंटरशी मी बोलणे थांबवले आणि नागपूरच्या S. P. 24 A. C. (सोलर प्लांट २४ अॅडमिनिस्ट्रेशन सेंटर) शी संपर्क प्रस्थापित केला.

"एस. आनंद, डू यू रीड अस ? ओव्हर"

"लाऊड अॅन्ड क्लिअर ! ओव्हर" मी प्रत्युत्तर दिले. प्लांट २४ चे सर्व कंट्रोल आम्ही तुम्हाला देणार आहोत तुम्ही तयार आहात ? ओव्हर."

"मी संपूर्णपणे तयार आहे. ओव्हर" सोलर प्लांट २४ चे एक एक करून सगळे कंट्रोल नागपूरच्या S. P. 24 A. C. वरून तोडून माझ्या कडे देण्यात आलेत. नागपूरच्या सेंटरवर प्रत्येक कंट्रोलवर लक्ष देणारा एक एक शास्त्रज्ञ होता. येथे मात्र मी एकटाच होतो म्हणून प्रत्येक कंट्रोल हातात आल्यावर तो ठाकठीक आहे हे बघून मी त्याला "ऑटो" (स्वयंचलीत) वर टाकून देत होतो. अक्षरशः १५ मिनिटात सोलर प्लांट २४ पूर्णपणे माझ्या अमलाखाली आला. फक्त दोन कंट्रोल अॅक्टीव्हेशन आणि अँगल मात्र नीट काम देत नव्हते. त्याला प्रत्युत्तरच मिळत नव्हते. त्यामुळे फक्त तेवढे दोन कंट्रोल मी मॅनुअलवर ठेऊन त्यांच्याशी खटपट करीत होतो.

तेवढ्यात माझ्या कम्युनिकेशन स्क्रीनवर सिग्न-लस् येऊ लागलेत. मी कम्युनिकेशन ऑन केले. टी. व्ही. स्क्रिनवर एका अनोळखी माणसाचा चेहरा चमकला. मी सर्वप्रथम "कम्युनिकेशन ' भारतातल्या M. F. C. (मास्टर फॅसिलिटी-कंट्रोल) ला रिले करायला सुरुवात केली. तो अनोळखी चेहरा चक्क हसला. म्हणाला, "हॅलो, ओळखले मला ? मी आहे केरिप्रॉनचा अध्यक्ष. तू स्पेस मध्ये जाऊन काहीही केलेस तरी सोलर प्लॅन्ट २४ चे अँगल आणि अॅक्टीव्हेशन कंट्रोल तुला मिळ-वता येणार नाहीत ! तुमच्याच प्लांटचा उपयोग आम्ही तुम्हाला नष्ट करायला वापरणार आहो. काल जरा आमचा अँगल चुकला, नाहीतर आत्तापर्यंत सोलर प्लांट २४ वंद पडलेला दिसला असता ! असो पुढच्या वेळेला आम्ही चूक न होण्याची काळजी घेऊ !!" क्षणभर थांबून तो पुढे म्हणाला,

"अजूनही वेळ आहे तुम्ही आमचे आधिपत्य मान्य करा. तुमचा प्लॅन्ट आम्ही नष्ट करणार नाही. जर तुमची आमच्याशी समझौता करण्याची इच्छा असेल तर तू आपले यान घेऊन ताबडतोब परत येऊन जा, गुडबाय !" कम्युनिकेशन स्क्रीन कोरी झाली. तर एकंदरीत ही केरीप्रॉन देशाची कृपा होती. आमची 'नागीण' आमच्यावरच उलटवण्याचा प्रयत्न त्यांनी चालवला होता. ह्यांना नाही धडा शिकवला तर नावाचा एस. आनंद नाही, मी मनातल्या मनात म्हणालो

तेवढ्यात पुन्हा कम्युनिकेशन स्क्रीन उजळली भारतांच्या राष्ट्रपतींचा चेहरा तेथे दिसू लागला. "एस आनंद. केरीप्रॉनशी आम्ही समझौता कर-

ण्याच्या विचारात आहोत तुम्ही आपले यान घेऊन परत फिरा !"

"सॉरी सर ! काहीही झाले तरी मी परत फिरणार नाही. सोलर प्लॅन्ट २४ शी माझे मानसिक नाते जुळलेले आहे! त्याला मी नष्टही होऊ देणार नाही किंवा तो अजून एखाद्याच्या हाती लागू देणार नाही !"

"एस. आनंद तुम्ही शुद्धीवर आहात का? तुम्ही जर परत फिरला नाहीत. तर तुमच्या प्लांट तर नष्ट होईलच आणि सारा देश संकटात पडेल. तुम्ही तावडतोब परत फिरा, हा तुम्हाला तुमच्या राष्ट्रपतींचा आदेश आहे."

"सर तुमच्या कोणताही आदेश मी पाळायला तयार आहे. परंतू परत फिरण्याचा आदेश मी मानणार नाही." मी सरळ कम्युनिकेशन युनिट बंद करून टाकले.

घड्याळात भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळचे नऊ वाजत होते. आता संध्याकाळ होईपर्यंत तरी धोका नव्हता.

माझा आणि माझ्या देशाचा सोलर प्लांट वाचवण्याची सगळी जबाबदारी माझ्यावर होती. काय करावे याचा विचार मी करू लागलो आणि विचारामधून गेल्या २० वर्षांचा भूतकाळ माझ्या डोळ्यासमोर उलगडला गेला.

* * *

१९ एप्रिल २०४० ची गोष्ट. दक्षिण अमेरिकेत देशोदेशीच्या शास्त्रज्ञांची बैठक भरली होती. बठकीसमोर प्रश्न एकच होता ऊर्जा प्रश्न ! प्रत्येक देशाच्या शास्त्रज्ञांनी आपापल्या परीने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालविला होता. कारण फारतर पुढच्या ५-६ वर्षात मंगळावरील तेलाचे साठे संपणार होते आणि पृथ्वीजवळच्या दुसऱ्या कोणत्याच ग्रह अगर उपग्रहावर तेलाच्या साठ्यांचे नावनिशाण नव्हते. पृथ्वीवरील तेलसाठे कधीचेच संपले होते. ह्या सर्व शास्त्रज्ञांमध्ये ८ शास्त्रज्ञांनी भरपूर मेहनतीने एक वनस्पती शोधली होती. तिचे नाव त्यांनी पेट्रोलियाना व्हल्गॅरिस ठेवले होते. हे झाड कुठेही अक्षरशः वाळवंटात सुद्धा वाढू शकत असे. हे झाड पाण्यात बुडवून ठेवल्यावर फक्त ८ दिवसात ते संपूर्णपणे कुजून त्याचे पेट्रोलियम सादृश्य द्रवात रूपांतर होत असे व ह्याच "तेलाचा" उपयोग निरनिराळ्या यंत्रात, काही प्रक्रिया करून; इंधन म्हणून करता येत असे.

ह्या सर्व शास्त्रज्ञांनी घोषणा केली की ज्या देशाला इंधनाची आवश्यकता असेल त्याने आमचा गुलाम व्हावे. देशातली २५ टक्के जमीन आम्हाला पेट्रोलियाना व्हलगॅरिसच्या लागवडीसाठी द्यावी. आणि अमुक इतकी रक्कम वा सोने खंडणी म्हणून द्यावे ! ज्या आठ शास्त्रज्ञांनी त्या वनस्पतीचा शोध लावला होता त्यांनी आपल्या नावाची अद्याक्षरे जळवून एक शब्द तयार केला "केरी-प्रॉन" (KERIPRON) दक्षिण अमेरीका केरी-प्रॉन नावाने ओळखले जाऊ लागले. सन २०६० पर्यंत जगातल्या एकूण एक देशाने केरीप्रॉनची शरणागती पत्करली. अपवाद होता एकच देश भारत ! कारण २०५० मधेच भारताचा सोलर प्लांट २४ कार्यरत झाला, जो आजतागायत चालू होता ! सोलर प्लांट २४ ची माहिती थोडक्यात अशी देता येईल.

एकूण २४ छोटेखानी उपग्रह एक वर्तुळाकृती आकारात अवकाशात भूस्थिर केलेले होते. या प्रत्येक उपग्रहावर एक एक प्रचंड मोठा मेटॅलिक रिफ्लेक्टर किंवा धातूचा आरसा बसवला होता. हे आरसे सदैव झाकून ठेवलेले असत. फक्त ॲक्टी-व्हेशन कंट्रोल वापरल्यास त्यांच्यावरचे आवरण दूर होत असे. रोज रात्री ११ वाजून ५९ मिनिटांनी ॲक्टिव्हेशन कंट्रोल वापरून ही आच्छादने दूर केली जात. ह्या चोवीसही "आरशा"वरून सूर्याचा प्रकाश पृथ्वीवर परावर्तित केला जात असे. ज्या-वर्तुळावर हे आरसे बसवले होते त्या वर्तुळाचा मध्यबिंदू होता नागपूर ! आणि परावर्तित झालेला प्रकाश येथेच एकवटला जाई. नागपूर शहरात एक अतिप्रचंड आकाराचे नसराळे बसवले होते. याच्या आंत तो प्रकाशाचा तेजस्वी स्रोत शिरत असे व मग त्याला शक्तिशाली परावर्तकांचा उपयोग करून एक सोलर पॅनलवर (सौर पट्टीकेवर) पाडून विद्युत ऊर्जा निर्माण केली जात असे. निर्माण झालेली वीज जमिनीखालून नेलेल्या केबल द्वारा मुंबई, दिल्ली, मद्रास व कलकत्ता येथे पाठवली जाई. ह्या विजेने ह्या सर्व शहराबाहेर बसवलेल्या

महाकाय बॅटऱ्या चार्ज केल्या जात ! बरोबर रात्रीचे १२ वाजून १ मिनिटांनी अवकाशातल्या चोवीसही आरशांना झाकून टाकले जाई. केवळ दोन मिनिटांमध्ये तयार केल्या गेलेल्या विजेवर २४ तासपर्यंत सगळी कामे विनासायास पूर्ण होत. ह्या चार्ज केल्या गेलेल्या महाकाय बॅटऱ्यांवर भारतातल्या रेल्वे गाड्या, कापडाच्या गिरण्या, निरनिराळे कारखाने चालवले जात. ज्यावेळी प्रकाशाचा तो प्रखर झोत नागपुरातल्या कन्व्हर्शन युनिटच्या नसराळ्या शिरत असे तेव्हा ते नसराळे प्रचंड तापून जाई. त्याला पाण्याच्या प्रवाहाने थंड करावं लागे. ह्या पाण्याची जी वाफ होई त्याने एक विद्युत जनित्र चालवल्या जात असे. व साऱ्या नागपूर शहराच्या विद्युत मागणीचा पुरवठा पूर्ण केला जात असे !!

नागपूर शहरावर ढगांचे आवरण असल्यास अँगल कंट्रोल वापरून आरशांचे तोंड दिल्लीकडे वळवले जाई आणि तेथल्या कन्व्हर्शन युनिटमध्ये विद्युत निर्मिती केली जाई. काही कारणाने दोन्ही ठिकाणी विद्युत निर्मिती होऊ शकली नाही तर उर्जेची कमी भासू नये म्हणून ४८ तासांपर्यंत विद्युत पुरवठा करू शकतील अशा स्टॅंडबाय् बॅटऱ्या चार्ज करून ठेवलेल्या असायच्या त्या वेगळ्याच ! अजून एका कन्व्हर्शन युनिटचे बांधकाम मद्रासजवळ सुरू करण्यात आले होते. २०४८ साली मी गुप्तचर खात्यात नव्हतो. त्यावेळी मी भारताच्या स्पेस एक्सपरीमेंटस मध्ये अॅस्ट्रॉनॉट होतो. सोलर प्लांट २४ मधल्या २४ पैकी १३ "आरशांना" भूस्थिर कक्षेत नेऊन बसवण्याचे कार्य मी स्वत: केले होते आणि म्हणून मी सोलरप्लांट २४ ला माझा प्लांट समजत असे. ह्या प्लांटचे मुख्य केंद्र नागपूरला असल्याने आम्ही ह्या योजनेला गमतीने नागीण २४ असेही म्हणत असू. आज केरीप्रॉनने ह्या नागिणीला डिवचले होते.

त्याचे झाले असे की काल संध्याकाळी सहा वाजता मुंबईचे वातावरण पाहता पाहता गरम झाले. अरबी समुद्राच्या पाण्याला अक्षरश: उकळी फुटली. हवेत वाफेचे प्रचंड झोत उसळले. सगळ्या मुंबईत एक चमत्कारिक लखलखीत प्रकाश पसरला फक्त दोन मिनिटे हाहाकार माजला आणि सगळे शांत झाले पण येवढ्या दोन मिनिटात समुद्रकिनाऱ्याजवळची सगळी मुंबई जळून तिथे केवळ राख उरली. लाखो लोक जळून मेले, हजारो भाजून निघाले. एवढ्या प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माणच कशी झाली याचा कोणालाही पत्ता लागला नाही !

आणि त्याचवेळी नागपुरच्या S. P. २४ A. C. मधे खळबळ उडाली होती. रात्री ११ वाजून ५९ मिनिटांऐवजी संध्याकाळी सहा वाजताच सोलर प्लांट २४ च्या आरशांची आवरणे उघडल्या गेली होती व संध्याकाळी सहा वाजताच्या सूर्याच्या प्रकाश परावर्तित करता येईल. इतपत त्यांचा 'अँगल' ही बदलला गेला होता. असे का व्हावे याचे उत्तर कोणालाच देता येत नव्हते. रात्री ११ वाजून ५९ मिनिटांपर्यंत वाट बघण्यात आली पण आता मात्र त्या आरशांची आवरणे निघाली नाहीत. की नागपूरला वीज निर्मिती होऊ शकली नाही. रात्री साडेबारापर्यंत अॅक्टीव्हेशन व अँगल कंट्रोलशी बरीच खटपट करण्यात आली पण काहीच उपयोग झाला नाही.

दिल्लीला तावडतोब एक तातडीची मिटिंग भरवण्यात आली; भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, ऊर्जा मंत्री S. P. २४ चे प्रमुख अधिकारी व माझ्यासारखे ते अॅस्ट्रोनॉट ज्यांनी सोलर प्लांट २४ च्या निर्मितीत भाग घेतला होता, या सर्वांना बोलवण्यात आले. वास्तविक पाहता मला अवकाश यंत्रांचा कंटाळा आला होता म्हणून मी राजीनामा दिला होता. त्याचवेळी भारताच्या गुप्तचर खात्याला अंतराळ यात्रेसाठी प्रशिक्षित अशा काही उमेदवारांची जरूर होती; म्हणून मी तेथे अर्ज केला होता व सिलेक्ट होऊन माझ्या प्रशिक्षणाला सुरुवातही झाली होती. पण माझा संबंध Solar Plant 24 शी असल्याने. मला रात्री १ वाजता फोन करून बोलावून घेतले होते. बरीच चर्चा झाल्यावर मी बोलण्याची परवानगी मागितली. मी म्हणालो; सन्माननीय राष्ट्रपती, पंतप्रधान व इतर अधिकारी वर्ग–केवळ येथे बसून व खल करून सोलर प्लांटच्या बिघाडाचे निदान करता येणार नाही.मला असे वाटते आपण एखाद्या जाणत्या शास्त्रज्ञाला अवकाश यानातून Solar Plant च्या मध्यबिंदूवर पाठवावे. पृथ्वीवरील सगळे कंट्रोल त्याच्या

हातात द्यावे. कदाचित तेथून तो झालेल्या विघाडाचे निदान नीट करू शकेल व तो दोषही दूर करू शकेल."

माझ्या या वक्तव्यावर दोनचार मिनिटे विचार-विनिमय झाला. पंतप्रधान मला म्हणाले, "ठीक आहे. मिस्टर एस. आनंद ह्या कामासाठी आम्ही तुमची निवड करतो आहोत. आत्ता पहाटेचे ३ वाजताहेत. तुम्ही ४ वाजता उड्डाण करा !" मला तावडतोब तेथून बाहेर काढून दिल्ली विमानतळावर नेण्यात आले व एका सुपर सॉनिक कॉंकर्ड विमानाने मी फक्त ४५ मिनिटात लक्षद्वीप बेटावर पोहोचलो. प्रवासात मला सांगण्यात आले की अडी-अडचणींच्या वेळी उपयोगात आणता यावे म्हणून एक रॉकेट लक्षद्वीप बेटावर उड्डाणाची संपूर्ण तयारी करून ठेवलेले असते ! आणि ठरविल्याप्रमाणे पहाटे चार वाजता माझा अंतराळ प्रवास सुरू झाला.

* * *

माझ्या घड्याळात सकाळचे १० वाजून गेले होते. भारतातल्या कोणत्यातरी देशद्रोह्याने सोलर प्लांट २४ चे अँगल व अॅक्टिव्हेशन कंट्रोल केरीप्रॉन देशाला विकून सगळ्या देशाचे भवितव्य अंधारात बुडवले होते. काल संध्याकाळी केरीप्रॉन देशाने अँगल चुकीचा लावल्याने प्रकाशाचा झोत नागपूरवर पडण्याऐवजी मुंबईजवळ अरबी समुद्रात पडला. जर तो नागपूरवर पडला असता तर ? त्यावेळी नागपूरच्या नसराळ्याचे तोंड बंद असते. त्यामुळे विद्युत निर्मिती न होता नागपूरची व त्याचबरोबर S. P. 24 A. C. ची राख झाली असती ! आणि सोलर प्लांट २४ नेहमी करता निरुपयोगी झाला असता !! अॅक्टीव्हेशन कंट्रोल वापरून आरशांवरची आवरणे दूर केल्यावर दोन मिनिटांनी ती आपोआप बंद होऊन जात. जर ही सोय नसती तर काल मुंबईचं काय झालं असतं ? माझ्या अंगातून एक थंड शिरशिरी निघून गेली. माझ्या डोळ्यासमोर केरीप्रानच्या अध्यक्षांचा चेहरा चमकून गेला. त्यांचे वाक्य आठवले, "–तू काहीही केलेस तरीही तुला अॅक्टीव्हेशन व अँगल कंट्रोल मिळवता येणार नाही–" आणि माझ्या डोक्यात विजेसारखा विचार चमकला केरीप्रॉनला फक्त हे दोनच कंट्रोल वापरता येतात इतर कोणतेच नाही. तेव्हा आज संध्याकाळी पुन्हा एकदा ते अँगल दुरुस्त करून नागपूरला जाळण्याचा प्रयत्न करतील.

मी ताडकन उठलो. यानातल्या इंटेलिजन्स सेक्शन जवळ गेलो (अर्थातच तरंगत) आणि सोलर प्लांट २४ च्या स्पिड (वेग) व थर्स्टर (चोवीसही उपग्रहांचा वेग कमी जास्त करता येण्यासाठी वापरल्या जाणारी छोटी छोटी बुस्टर रॉकेटस्) डाटा मागवला. डाटा मिळताच मी गणकयंत्राजवळ गेलो. भराभरा निरनिराळ्या आकडेमोडी केल्या. आलेले रिझल्टस् नोंदून तडक कंट्रोलस् सेक्शनला गेलो. Solar Plant 24 चे स्पिड व थर्स्टर कंट्रोल 'ऑटो'वरून मॅन्युअलवर आणले. गणक यंत्राने दिलेल्या रिझल्टनुसार सगळे प्रोग्रॅमींग करून काऊंट डाऊन सेट केला. भारतीय प्रमाण वेळेनुसार ठीक दुपारच्या १२ वाजता चोवीसही आरसाधारी उपग्रहांची बुस्टर्स फायर झालीत आणि त्यांचा वेग कमी झाला. मी माझ्या यानाचाही वेग ह्या उपग्रहांइतका केला त्यामुळे मी त्यांच्या मध्यबिंदूवर कायम होतो. आता मला सपाटून भूक लागली होती. मी निश्चितपणे कुकींग ओव्हनकडे वळलो ! आरामात ज़ेवणखाण आटोपले. माझ्या घड्याळात भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळचे साडेपाच वाजले होते. मी यानातले सगळे कंट्रोल ऑटोवर टाकून यानाखालच्या ऑबझरव्हेशन चेंबरमध्ये आलो. हा चेंबर संपूर्ण काचेचा होता. तेथून पृथ्वी स्पष्टपणे दिसत होती. ह्या चेंबरमधे एक T. V. होता. त्यावर कोणताही डिस्प्ले घेता येत होता. त्यावर मी कम्युनिकेशन डिस्प्ले घेतला. कम्युनिकेशन ऑन केले तसा T. V. वर भारताच्या राष्ट्रपतींचा चेहरा उजळला. "मि. एस. आनंद तुम्ही हे काय चालवले आहे. गेले आठ तास तुम्ही आमच्याशी संपर्क सुद्धा ठेवला नाही ! केरीप्रॉनने आम्हाला संध्याकाळी ६ वाजेपर्यंतची मुदत दिली आहे. तुम्ही सोलर प्लांट २४ चे सगळे कंट्रोल नागपूरच्या S. P. 24 A. C. ला देऊन तावडतोब परत फिरा ! हा आमचा हुकूम आहे !" त्यानंतर पंतप्रधान S. P. 24 चे अधिकारी यांनी माझे मन वळवण्याचा प्रयत्न केला पण मी एका शब्दानेही प्रत्युत्तर दिले नाही.

६ वाजायला फक्त ५ मिनिटे उरली होती. पुन्हा एकदा टी. व्ही. स्क्रिनवर केरीप्रॉनचे अध्यक्ष आले. "हॅलो यंग मॅन ! एकंदरीत तुला तुझा सोलर प्लांट वाचवण्याची काही इच्छा दिसत नाही तर ! असो आता थोड्याच वेळात ६ वाजतील. भारतात सुरू होणारी ही संध्याकाळ पारतंत्र्याच्या रात्रीत बदलेल तर केरीप्रॉनला वाजणारे सकाळचे ६ त्यांच्या विश्व विजयाचा दिवस दाखवतील." माझ्या चेहऱ्यावर एक मंदस्मित पसरले. घड्याळात सहा वाजायला १ मिनिट उरला होता. मी डोळे ताणून पृथ्वीकडे बघू लागलो. Solar Plant 24 ने परावर्तित केलेला सूर्यप्रकाश पृथ्वीच्या वातावरणाला टेकताच त्या त्या ठिकाणी प्रकाशाचे ठिपके मला दिसले. हे ठिपके २४ प्रकाश रेखांमधे बदलले. ह्या चोवीसही प्रकाश रेखा पृथ्वीवर एका बिंदूवर आदळल्या. मी कम्युनिकेशन स्क्रिनवर नजर फेकली. तेथे दिसणाऱ्या केरीप्रॉन देशाच्या अध्यक्षांच्या हसऱ्या चेहऱ्यावर एक वेदना पसरली. पुढच्या क्षणाला सगळी स्क्रिन लाल झाली आणि मग काहीही दिसेनासं झालं ! पुढची दोन मिनीटपर्यंत Solar Plant 24 ने पाठवलेला प्रकाशझोत पृथ्वीवरच्या त्या बिंदूवर पडतच होता. मला माझ्या यानातून त्या ठिकाणी एक लालभडक ठिपका दिसत होता. पृथ्वीवरचा तो बिंदू नागपूर नव्हता ते होतं केरीप्रॉन !! योग्य त्या शक्तीची थस्टर्स फायर करून मी Solar Plant 24 च्या चोवीसही उपग्रहांची गती कमी केली होती व भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी सहा वाजता (आणि केरीप्रॉनच्या प्रमाणवेळेनुसार सकाळचे ६ वाजता) मी माझा सोलर प्लांट घेऊन बरोबर केरीप्रॉनच्या डोक्यावर पोहोचलो होतो. नागपूर नष्ट करण्यासाठी म्हणून वापरलेल्या अक्टीव्हेशन कंट्रोलने आपले काम चोख बजावले होते. पण प्रकाशझोताच्या तोंडी नागपूरऐवजी केरीप्रॉनच पडले होते. मी पुन्हा कंट्रोल सेक्शनमधे गेलो. पुन्हा एकदा ठराविक शक्तीची थस्टर्स फायर केलीत. Solar Plant 24 ची गती अजून कमी झाली. ठीक रात्री ११ वाजता पुन्हा एकदा सोलर प्लांट २४ नागपूर शहरावर (आपल्या मूळच्या जागी) येऊन पोहोचला. यावेळी पुन्हा एकदा विरुद्ध दिशेची थस्टर्स फायर करून मी ह्या आरशांची गती दर चोवीस तासांना एक पृथ्वीप्रदक्षिणा इतकी वाढवली. म्हणजेच त्यांना पुन्हा एकदा भूस्थिर केले. नागपूरच्या S. P. 24 A. C. शी कम्युनिकेशनवरून संपर्क प्रस्थापित केला. त्यांना सांगितले, "तयार व्हा, बरोबर ११ वाजून ५९ मिनिटांनी मी अॅक्टीव्हेशन कंट्रोल वापरून प्रकाशझोत सोडणार आहे ! (आता मात्र अॅक्टीव्हेशन आणि अँगल कंट्रोल माझ्या हुकुमानुसार वागत होते) पुन्हा एकदा मी ऑब्झरव्हेशन चेंबरमधे आलो. कम्युनिकेशन ऑन केले. घड्याळात ११ वाजून ५९ मिनिटे झालीत. अॅक्टिव्हेशन कंट्रोल मी ऑन केला. पुन्हा एकदा पृथ्वीच्या वातावरणावर एका वर्तुळात २४ प्रकाशाचे ठिपके दिसले. ते प्रकाश रेखेच्या स्वरूपात पृथ्वीवर झेपावले. पण यावेळी पृथ्वीवर लाल ठिपका मात्र दिसला नाही ! म्हणजेच प्रकाशझोत बरोब्बर नागपूरच्या नसराळ्यात शिरला होता ! १२ वाजून १ मिनीटांनी अॅक्टीव्हेशन ऑफ झाले. माझ्या T. V. स्क्रीनवर अक्षरे उमटलीत "मिशन सक्सेसफुल काँग्रॅच्युलेशन" मी समाधानाने उठलो. कंट्रोल सेक्शनमधे जाऊन यान पृथ्वीच्या दिशेने नेण्याचा प्रोग्राम कॉम्प्युटरला दिला. आणि स्लिपींग बॅगमधे शिरून चक्क झोपी गेलो. गेले २४ तास मी जागा होतो !

मला जाग आली तेव्हा माझे यान श्रीहरी कोटा एअरो-अॅस्ट्रोड्रोम वर उतरत होते. मला रिसीव्ह करायला S. P २४ चे चीफ साईंटिस्ट-इन-चार्ज श्री. मेहेरा आले होते माझ्याशी हस्तांदोलन करून ते म्हणाले " शाब्बास पठ्ठे. तू काय केलेस तुला माहित आहे ? " "नो सर मला नीटशी कल्पना नाही " " ज्या ठिकाणी तू 'नागीणीचा' दंश करवलास ना त्या ठिकाणी केरीप्रॉनचे प्रमुख चार अॅटॉमिक रिअॅक्टर्स होते. ते सगळे एक्सप्लोड झालेत. केरीप्रॉनचे सर्व प्रमुख शास्त्रज्ञ व त्यांचे सगळे Powar Plants नष्ट झालेत. त्यामुळे जगातील एकूण एक राष्ट्र पुन्हा स्वतंत्र झाले आहे ! आणि प्रत्येक देशात २० % जमिनीवर पेट्रोलियानाची लागवड असल्याने त्यांचा ऊर्जेचा प्रश्नही सुटला आहे ! काँग्रॅच्युलेशन यंग मॅन. यु हॅव डन ए ग्रेट जॉब ! चल स्वतः राष्ट्रपती

तुला भेटायला आले आहेत ! मी श्री." मेहेरांचे आभार मानले व राष्ट्रपतीसमोर जाऊन उभा राहिलो त्यांना सलामी दिली. सलामी स्वीकारून ते म्हणाले. " एस. आनंद मानव जातीचा प्रतिनिधी म्हणून मी तुझे मनःपूर्वक अभिनंदन करून तुझे आभारही मानतो. तुझे सर्व जीवसृष्टीवर अनंत उपकार आहेत. पण भारताचा राष्ट्रपती म्हणून मी तुला असे सांगतो की आमचा परत फिरण्याचा आदेश न मानणे आणि भारताच्या अहिंसा धोरणाला धाब्यावर बसवून केरीप्रॉन राष्ट्र नष्ट करणे हे दोन आरोप तुझ्यावर आहेत. तुला कठोर शिक्षा देणे क्रमप्राप्त आहे. परंतु जगातल्या एकूण एक राष्ट्राने तुझे व भारताचे आभार मानले असल्याने व तुझा सत्कार करण्याची इच्छा प्रकट केल्याने आम्ही तुला सौम्य शिक्षा देत आहोत. आजपासून तुझी भारताच्या गुप्तचर खात्यातली नोकरी संपुष्टात आली आहे व याही पलीकडे तुला भारत सरकारशी निगडीत असलेल्या कोणत्याही ठिकाणी नोकरी करण्याचा अधिकार काढून घेतला गेला आहे. "

△ △

आनंद सदाशिव सहस्रबुद्धे
M.I.G. 4/2 V.H.B. Colony
Wanjari Nagar AJNI
Nagpur 440003

हस्तलिखिते : आवाहन

महाराष्ट्रातील विविध ठिकाणी जुनी मौल्यवान हस्तलिखिते प्रकाशित न होता तशीच पडून आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा असा विचार आहे की, मौल्यवान हस्तलिखिते एकत्र करून आवश्यकतेनुसार त्यांची छपाई करून ती प्रकाशित करावी किंवा मायक्रोफिल्म करून त्यांचे जतन करावे. अशाप्रकारची हस्तलिखिते साधारणतः कुठे आहेत व ती कुठल्या स्वरूपात आहेत याची माहिती जर साहित्य संस्कृती मंडळाला देण्यात आली तर मंडळास कार्यवाहीच्या दृष्टीने ते सोईचे होईल. हस्तलिखिताची माहिती देताना मूळ लिखाण मोडी लिपित किंवा देवनागरीत आहे याचाही खुलासा करावा. प्राथमिक माहिती आल्यानंतरच मंडळ त्यावर पुढील विचार करील. यावद्दल संबंधितांना मंडळाकडून मानधन देण्याची सोय सध्या तरी नाही.

आपला
सु. द्वा. देशमुख
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई–४०००३२

॥ कविता ॥

अवचित झाली फुले / रंजनकुमार श्रृंगारपवार

कशी देहभर झाली
पिसें वेदनांची
कां पापणी गळली
अंधारावर विजेची !

कुणी अंतरात कोरली
नक्षी आठवांची
कां डोळयातून वाहिली
रात्र पावसाची !

कुणी आरास मांडली
चुकार हुंदक्यांची
कां डोळयात केली कुणी
जखम भावलीची !

कशी थरथरली ज्योत
पेटत्या कापराची
कां अवचित झाली फुले
सरत्या आकाक्षांची !

□ □

नदी / किशोर पाठक

नदी सुसाट धावत सुटली
अनावर फोडल्या
लाखो दगडांच्या तटबंद्या
बुसमटून टाकल्या
हरळी शेवाळांच्या गर्द सावल्या
नदी उद्दाम फुटफुटली
बांध फोडून वुजुर्गांचे, मोकाट सुटली
काठ सामोरे आले तिला
करवती हात आडवे धरून
त्यांचे अजस्र सुळके फिरले
तिच्या मानेवरून
नदी आणखी वेफाम झाली
रक्तबंबाळ पायांनी समुद्राला शोधू लागली
येथेच सारे फसले..........
काठांनी तिचे जलाशय केले
तोंड बांधून दगडांनी
सारे अवयव शिथिल केले
आता उसळतात वाफेचे लोट
ती भिरकावते अगणित श्वास आभाळवर
तेही कोसळतात पाणी पाणी होऊन
तिच्या अस्मितेवर
नदी व्यग्र....खोल खोल गढून जाते मातीमधेच
खवळते कधी समुद्राच्या आठवणीने
आपटते पाण्याच्या अनावर जटा
आणि फेकते हतबल होऊन हुंदक्यांचे काही लोट
मोरीच्या तोंडातून........
त्यावर पिकतात मातीची माणसं
नदी खरी भेटतच नाही....सुसाटून पेटतच नाही
ती फेकते तुकडयासारखे तिचे नैराश्य
त्यावर चघळतो आम्ही आमचे
सुजलाम् सुफलाम् आयुष्य—

□ □

चांदण्याची फुले.... / उ. रा. गिरी

धुंद चैत्रातली चांदण्याची फुले
दुग्धवर्षा जशी चांदण्याची फुले

गंधगर्भारशी चांदण्याची फुले
ही नशीली निळी चांदण्याची फुले

देहवेलीवरी चांदण्याची फुले
गुंतली कुंतली चांदण्याची फुले

पायवाटांवरी चांदण्याची फुले
राजघाटांवरी चांदण्याची फुले

जान्हवीच्या जळी चांदण्याची फुले
बोधिवृक्षातळी चांदण्याची फुले

स्वप्न-मंदाकिनी चांदण्याची फुले
दूरची द्वारका चांदण्याची फुले

रासलीलेपरी चांदण्याची फुले
गीतगोविंदशी चांदण्याची फुले !

□ □

अग्नीच्या सर्वभक्षी डोळ्यांसमक्ष / प्रकाश खरात

अग्नी पंख विस्फारून-
दहनांतून मर्तिकांच्या उसळलेला....
कुठवर साहशील सरणधग;
नि सूर्यप्रवासी पक्ष्यांचा अकाली मृत्यू.

पूस अविरत अश्रुओल.
तुझ्या निश्चयी मुठीतले शुभ्र कबूतर
ज्यावरील रात्रीचे थर तू सायासाने खरवडलेय्‌स.

बघ,
ते
अग्नीच्या सर्वभक्षी डोळ्यांसमक्ष
मृत्युंजयी गिरकी घेतेय.

□ □

दस्तक / पुष्पराज चित्ते

गांव सुनसान, सर्वत्र संचारबंदी
मध्यरात्रीच्या गर्द गहिऱ्या सन्नाटयात
फक्त लष्करी बुटांचा आवाज
आणि दबा धरून बसलेल्या हिंस्र श्वापदासारखी
दहशत

आता कुठल्याही क्षणी
माझ्या मृत्यचे दावेदार इथे येतील
दारावर दस्तक देतील
ह्या कोसळू बघणाऱ्या कौलारू घराची झडती घेतील

(तेव्हा-सनातन काळोखाचा एक दीर्घ तुकडा
प्रचंड शिलाखंडासारखा कोसळून पडेल
आणि भिंतीवरील जुनाट कॅलेंडराची पाने
काळाचे दुवळे अस्तित्व टिकविण्यासाठी
घायाळ पाखरांच्या पंखासारखी फडफडत राहतील)

मी सर्वबळ एकवटून उठतो
मशाल पेटवितो
तसा भगदाड पडलेल्या छपरातील
चिमुकला पक्षी दचकतो
अनामिक भयाने चित्कारतो

मशालीच्या स्निग्ध प्रकाशात
मी कारागृहातून आलेली तिची पत्रे
पुन्हा एकदा चाळतो / (जाळतो)
डोळयातून ओघळणारे खारे पाणी हलकेच पुसतो
नि तिच्यासाठी शेवटच्या कवितेचा
अंतिम चरण जुळवतो
कागदावर मांडतो -
....मी जाळून परतलो आहे
रंगीत फुलांच्या राशी
तू येऊ नको अनवाणी
काटयांच्या उगमापाशी

आणि माझी रक्ताळलेली पावले
उंबरठयाच्या बाहेर पडतात.
दूर कुठे प्रकाशाच्या नौबती झडतात.

□ □

कविता / अनुराधा पाटील

अपंग मूल सांभाळावं एखाद्या आईने
जीवाच्या करारानं, जगाशी हिंस्त्र होऊन
तशा लख्ख झाल्या साऱ्या गोष्टी
प्रत्येक क्षणाला वेदना देऊन.

दिवसेंदिवस माझ्यापासून दूर जातेय्
प्रत्येक गोष्ट, सारीच परवड केविलवाणी
नुसत्या श्वासांच्या धगीनेच करपून गेलीत
गळ्यातल्या गळ्यात मुक्तीची गाणी.

पुन्हा पकडता येत नाही गेलेल्या आयुष्याचा हात
अधू मनाची तार कुठवर ताणावी
जिथून तोडावं तिथून नव्यानं वाढतात माणसं
एवढी लवचिक क्षमता मी कुठून आणावी !

कुणाचे हात कोरतात मनावर माझ्या
धगधगती जहाल विषमय रेषा, जीव व्याकुळतो
आपल्या हातात तर काहीच नाही
मेलेल्या माशासारखे आपण
ह्या काळप्रवाहात वाहतो.

□ □

प्राक्तनफुले / शिवा राऊत

पावलांना पड
हळदओली मिठी
पुनवपर्वातला
चंद्र आला दिठी.

सगुण ओठातला
भाव झाला मुका
अर्थ स्पर्शातल्या
ईश्वरा सारखा.

आज ना ठाउके
द्वैत देहातले
येत रोमांचुनी
प्राक्तनाला फुले.

□ □

वाघ / मुदेश शरद लोटलीकर

प्रत्येक क्षणाचा अनादी वाघ असतो कसा
विध्वंसक त्याच्या अधःपाती अवस्थेत
येतो अलवार पावलांनी; आत्मविश्वासी फटकाऱ्यांची
आरास निखळून पडते पावलोपावली
–आणि आविष्कारवाही पंज्यात
एकेक स्फोटक दडवीत
घेतलं जातं सभोवताल निमिषमात्र अखत्यारीत.
झिंगणाऱ्या जिभेवरही चढते
उत्तेजक लिंगावरली चव उष्ण
ड्रेडफुल हातांची ड्रेडफुल गुंफण.
तशा शिटतात कोंबड्या नि फराफरा मुततात माकडं
नखांनी जातो केला हृदयभंग सावकाऽऽऽश....
आणि रक्तमांसचर्मांचा अनिकेत डाग
कोरतो क्षितिजावर आतशवाही गर्भाशय.

कोणत्या अनामिक दैवी हातांनी उचलली जाते
आदिम आग अन् अबाधितपणं मुलायम
उभारली जाते पाशवी सिमेट्री....
की भट्टीत उकडलेला मेंदू असा एकाएकी मस्तवाल
बनावा हिंस्त्र....

दिवसांची ड्रेडफुल गुंफण. चोरलेली आग डोळ्यात.
वरीणीचे वैराण अरण्य टाळता येत नाही आपल्याला,
तशी जन्मदात्रीपासून तोडली जाते
नाळ ओघाबरहुकूम
आणि वाघिणीचा डावा स्तन तोंडात येतो
आपसुकच हिंस्रकरुण.

दवक्या पावलांतली निमूट गाज
हाडामांसाची आत्यंतिक झटापट
ज्यानी स्तन सोडला ते मुक्त झाले....
आकुलमय हातांची सफाई : पिळवटलेले
मज्जा तंतू.
–मग पाजून मारणारी नि फाडून मारणारा
ह्यांच्या दरम्यान येतो प्रत्येक क्षणाचा
अनादि वाघ कसा रक्तमंद
आणि इथेच आरण्यक अधःपाताला
खरी सुरुवात होते.

□ □

अनुक्रमणिका

उत्खनन / उल्हास मनोहर

काल
उत्खननात मला शेंदूर फासलेला बुद्ध भेटला,
असं सांगायलाही लोक आता कमी करणार नाहीत.
अडीच हजार वर्षापासून
बुद्ध शांत आहे, हे तर इतिहास सांगतच आहे.
पण आता हे लोक
शेंदूर फासून बुद्ध जन्मलाच नव्हता,
असंही सांगायला कमी करणार नाहीत.

दोस्तहो,
त्यांना त्यांचे उत्खनन करू द्या.
यापुढचा बुद्ध आता शांत राहणार नाही
कारण
काल बुद्ध मला असा भेटला

नामांतराच्या गोळीबारात शहीद होतांना
लांगमार्चमध्ये चालतांना

आम्ही शांतच होतो
वादळाचा मौसम त्यांनी सुरू केला
तरीही मेणवत्त्यांच्या मशाली आल्या नाहीत.
अशी वादळचिन्हे फक्त आम्हालाच कां दिसतात?
असा प्रश्न मी इतिहासाला केला....

पुन्हा केलेल्या उत्खननात
बुद्ध मला असा भेटला
चोहोबाजूला मशाली पेटल्या होत्या.
वादळे घोंगावून शांत झाली होती.

बुद्धही शांतच होता
पण मेणवत्त्या मात्र आता मशाली होऊन
पेटत होत्या.

□ □

स्साला, भुखा है / लक्ष्मीकांत घुमे

एक दिवस मी
एका पोस्टरजवळ उभा होतो
पोस्टरमधला पोरगा
भाकरी पोटाशी धरून उभा होता
आणि त्याच पोस्टरवरचा
दुसरा माणूस त्याच्याकड
पिस्तोल रोखून उभा होता.

बारूदीचे ढेर लागतात
माझ्या मेंदूच्या अंतिम टोकापर्यंत
स्फोट होतोय त्याचा क्षणाक्षणात
माझे हवालदिल आलेले श्वास
रोखतात नजरा अशा चित्राचित्रांवर
अशावेळी पागल होतात माझे डोळे
आग ओकतोय मी
जाळतो भराभर साराच प्रदेश
माझ्या अस्तित्वशून्य आयुष्याचा
एक एक तुकडा बदनाम होतोय

अशातच भिकार भोजन चाललेल्या
अनाथालयाच्या आवारातून
कुणाचे तरी स्वर
माझ्या कानी पडतात
स्साला.... भुखा है !

□ □

एका मोर्चाचा शेवट / लोकनाथ यशवंत

दूर गेलेल्या आपल्या नजरा परतून का येतात !
आपण कृतिशून्य प्रगतीवादी आहोत हेच खरे

सत्तेपुढे शहाणपण चालत नाही असे म्हणतात
मग शहाणपण काय कामाचे !

समुद्र सपाटीखालीही माणूसवस्त्या आहेत.
असे काल समजले.

पाय ताणून हात वर केले की आळस निघतो
अशा काही अगदी साध्या प्रक्रिया असतात
साध्या-साध्या गोष्टीही समजून घेण्याच्या
आपण मनःस्थितीत नसतो !

कुलूप लावून दारावर चाबी ठेवून देण्याची
आपली सवयच झाली आहे जुनी
अशा सवयी आता बदलायला हव्या !

तप्त विराट मोर्चाचे रूपांतर शेवटी आमसभेत होते
यापेक्षा आपली शोकान्तिका कुठली होऊ शकेल !

□ □

दोन कविता / इब्राहिम खान

१

ह्या भयाण पिठाचा कारखाना आणि ही
इथली माझी धूसर जिंदगी
प्रसवू दिले नाही त्यांनी माझे एकही स्वप्न
ही वस्ती देखील मला डिवचून टाकते
कोंबडीच्या अनोळखी पिलांसारखी
ह्या माणसांना नाही वाटत माझ्याविषयी
आस्था
कितीही करून पाहिल्या तडजोडी तरी....

२.

अगतिकांच्या मुंड्या मोडणाऱ्या ह्या हलालखोर
गावात
नाक्यानाक्यावर पहारे देत असतात आदमखोर
सैतान
आणि त्यांच्या हातात तैनात नंग्या
तलवारी
ज्यांचा रोख सदैव
भुकेकंगालाच्या मानांकडे
ह्या इलाख्यातल्या माणसांची
मरगळली आहेत मने
त्यांना थेट मौत मागाविशी
वाटतेय........

□ □

इतिहासात जमा होतीस.
गोविंद वाघमारे

इतिहासात जमा होतीस
जमिनीत धन पुरून ठेवतात तशीच
हल्ली तुझ्या मुक्तीचे सोहळे
गल्लोगल्लीत पार पडत आहेत...
तुला बुरख्यातून बाहेर पडता येईल का ?

ओठ रंगवण्याइत्पत
टाइपिस्ट रिसेप्शनिस्ट बनण्याइत्पत
स्त्री मक्तींचा विचार करू नकोस,

मानसिकता बदलणे म्हणजे
परकर वर-खाली करणं नव्हे....
जीवनात आमूलाग्र बदल करावा लागतो.
आव्हाने पेलावयाची असतात
अस्तित्व रक्षणार्थ लढावेही लागते
हे सत्य सर्वप्रथम गृहित धर....

बलात्कार झाला म्हणून पतीत झालीस
हे समीकरण मान्य करू नकोस....
नाहीतर इथून, तिथून, चोहीकडून
हेटाळल्या जाशील, फेटाळल्या जाशील....

□ □

उदासीनता : समुद्र : मी / भगवान निळे

जेव्हा आपण असतो उदास
तेव्हा समुद्र उदास असतो
की,
जेव्हा समुद्र असतो उदास
तेव्हा आपण उदास असतो
की,
समुद्र आणि आपण दोघेही असतो उदास ?
उदास
उदासीनता
ह्या उदासीनतेत मी पाठ फिरवून बसतो समुद्राकडे
तेव्हा आख्खा समुद्रच जातो वाहत पाठीवरून
समुद्र सामावून जातो माझ्यात
मी समुद्रात
आम्ही एकमेकात
उदासीनता उदासीनतेत
मग –
समुद्राकडे तोंड करून मी त्याला सामोरा जातो
तेव्हा माझाच समुद्र होतो
समुद्र खळखळून खवळतो
मीही खिदळतो ....

समुद्राचे हे रुप मला खूप आवडते
अगदी उदासीनतेतही.

□ □

अधिक क्षमता वाढविण्याकरिता / श्रीपाद भालचंद्र जोशी

खर्चात काटकसर करून अधिकाधिक
क्षमता वाढविण्याकरिता
बदलत्या वेगासोबत अधिक उन्नती साधण्याकरिता
एकदा असे ठरले की
माझे सारेच अवयव एकत्र असणे
हा विकासात अडथळा आहे
साऱ्या अवयवांसोबत वर असणारे डोके म्हणजे
निव्वळ हाडा-मांसाचा, केसांचा एक गोळा आहे
तेव्हा असे ठरले की
माझ्या हाती एक तलवार देण्यात यावी
आणि सोबत माझे स्वातंत्र्य
मी माझे डोके छाटून घ्यायचे की पाय
यातले काय
ते मी ठरवायचे
त्यासाठी माझ्या प्रतिनिधींचे एक संमेलन भरवायचे
संमेलनात करायचा त्या बाबतचा एक करार
करारावर मी नव्हे, माझ्या प्रतिनिधींनी
स्वाक्षऱ्या करायच्या
मी आणि माझ्यासारख्यांनी
फक्त हातात टाळ्या भरायच्या.

हे सारे समारंभपूर्वक करून झाले
करारात काही सुधारणांसहित माझ्याकरिता
काही सवलतीही ठरवून झाल्या
आता
ठरल्याप्रमाणे माझ्या हाती तलवार देऊन
स्वातंत्र्यासोबत
दिली आहे काही दिवसांची मुदत त्यांनी
प्रतिनिधींनी कराराचे स्वरूप समजावून सांगणे
सुरू केले आहे
खरे तर मुदतीच्या आधीच माझे डोके
धडावेगळे झाले आहे

काम संपल्यामुळे
लवकरच ते माझ्या हातची गळून पडलेली
तलवारही परत नेतील
खर्चात काटकसर करून अधिकाधिक क्षमता
वाढविण्याकरिता
अशा साऱ्याच तलवारी पुन्हा पुन्हा कामास
येतील

□ □

वळणा-वळणावर / शांताराम टेळकीकर

कित्येक वळणांनंतर
माझ्या लक्षात आलंय् की
सावलीच्या बागांवर मालकी
हक्क सांगणाऱ्यांनीच
खेचून नेले आहे आमच्या ओठावरले गाणे....
चोरून नेले आहे आमच्या मनातले चांदणे....
बांधून
आमच्या डोळ्यावर अंधाराच्या पट्ट्या
जागोजाग
पेरून ठेवले आहेत आमच्यासाठी
जाळणारे उन्हाळे....

□ □

सारवासारव / वासंती इनामदार

सारवासारव करताना शब्दांनी
दगा देणाऱ्या पापण्या ओथंबत राहिल्या.
किती वाटांच्या शपथा दगा धरून बसल्या !
तसं बोलली तरी कुठं होतो खूप फार
पण भावन् भाव कोरून बसलेले काळजावर.... !
तो चंद्र तरी कशाला उमटतो क्षितिजावर ?
एकेक करून दिवसा दिवसांच्या साक्षीने
सगळ्या जखमांवर खपल्या धरल्या होत्या
फार उशिरा कळलं, की....
त्याही भावड्याच होत्या.... !

□ □

फसव्या विज्ञानकथांचा संग्रह : '२२ जुलै, २०९५'

२२ जुलै, २०९५ हा लक्ष्मण लोंढे यांच्या विज्ञानकथांचा पहिलाच संग्रह राजा प्रकाशन, मुंबई तर्फे प्रकाशित झाला आहे. प्रस्तुत लेखकाच्या 'देवांसी जिवे मारिले' या विज्ञानकादंबरीच्या यशाच्या पार्श्वभूमीवर '२२ जुलै, २०९५' हा कथासंग्रह मात्र अपेक्षाभंग करणारा ठरतो.

या कथासंग्रहातल्या चौदा कथांपैकी काही कथांना ओढून ताणून सुद्धा विज्ञानकथेचं लेबल लावणं कठीण आहे. 'मला फाशीच द्या' सारख्या कथांमधे कथानक आणि वैज्ञानिक भागाचा समतोल साधला गेला आहे, तर 'पुरावा' सारख्या काही कथांमधे केवळ कथानकाचाच फुलोरा आहे, तर अन्य काही कथांमधे केवळ वैज्ञानिक स्पष्टीकरणच आहे.

या संग्रहातल्या 'कबूतर' आणि 'एम. एम. आर.' या विज्ञानकथा नाहीतच. 'कबुतर' ही एका मानसोपचार तज्ज्ञाकडे येणाऱ्या, कबुतराला पाहून चिडणाऱ्या स्त्रीची कथा आहे. तिचं हे बेफाम होणं सुद्धा मानसशास्त्रीयच आहे. 'एम. एम. आर. ८७८५' ही तर चक्क पोलिस तपासाची कथा आहे. यातही पोलिसी चातुर्याचा भाग नाही. या दोन कथा प्रस्तुत संग्रहातून वगळल्या असत्या, तर हा एक संपूर्ण विज्ञानकथांचा संग्रह झाला असता.

या संग्रहात ज्या विज्ञानकथा आहेत, त्यात लेखकानं वेगवेगळ्या मध्यवर्ती कल्पना वापरल्या आहेत. कथांमधे कल्पनांची पुनरावृत्ती न होणं ही लेखकाची जमेची बाजू आहे. लक्ष्मण लोंढे यांनी काही रहस्यकथाही लिहिल्या आहेत. त्याच परिणाम म्हणूनच की काय, 'गद्दार', 'संजीवनी' सारख्या विज्ञानकथांमधे रहस्य कायम ठेवण्यात आणि उत्सुकता वाढवण्यात ते यशस्वी होतात.

'मला फाशीच द्या' ही या कथासंग्रहातली पहिलीच कथा आकर्षक आहे. परग्रहावरच्या आपल्या शेजाऱ्याचा शोध घ्यायचा, तर तेवढं अंतर पार करायला हवं. त्यासाठी आयुष्याची मर्यादा वाढवायला हवी. यावर मात करण्यासाठी म्हणून एक सूक्ष्म-जीवशास्त्रज्ञ 'अॅनाबायोसिस'-च्या प्रक्रियेनं माणसाचं शरीर गोठवण्याचा प्रयोग करायचं ठरवतो. प्रयोग यशस्वी होण्यासाठी नवजात अर्भकाची आवश्यकता असते. तो शास्त्रज्ञ स्वतःच्याच मुलावर हा प्रयोग करतो. या प्रयोगात ते मूल मरतं, आणि शास्त्रज्ञावर खुनाचा खटला भरला जातो. या खटल्यातला आरोपी म्हणून त्यानं दिलेलं निवेदन म्हणजेच ही कथा आहे. वैज्ञानिक प्रगतीसाठी सर्वस्व त्याग करणाऱ्या शास्त्रज्ञाचं आगळं-वेगळं व्यक्तिचित्र या कथेत रंगवलेलं आहे.

'२२ जुलै, २०९५' ही शीर्षककथा एका वेगळ्या विषयावरची आहे. ऐतिहासिक काळात अटलांटिस खंड समुद्राच्या तळाशी गेलं. त्यावरच्या मानवानं तिथंही प्रगती केली आणि तो पृथ्वी-

वरच्या मानवाशी संपर्क साधायला लागला. पृथ्वीवर होऊ घातलेलं तिसरं महायुद्ध टाळण्यासाठी त्यानं पृथ्वीवरची मुख्य गणकयंत्र बिघडवली. त्यासाठी त्याला स्वत:चंच वरचसं नुकसान करून घ्यावं लागलं. अशा प्रकारचं कथानक असलेली ही कथा लेखकानं इतिहास पुरुषाशी बोलत बोलत खुलवली आहे. बर्म्युडा त्रिकोणातून जहाजं, विमानं अचानक नाहीशी होतात. या प्रकाराचा या कथेत चांगला उपयोग करून घेतलेला आहे.

'कालप्रवास' हा अनेक विज्ञानकथा लेखकांचा आवडीचा विषय लक्ष्मण लोंढेंच्या प्रस्तुत संग्रहातल्या कथांमधेही आहे. 'आणखी एक विश्वामित्र' ही लांबलेली आणि कंटाळवाणी कथा, तसंच 'पुरावा'ही कथा अशा दोन कथा लेखकानं कालप्रवासाचं सूत्र घेऊन लिहिल्या आहेत. 'आणखी एक विश्वामित्र'तले डॉ. गोकर्ण यांना काळात मागे जाऊन देवांनी समुद्रमंथनातून काढलेल अमृत मिळवायचं आहे. ते अमृत घेऊन ते अमर होणार आहेत. या गोकर्णांच्या तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून लेखक काळासंबंधी न पटणारं आणि तर्कविसंगत असं स्पष्टीकरण करतात, ते वाचून आश्चर्य वाटतं. 'पुरावा' कथेत राजा वीरभद्रानं विजयादशमीच्या दिवशी भर दरबारात दूत म्हणून आलेल्या मालकमचा वध केला की नाही यावद्दल संशोधन करणारे पुण्याचे इतिहास संशोधक नानासाहेब गुप्ते रस्त्यानं फिरता फिरता सरळ वीरभद्राच्या दरबारातच जाऊन थडकतात. कुठल्याही प्रकारचं स्पष्टीकरण देण्याच्या किंवा नानासाहेबांचं वीरभद्राच्या दरबारात जाणं सुसंगत करण्याच्या भानगडीत लेखक पडत नाही. यात वैज्ञानिक भाग कुठेच येत नाही.

कालप्रवासाच्या कथा मनोरंजक वाटत असल्या तरी त्या विज्ञानकथांच्या प्रकारांमधे निम्न दर्जाच्या मानल्या जातात. अशा प्रकारच्या कथांमधे साधारणात: एक सूत्र पाळलं जातं. कालप्रवासात कथानायक किंवा कथेतलं अन्य पात्र काळात मागे किंवा पुढे गेलं तरी ते त्या काळात घडणाऱ्या प्रसंगांमधे ढवळाढवळ करत नाही. या संदर्भात उदाहरणादाखल रे ब्रॅडबेरी यांच्या गाजलेल्या 'द साउंड ऑफ थंडर' या विज्ञानकथेचा उल्लेख करता येईल. लोंढे यांच्या 'आणखी एक विश्वामित्र'मधला मोहन इंद्राच्या दरबारातून अमृतकुंभ आणून तर 'पुरावा'तले नानासाहेब गुप्ते वीरभद्राची तलवार आणून भूतकाळात ढवळाढवळ करताना आढळतात.

या ठिकाणी आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. लक्ष्मण लोंढेंच्या 'पुरावा'मधे नानासाहेब गुप्तेंनी वीरभद्राच्या दरबारात जाणं आणि नारळीकरांच्या 'गंगाधर पंतांचं पानिपत'मधल्या गंगाधररावांनी ऐतिहासिक काळात जाणं यात बरंचसं साम्य आहे. नारळीकरांची आकस्मिक विपत्तीच्या सिद्धान्तावर आधारलेली ही कथा फ्रेडहॉयल यांच्या कथेवरून घेतलेली आहे. गंगाधररावांना ऐतिहासिक काळात जाण्यासाठी ट्रकचा धक्का लागण्याचं निमित्त तरी लागतं, नानासाहेब गुप्ते मात्र सहज फिरायला म्हणून जातात आणि सरळ वीरभद्राच्या दरबारातच पोहचतात.

तसंच या कथासंग्रहातल्या 'गद्दार' या शेवटच्या कथेबद्दल सांगता येईल. अमेरिकेतील गुप्त हालहालींवर नजर असावी यासाठी रशियाचे प्रयत्न सुरू असताना अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचे न्यूरोसर्जन डॉक्टर झिम्नास्की धनाच्या लोभानं रशियाला फितूर होतात. ते राष्ट्राध्यक्षाचं ऑपरेशन करीत असताना अतिसूक्ष्म असा ट्रान्समिटर त्यांच्या मेंदूत ठेवतात. त्यामुळे प्रत्यक्षांत कुणीही बातम्या न फोडताच अध्यक्षांच्या मनातल्या गोष्टी डॉक्टरांना आणि पर्यायानं रशियाला समजू लागतात. या कथेतलं रहस्य लेखकानं कायम ठेवलं आहे. कथेची मध्यवर्ती कल्पना आकर्षक असली, तरी अशाच प्रकारची, मनाचा ताबा घेणाऱ्या सूक्ष्म ट्रान्सामिटरची कल्पना नारळीकरांच्याच 'यक्षांची देणगी' या कथेत आढळते. त्यामुळे लक्ष्मण लोंढे यांच्या या कथांवर नारळीकरांच्या कथांची छाप आहे असं म्हणणं वावगं ठरू नये.

'समाधी' या कथेत एक चांगली वैज्ञानिक कल्पना लेखकानं मांडली आहे. पावसाळ्यापूर्वी बेडूक मोठी झोप घेतो. या हायबरनेशनच्या काळात त्याच्या शारीरिक गरजा अत्यंत कमी झालेल्या

असतात. त्यामुळे चुनखडीसारख्या सच्छिद्र खडकांमधे तो सहज राहू शकतो. अशाच प्रकारची अवस्था माणसाच्या बाबतीत शक्य होईल का ? त्याला अशा तऱ्हेनं दीर्घकाल जगता येईल कां ? हे या कथेचं मध्यवर्ती सूत्र आहे.

माणसाला मृत्यू आला हे नक्की केव्हा समजायचं ? त्याचं हृदय बंद पडल्यावर की त्याचा मेंदू निकामी झाल्यावर ? या वैद्यकीय शास्त्राशी निगडीत प्रश्नावरचं कथानक 'न परतीचा प्रवास' मधे वाचायला मिळतं. या शिवाय 'को ऽ हम्, को ऽ हम्,' 'आपुले जनन पाहिले म्या डोळा,' 'संजीवनी' यासारख्या कथा या संग्रहात आहेत. या कथा ऑपरेशनशीच संबंधित आहेत. 'संजीवनी' ही कॅन्सरवर संशोधन करणाऱ्या डॉ. रानडे यांची कथा एका पत्रकार मित्राच्या निवेदनाद्वारे उलगडत जाते.

'पुरुष सूक्त' या प्रकाराला मात्र 'कथा' म्हणणं खरोखरच कठीण आहे. या 'पुरुषसूक्ता'त आपल्या सूर्यापासून तयार झालेल्या ग्रहमालेपासून सुरूवात करून पृथ्वीवर जीवसृष्टी कशी निर्माण झाली, मानवानं टप्पा-टप्प्यानं कशी प्रगती केली, आणि शेवटी तो कसा यंत्रांचा गुलाम झाला याची कहाणी सांगितली आहे.

या संग्रहातल्या एकूणच कथा खूप आकर्षक किंवा मनोरंजक वाटत नाहीत. मनाची पकड घेण्यात त्या यशस्वी होत नाहीत. 'गर्भात जीव जन्मतो तेव्हा तो एकपेशी असतो. त्याची पुढे पेशी-विभाजनानं वाढ होते' हा भाग अनेक कथांमधे अनेक ठिकाणी येतो. या पुनरावृत्तीमुळे कथा कंटाळवाण्या वाटतात. तसंच जिनेटिक कोड, पेशींमधले संदेश, अमरत्वाची धडपड याही गोष्टी अनेकदा येतात.

विज्ञानकथेची निश्चित अशी सर्वमान्य व्याख्या नाही. अशा व्याख्येत काटेकोर बसेल अशीच विज्ञानकथा असावी अशी अपेक्षा करणेही योग्य नाही. तरी वेळोवेळी अनेक लेखक, समीक्षक-अभ्यासक आदींनी विज्ञानकथेबद्दल, तिच्या स्वरूपाबद्दल आपली मतं व्यक्त केली आहेत. अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. लक्ष्मण लोंढे यांच्या विज्ञानकथा मात्र अपेक्षा पूर्ण न करणाऱ्या म्हणूनच फसव्या विज्ञानकथा वाटतात.

△ △

विश्वेश्वर सावदेकर

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विक्रीस तयार असलेली प्रकाशने

पुस्तके

१ कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह, भाग २ / रु. ६-००
२ दि वेदस्थान ऑफ दि एन्शन्ट होम ऑफ दि इन्डो आर्यन्स :
ले. कै. डॉ. तु. ज. केदार / रु. ६-००
३ प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे / रु. ३०-००
४ मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री / रु. ३२-००
५ लोकसाहित्य संपदा : ना. रा. शेंडे / रु. १२-००
६ केशवसूत वाङ्मय सूची : सौ. उज्वला अयाचित / रु. २-००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१ सतारीचे नव्हे एकतारीचे बोल : व. पि. तेंडूलकर / रु. १-००
२ गडकऱ्यांची नाटयशैली : प्रा. रु. पां. पांजणकर / रु. १-२०
३ गडकऱ्यांची खरी भूमिका : प्रा. भ. श्री. पंडित / रु. १-००
४ गडकऱ्यांची नाटयप्रकृती व नाटयसृष्टी : वसंत वरखेडकर / रु. १-२०
५ आणखी गडकरी : डॉ. मधुकर आष्टीकर / रु. १०-००
६ तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ (म. आ.) डॉ. र. श. केळकर / रु. ४-००
७ 'प्रातिभ' लघुकथा संग्रह १९८० / रु. २०-००
८ समग्र बजाबा / रु. २०-००

अमराठी भाषिकांना मराठी व्याकरणाचा अभ्यास करण्याकरिता सहज सोपे पुस्तक

१ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका द्वितीयावृत्ती : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे / रु. ४-००

रसिकांनी ह्या ग्रंथांकरिता सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक नागपूर १२ यांना त्वरित लिहावे.

अनुक्रमणिका

केन्द्रीय कार्यवृत्त

दिनांक १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर ८४

दि. १–९–८४ नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेस अ. भा. मराठी नाट्य संमेलनाची पूर्व तयारी व व्यवस्थेची लय सांभाळण्यासाठी वि. सा. संघ वास्तूत कार्यालयाकरिता जागा, फर्निचर निःशुल्क देण्यात आले.

दि. २–९–८४ सुप्रसिद्ध साहित्यिक कै. वि. स. खांडेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात येऊन आदरांजली वाहण्यात आली.

दि. ४–९–८४ नाट्य विभागातर्फे "नाटककार गडकरी" हा संगीत कार्यक्रम लेडीज क्लब मध्ये सादर करण्यात आला.

दि. ५–९–८४ अमरावती येथे नाट्यविभागातर्फे "नाटककार गडकरी" हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

वि. सा. संघाच्या परीक्षा समितीतर्फे "शिक्षक दिन" साजरा करण्यात आला. या प्रसंगी परीक्षा समितीच्या संचालिका सौ. शोभा उबगडे व काही अ–मराठी भाषी विद्यार्थ्यांची औचित्यपूर्ण भाषणे झाली.

दि. ८–९–८४ नाट्य–विभागातर्फे दुर्गापूर, जि. चंद्रपूर येथे "दि गोल्डन गँग" या बालनाट्याचा प्रयोग.

दि. १०–९–८४ संगीत समितीतर्फे तपोवृद्ध गायक पं. गजाननबुवा जोशी (मुंबई) यांचा भावपूर्ण सत्कार. संघाध्यक्ष राम शेवाळकर यांचे हस्ते. सत्कारानंतर पं. गजाननबुवांचे बहारदार गायन झाले.

दि. ११–९–८४ विनोबा जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात येऊन श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात विनोबा–साहित्याचे प्रदर्शन मांडण्यात आले.

दि. १३–९–८४ सुप्रसिद्ध नाट्य–कलावंत श्री. प्रभाकर पणशीकर यांनी वि. सा. संघास व रंग-मंदिरास भेट दिली.

दि. १६–९–८४ नाट्यविभागातर्फे "दि गोल्डन गँग" ह्या बालनाट्याचे सकाळी व दुपारी असे लागोपाठ दोन प्रयोग रंगमंदिरात सादर करण्यात आले.

दि. २०–९–८४ विख्यात नाट्य–कलावंत मा. दत्ताराम व नाट्यसमीक्षक श्री. आनंद जोग यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकसभा घेण्यात आली. सभेत सर्वश्री प्रभाकर चांदेकर, रमेश अंभईकर, राजा पाठक, सुधाकर गायधनी, वासुदेव चोरघडे व मनोहर म्हैसाळकर ह्यांनी श्रद्धांजली वाहिली.

दि. २२–९–८४ कै. मामा वरेरकर यांचा स्मृतिदिन व श्री. चक्रधर स्वामी यांचा जन्मदिन पाळण्यात आला.

दि. २२, २३–९–८४ कै. इंदिराबाई खरे आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा वि. सा. संघाच्या घुग्गुस शाखेत (जि. चंद्रपूर) पार पडल्या.

दि. २९, ३०–९–८४ परीक्षा समितीतर्फे मराठीच्या परीक्षा पार पडल्या. ह्या परीक्षेस एकूण आठ केंद्रामधून ४५० विद्यार्थी बसले होते. स्थानिक परीक्षा केंद्राला कार्यकारिणी सदस्य श्री. श्रीपाद मुंजे व चिटणीस श्री. योगेश बऱ्हाणपुरे ह्यांनी भेटी दिल्या.

दि. २८, २९, ३०–९–८४ कला समितीतर्फे टिळक सभागृहात लता मंगेशकर यांच्या छायाचित्रांचे "लता : एक छायादर्शन" हे श्री. मधुकर कोयाळ यांनी संग्रहित केलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

दि. १–१०–८४ कविवर्य अण्णाजी वोबडे यांचा स्मृतिदिन पाळण्यात आला.

दि. २–१०–८४ राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्मदिन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून साजरा करण्यात आला.

दि. ७–१०–८४ केंद्रीय कार्यकारिणीची विशेष सभा झाली. सभेत घटना व शाखा–नियमांचा विचार झाला.

दि. १०–१०–८४ वि. सा. संघाची कै. रानडे वक्तृत्व स्पर्धा यंदा नरखेड शाखेतर्फे आयोजित करण्यात आली. स्पर्धेचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक अविनाश वरोकर यांचे हस्ते व पारितोषिक वितरण श्री. मामासाहेब गंधे यांचे हस्ते झाले.

दि. १३–१०–८४ अन्य भाषा साहित्य विभागातर्फे प्रसिद्ध तेलगू कवी व क्रांतिकारी लेखक संघाचे सचिव वरावरराव, जननाटचमंडळीचे प्रसिद्ध तेलगू–कवी गायक श्री. गधर, प्रसिद्ध बंगाली कवी अरुण सनायत व तामिळ पीपल्स कल्चरल फोरमचे प्रा. कल्याणी या साहित्यिक, कलावंतांशी "बातचित" कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रसिद्ध साहित्यिक महेश एलकुंचवार व अनेक स्थानिक मान्यवरांनी ह्यात भाग घेतला. आमंत्रक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी संचालन केले.

दि. १४–१०–८४ वि. सा. संघ व भारत सोविएत मैत्री संघ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध मराठी चित्रपट दिग्दर्शक श्री. राजदत्त यांच्याशी साहित्यिक व नाटचप्रेमींची खुली चर्चा झाली. प्रास्तविक प्रा. खांदेवाले यांनी केले. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी ह्या कार्यक्रमाचे संचालन केले. अध्यक्ष डॉ. यशवंत मनोहर हे होते.

शेतकरी आंदोलनाचे प्रवर्तक श्री. शरद जोशी यांची जाहीर मुलाखत वि. सा. संघाते रंगमंदिरात सकाळी आयोजित केली. मुलाखतकार होते सर्वश्री सुरेश द्वादशीवार, शंकरराव गेडाम व प्रा. खांदेवाले. ह्या अनोख्या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद होता.

दि. १५–१०–८४ विदर्भ साहित्य संघाच्या अहेरी येथील ३६ व्या साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष श्रीमती गीता साने यांचा रंगमंदिरात जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुळकर्णी होते. वक्ते डॉ. वि. स. जोग व प्राचार्य राम शेवाळकर हे होते.

दि. १६–१०–८४ वि. सा. संघाच्या श्रीगणेश व्याख्यानमालेत "श्रीगणेशविद्या" ह्या विषयावर विख्यात संशोधक व लिपीकार श्री. ल. श्री. वाकणकर (मुंबई) यांनी गडकरी सभागृहात पहिले पुष्प गुंफले. अध्यक्षस्थानी डॉ. शिरीष आत्माराम देशपांडे होते.

दि. १७–१०–८४ ह्याच व्याख्यानमालेचे दुसरे व तिसरे पुष्प श्री. वाकणकर यांनी वि. सा. संघाच्या घाटंजी व यवतमाळ ह्या शाखांत गुंफले.

दि. १७, १८ १०–८४ वि. सा. संघाची संगीत समिती व सप्तक ह्या संगीत संस्थेच्या संयुक्त विद्यमाने कै. सुधना गोखले संगीत स्मारक समिती (मुंबई) यांनी आयोजित केलेला "नवरत्नहार" ह्या उदयोन्मुख गायक–वादक कलाकारांचा कार्यक्रम

टिळक सभागृहात सादर करण्यात आला. दोन्ही दिवशी रसिकांनी उपस्थित राहून ह्या तरुण कलावंतांना प्रोत्साहन दिले.

दि. २०, २१-१०-८४ वि. सा. संघाचे ३६ वे विदर्भ साहित्य संमेलन अहेरी जि. गडचिरोली येथे सुप्रसिद्ध लेखिका व विचारवंत श्रीमती गीता साने यांचे अध्यक्षतेखाली झाले. संमेलनाचे उद्‌घाटन न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी ह्यांनी केले. स्वागताध्यक्ष खासदार श्री. शांतारामजी पोटदुखे हे होते. संदेशवाचन सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर ह्यांनी केले. प्रास्तविक व समारोपाचे भाषण वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर ह्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य रमेशचंद्र मुनघाटे ह्यांनी केले. अहेरीसारख्या आदिवासी क्षेत्रात झालेले हे पहिलेच साहित्य संमेलन होते. 'आदिवासी साहित्य' हे या संमेलनाचे मुख्य विषयसूत्र होते. संमेलनाला जोडूनच आदिवासी व शासकीय ग्रंथप्रदर्शन, आदिवासी जीवनदर्शन प्रदर्शन तसेच चित्रकार धनंजय नाकाडे यांचे चित्रप्रदर्शन आयोजित केले होते.

दि. २१-१०-८४ वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीची ८४-८५ मधील तिसरी सभा अहेरी येथे संमेलनस्थळी झाली.

दि. २२-१०-८४ वि. सा. संघाच्या अन्य भाषा साहित्य विभागातर्फे विख्यात ज्येष्ठ साहित्यिक श्री. विष्णू प्रभाकर यांचे "अनुवाद" ह्या विषयावर व्याख्यान झाले. प्रास्ताविक श्री. रंजन त्रिवेदी ह्यांनी तर कार्यक्रमाचे संचालन श्री. राजेन्द्र पटोरिया ह्यांनी केले. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी श्री. विष्णू प्रभाकर यांचे स्वागत केले.

दि. २७-१०-८४ वि. सा. संघाच्या अन्य भाषा साहित्य विभाग आणि यंग थिएटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसाचे साहित्य व सांस्कृतिक संमेलन विख्यात उर्दू कवी साहिर लुधियानवी यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून संस्थेच्या परिसरात आयोजित करण्यात आले. कविसंमेलन, परिसंवाद, पथनाट्य व गीत-गझल असे कार्यक्रमाचे भरगच्च स्वरूप होते. बबन वेसेकर, यशवंत पाटील, विनायक कराडे, उल्हास मनोहर, अरुणा पवार, अमर रामटेके, तनहा नागपूरी, राजू मिश्रा, प्रसेनजित ताकसांडे, वसंत वाहोकार आणि श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांनी हे संमेलन यशस्वी करण्यास विशेष मेहनत घेतली.

दि. २९-१०-८४ तरुण चित्रकार व कवी श्री. अरुण मदुले यांच्या अकाली दुःखद निधनाबद्दल वि. सा. संघाच्या कलासमितीद्वारे गडकरी सभागृहात शोकसभा घेण्यात आली. ह्या सभेत भाऊ समर्थ, श्रीपाद भालचंद्र जोशी, वामन तेलंग, डॉ. शि. गो. देशपांडे आदी अनेकांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या.

दि. १-११-८४ भारताच्या पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांच्या दुःखद निधनानिमित्त स्थानिक कार्यकारिणीची शोकसभा घेण्यात येऊन श्रद्धांजली वाहण्यात आली व तीन दिवस केंद्रीय कार्यालय बंद ठेवण्यात आले.

दि. ५-११-८४ विख्यात साहित्यिक व कवी श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या दु.खद निधनानिमित्त वि. सा. संघातर्फे डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली गडकरी सभागृहात शोकसभा घेण्यात आली. डॉ. द. भि. कुळकर्णी, प्रभाकर सिरास, डॉ. श्री. मा. कुळकर्णी, डॉ. वसंत वऱ्हाडपांडे आदींची या प्रसंगी भाषणे झाली. सभेच्या शेवटी श्रद्धांजली वाहण्यात आली.

अनुक्रमणिका

दि. ८-११-८४ सुप्रसिद्ध नाट्यकलावत श्री. प्रभाकर पणशीकर हे अ. भा. नाट्यसंमेलनाचे अविरोध अध्यक्ष निवडून आल्याबद्दल वि. सा. संघाचे सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर व धनवटे रंगमंदिराचे आमंत्रक अ. ल. लिमये यांनी त्यांच्या नापुरातील मुक्कामस्थळी पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले.

दि. १४-११-८४ भारताचे दिवंगत पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी करण्यात आली.

द. १७-११-८४ वि. सा. संघाच्या अकोला शाखेने पुरस्कृत केलेले अकोला जिल्हा मराठी साहित्य संमेलन अकोला जिल्ह्यातील भांबेरी (ता. तेल्हारा) ह्या ठिकाणी आयोजित करण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष कविवर्य उ. रा. गिरी होते. संमेलनात प्रियदर्शिनी इंदिरा गांधी चित्र प्रदर्शनी, ग्रंथ प्रदर्शनी व दिवाळी अंकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. समेलनात कथाकथन, कविसंमेलन, परिसंवाद, असा भरगच्च कार्यक्रम होता. त्याला अकोला जिल्ह्यातून साहित्यप्रेमींचा भरपूर प्रतिसाद मिळाला. अकोला शाखेचे अध्यक्ष श्री. पंढरीनाथ मांडवगणे आणि स्वागताध्यक्ष श्री. विजय कौसल ह्यांनी हे जिल्हा संमेलन यशस्वी करण्यात विशेष परिश्रम घेतले. संमेलनाचा समारोप वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर ह्यांनी केला.

दि. १९-११-८४ कै. वि. रा. हुंबडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त एलिचपूर-परतवाडा शाखेचे चिटणीस श्री. अशोक बोडे यांच्या 'जहागिरदाराचं कार्ट' हा एकपात्री नाट्यप्रयोग गडकरी सभागृहात सादर करण्यात आला.

दि. २६-११-८४ भारताचे माजी गृह व संरक्षणमंत्री व साहित्यिक विचारवंत श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक सभा घेण्यात येऊन त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. १६-११-८४ वि. सा. संघाचे माजी सरचिटणीस व प्रारंभीच्या काळात ह्या संस्थेच्या जडण-घडणीत फार मोठा वाटा असलेले श्री. रा. पु. उपाख्य तात्यासाहेब सगदेव यांच्या दुःखद निधनाबद्दल गडकरी सभागृहात शोकसभा घेण्यात येऊन त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी माजी संघाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते हे होते. डॉ गो. मा. कुळकर्णी, श्री. या. मु. पाठक, डॉ. मधुकर आष्टीकर, मधुसूदन बनहट्टी, ॲड्. शंकरराव पाध्ये, आदींची यावेळी भाषणे झाली.

दि. ३०-११-८४ राजूरा जि. अमरावती येथे भरलेल्या ८ व्या वऱ्हाडी साहित्य संमेलनात सहभागी होऊन संस्थेचे सांस्कृतिक चिटणीस श्री. योगेश बऱ्हाणपुरे यांनी वि. सा. संघाचे प्रतिनिधित्व केले.

शाखा वृत्त

काटोल : १. दि. २५-९-८४ रोजी प्रा. राम शेवाळकर अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ यांनी काटोल शाखेला भेट दिली. श्री. अविनाश वरोकरांनी स्वागत केले व प्रा. शेवाळकरांनी मार्गदर्शनपर भाषण दिले. कार्यक्रमसंचालन श्री. सुरेश देशमुख (सरचिटणीस) यांनी केले.

२. दि. ९-१०-८४ रोजी रात्री ८ वाजता नविरा महाविद्यालयाच्या विद्यार्थी भवनात सर्पतज्ञ श्री. मोहन कुळकर्णी यांचे "साप हा मित्र मानवाचा" या विषयावर भाषण झाले. अध्यक्ष-स्थानी प्रा. चांडक होते.

३. दि. १९-११-८४ रोजी श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान व महाराष्ट्राचे थोर साहित्यिक प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या निधनाबद्दल शोकसभा घेण्यात आली.

बुलढाणा : विदर्भ साहित्य संघ शाखा बुलढाणा व शासकीय ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९-९-८४ ला शासकीय ग्रंथालयाने नवोदित कवींचा काव्य गायन कार्यक्रम, कथाकार श्री. भालचंद्र देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली व मान्यवर कवी प्रा. यशवंत चितलिकर यांचे उपस्थितीत पार पडला. कविसंमेलनात पुढील नवोदितांनी भाग घेतला.

श्री. व. प्र. साखळीकर, श्री. सोमनाथ सावळ, श्री. मधु चव्हाण, कु. मीरा दंडवते, श्री. विजय लक्ष्मण पाटील, श्री. भाऊ भिसे, कु वर्षा सूर्यवंशी, श्री. गणेश दुबे, श्री. शिवाजी जवरे, श्री. गायकवाड, श्री. शाम एरडकर, श्री. प्रा. चिखलीकर, श्री. गोपाळ उमाळे (जामोद), पूर्ण संचलन श्री. गायकवाड, सचिव, वि. सा. संघ, शाखा बुलढाणा यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कथाकार गो. या. सावजी निमंत्रक ह्यांनी अथक परिश्रम घेतले.

चांदुरबाजार : दिनांक ३०-८-८४ रोजी आमसभा झाली. याच सभेत अस्थायी शाखा समिती पुढील वर्षाकरिता स्थायी करण्यात आली. अध्यक्ष- प्राचार्य क. व. मिश्रीकोटकर, उपाध्यक्ष- श्री. भाऊ चुनडे, चिटणीस-प्रा. पी. एल. सोनटक्के, कोषाध्यक्ष-प्रा. एम. एस. चवरे, सभासद- सर्वश्री-मिश्रा, श्रीमती झोड, श्रीमती जोशी, चौधरी, खाडे व संगेकर.

२. दि. ७-९-८४ रोजी शाखाउद्घाटनाचा कार्यक्रम मा. प्रा. राम शेवाळकर, अध्यक्ष, वि. सा संघ, नागपूर यांचे शुभहस्ते व श्री. बाबा मोहोड, माधान यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

अचलपूर-परतवाडा : सर्व सभासदांची आम सभा दि. १३-९-८४ रोजी सौ. महाजन यांचे घरी झाली. सभेत १९८४-८५ साठी पुढील कार्यकारणी निश्चित करण्यात आली.

अध्यक्ष-सौ. शकुंतला महाजन, उपाध्यक्ष-सौ. वसुधा कानेटकर, कोषाध्यक्ष-श्री. दादासाहेब तोडगावकर, सरचिटणीस-श्री. अशोक बोंडे.

देसाईगंज : १. शाखेचा उद्घाटन समारंभ रविवार दि. ९-९-८४ रोजी झाला. शाखेचे उद्घाटन श्री. वामन तेलंग, उपाध्यक्ष, वि. सा. संघ, नागपूर यांच्या शुभहस्ते प्रा. राजन जयस्वाल, ब्रह्मपुरी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

२. दि. २-१०-८४ रोजी शाखेतर्फे मेंदी व रांगोळी स्पर्धा आयोजित केली होती. रांगोळीस्पर्धेत प्रथम सौ. स्नेहा जोशी, द्वितीय कु. जिनत राजाणी, व मेंदी स्पर्धेत प्रथम कु. स्मीता अग्रवाल, द्वितीय सौ. हमीदा रैयानी विजयी ठरल्या.

उमरखेड : दि. ६-९-८४ रोजी डॉ. बा. दा. जोशी यांचा सत्कार समारंभ प्राचार्य राम शेवाळकर अध्यक्ष, वि. सा. संघ, व उत्तम श्लोक वाङ्मय मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी प्रा. गोविंद देशपांडे व प्रा. ग. वा. करंदीकर, श्री. कृ. पा. तारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

ब्रह्मपुरी : आम सभा दि. २६-९-८४. नवे पदाधिकारी ८४-८५ वर्षाकरिता-अध्यक्ष- प्रा डॉ. डी. जे. टेंभरे, कार्याध्यक्ष-श्री. गो. न. शिनखडे, उपाध्यक्ष-डॉ. प्रा. एन. जी. पोफळी, सरचिटणीस-प्रा. बी. जी. रडे, चिटणीस-प्रा. बी. झेड. गजभिये, कोषाध्यक्ष-श्री. भा. व्यं. कात्यायन. आमंत्रक-श्री. राजाभाऊ भट, परीक्षा समिती. प्रा. विजय मुडे-नाट्य समिती. प्रा. व्ही. एन. महाजन-सांस्कृतिक कार्यक्रम समिती, सदस्य श्री. म. सी. जांभुळे, सौ. सुधाताई भाई.

२. २-१०-८४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त, भाषण स्पर्धा घेण्यात आली. "मला कळलेले गांधीजी" व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता "शास्त्री जीवन व कार्य" हे विषय होते.

अनुक्रमणिका

३. दि. ७-११-८४ ला श्रीमती इंदिरा गांधी व मराठीचे थोर साहित्यिक प्रा. शरदचंद्र मुक्तिबोध यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

४. दि. २३-११-८४ ला गडकऱ्यांच्या नाटकातील सौंदर्यस्थळे या विषयावर डॉ. रू. पां. पाजणकर यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते.

घाटंजी : "माझ्या व्यवसायाशी संबंधित मला जीवनात आलेला एक उत्कट अनुभव" याविषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. पारवा स्टेट बँकेचे मॅनेजर श्री. नेगे हे अध्यक्ष-स्थानी होते. अनुभवकथनाचा हा कार्यक्रम चांगलाच रंगला.

वर्धा : दि. २-१०-८४ रोजी वि. सा. संघ शाखा वर्धा उद्‌घाटनाचा समारंभ व सुप्रसिद्ध कवी भगवान ठग यांच्या "सर्व काही मातीचं" या कविता संग्रहाचा प्रकाशनसमारंभ सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. विजय कविमंडन यांच्या हस्ते, मा. श्री. रामेश्वरजी बजाज यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख अतिथी मा. श्री. ह. को. गोरे यांच्या उपस्थितीत पार पडला.

दि. ७-१०-८४ रोजी "मराठीत झपाट्याने लोकप्रिय व विकसित होत असलेली गझल ही भावी काळात मराठी काव्याचे प्रतिनिधित्व करणार" असे उद्‌गार सुप्रसिद्ध कवी, गीतकार प्रा. श्रीकृष्ण राऊत यांनी विदर्भ साहित्य संघ शाखेतर्फे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात काढले.

दर्यापूर : शाखेतर्फे चालविण्यात येणाऱ्या कै. अण्णाजी वैद्य स्मृति व्याख्यानमालेअंतर्गत प्रा. सौ. विद्या कावडकर, खामगांव, यांची दोन व्याख्याने. पहिले "एकनाथांची भारुडे" दि. २२-९-८४ ला व दुसरे "दांडेकरांची कादंबरी" दि. २३-९-८४ ला सार्वजनिक वाचनालय दर्यापूर येथे झाली.

गोंदिया : दि. ५-१०-८४ ते १०-१०-८४ पर्यंत शाखेतर्फे प्रथमच स्व. गणपतराव पाचुंदे बाल एकांकिका स्पर्धा झाली. प्रा. प्रकाश पाचुंदे यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दाखविलेल्या औदार्यामुळे गोंदिया शाखेद्वारे यंदापासून ही स्पर्धा सुरू करण्यात आली आहे.

पुलगांव : दि. १६-१०-८४ रोजी संस्थेचा १४ वा वर्धापन दिन समारंभ डॉ शि. गो. देशपांडे, उपाध्यक्ष, वि. सा. संघ, नागपूर यांचे उपस्थितीत पार पडला.

२. दि. १७-१०-८४ रोजी सुप्रसिद्ध कवी प्रा. विठ्ठल वाघ, अकोला यांचे "वऱ्हाडी काव्य गायन" हा विशेष कार्यक्रम झाला.

आकोट : दि. २४-८-८४ रोजी केन्द्रातून / माध्यमिक विभागातून / सतत गुणानुक्रमे प्रथम आलेला चि. सुधाकर गुलाबराव राऊत या विद्यार्थ्यास प्रा. वसंत रत्नपारखी यांचे हस्ते रौप्यपदक प्रदान करण्यात आले. अध्यक्षस्थानी स्थानिक शिक्षा प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. नानासाहेब व्यवहारे हे होते.

यवतमाळ : दि. ५-८-८४ रोजी युवक बिरादरी व साहित्य संघातर्फे अभिनव अशा 'नाटय-शृंखलेचा' कार्यक्रम सादर करण्यात आला. आरंभी सामूहिक राष्ट्रीय गीते झाली. त्यानंतर बालनाटय विभागातर्फे श्री. प्रभाकर पुराणिक लिखित व शेखर गुल्हाने दिग्दर्शित "ऐका हो ऐका" हे बालनाटय सादर करण्यात आले. कु. स्वाती पटले हिने शास्त्रीय नृत्य सादर केले. नंतर शाखेच्या "थिएटर वर्कशॉप" मधील लघुनाटये व शिल्पे सादर करण्यात आली. नागपूरच्या एन. एस. यू. आय. च्या कलावंतांनी "अवहेलना" ही श्री. अतुल भुसारी लिखित एकांकिका सादर केली. शेवटी श्री. सोनटक्के यांचे गझल गायन झाले.

१. दि. २४–८–८४ रोजी विनुभाऊ बापट यांच्या "कुटुंब रंगले काव्यात" हा काव्य–गायनाचा कार्यक्रम झाला.

नाट्यविभागाच्या आर्थिक मदतीकरिता "बगाराम व बंडू बाजाराले जाते" या नाट्यशृंखलेचा सांस्कृतिक कार्यक्रम टाकळगाव व वाभूळगाव येथे सादर करण्यात आला.

३. दि. १७–१०–८४ रोजी केंद्रीय शाखेच्या सहकार्याने गणेश व्याख्यानमालेच्या अंतर्गत सुप्रसिद्ध लिपी–संशोधक श्री. ल. श्री. वाकणकर यांचे "गणेश विद्या" या विषयावर व्याख्यान झाले.

अंत्रीखेडकर : दि. ४–१०–८४ ला विजयादशमीच्या मुहूर्तावर सर्व सभासदांची सभा होऊन तीत पुढील दोन वर्षासाठी खालील कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष–श्री. शिवशंकरराव पाटील, उपाध्यक्ष-श्री. श्यामसुंदरराव खेडेकर, सरचिटणीस-श्री. रामकृष्ण काकडे, सचिव–श्री. विठ्ठलराव खेडेकर, कोषाध्यक्ष–श्री. जगन्नाथ तायडे, कार्यकारिणी सदस्य–सर्वश्री प्रा. खेडेकर शिरभाते, डॉ. दीपक खेडेकर, ज्ञा. खेडेकर, कुळकर्णी, घनवे.

आरमोरी : १. दि. १२–८–८४ रोजी शाखेतर्फे हत्ती रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले.

२. दि. २३–९–८४ रोजी गडचिरोली जिल्हा स्तरावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी "राजकारणातील सहभाग शैक्षणिक क्षेत्राला घातक आहे" या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली.

३. दि. ३०–९–८४ रोजी मिडलस्कूल, हायस्कूल, महाविद्यालय या गट स्तरानुसार आरमोरी तालुका स्तरावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.

४. दि. २–१०–८४ रोजी चित्रकला व महिलांसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली.

५. दि. १–११–८४ रोजी सर्व पक्षीय शोकसभेत विदर्भ साहित्य संघ शाखेतर्फे अध्यक्ष श्री. अशोक कुमार मेश्राम यांनी श्रद्धांजली वाहण्यात आली.

लाखनी : दि. ११–११–८४ रोजी आमसभेत श्रीमती इंदिरा गांधी व सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या दुःखद निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मूल : दि. ३–११–८४ रोजी डॉ. बोकारे यांचे निवासस्थानी कै. श्रीमती इंदिरा गांधी व सुप्रसिद्ध साहित्यिक शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

अहेरी : दि. २०–१०–८४ व २१–१०–८४ रोजी शाखेच्या वतीने ३६ वे विदर्भ साहित्य संमेलन सुप्रसिद्ध लेखिका व विचारवंत श्रीमती गीता साने यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. (सविस्तर वृत्तांत अन्यत्र)

अकोला : दि. १७ व १८ नोव्हे. ८४ रोजी अकोला शाखेतर्फे अकोला जिल्हा साहित्य संमेलन भांबेरी (ता. तेल्हारा), येथे झाले. अध्यक्ष कविवर्य उ. रा. गिरी हे होते. रवि. दि. १८–११–८४ रोजी कै. राम गणेश गडकरी शताब्दी निमित्त परिसंवाद झाला. प्रमुख पाहुणे मा. नामदार विलासराव देशमुख, मा. अरुण दिवेकर, उपस्थित होते.

नरखेड : दि. १०–१०–८४ रोजीं कै. न्या. म. गो. रानडे आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. अविनाश वरोकर यांचे हस्ते झाले.

नवीन मान्यताप्राप्त शाखा

१. अंत्रीखेडकर (जि. बुलढाणा) व २. तिरोडा (जि. भंडारा)

नवीन आजिव सभासद

१. डॉ. घनश्याम उमरे २. श्री. मधुकर राजूरकर ३. श्री. माधव ग. सरपटवार ४. श्री. दिनकरराव तराळे ५. श्री. षडानन घनश्याम एकरे ६. श्री. अरुण हरबाजी लांबट ७. प्रा. के. सत्यनारायण ८. श्रीमती कांचन चोरडिया ९. श्री. गोपीनाथ कृष्णगोपाल राय (सर्व वरोरा) १०. श्री. पुरुषोत्तम झुनझुनवाला ११. श्री. वि. रा. खेरडे (परतवाडा) १२. श्री. चंद्रकांत उदास १३. श्री. विनोद नारायण इन्दूरकर १४. श्री. प्रशांतकुमार सत्यनाथन (सर्व नागपूर)

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

UWANI : Regd. No. NGP 207

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर १२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १२